SMART
PARTNERSHIP FOR PROSPERITY

THE WORLD BANK

# मा .बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)प्रकल्प

# प्रशिक्षण पुस्तिका

## “स्मार्ट प्रकल्प - क्रॉस कटिंग थीमॅटिक एरिया”

(सामुदायिक संपादन, निधी वितरण, सामाजिक व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण इ.)



## मार्गदर्शक



**श्री. धीरज कुमार**
**आयुक्त, कृषि - महाराष्ट्र राज्य, पुणे**



**श्री. दशरथ तांभाळे**
- कृषि संचालक, आत्मा
- कृषि विभाग, महाराष्ट्र शासन



**श्री. ज्ञानेश्वर बोटे**
- अति. प्रकल्प संचालक,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प

## विषय तज्ञ



**श्री. जीवन बुंदे**
- समन्वयक (M&E),
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. कैलास भोसले**
- वित्त तज्ञ,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**डॉ. प्रीती सवाईराम**
- तंत्र अधिकारी (क्षमता बांधणी),
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**डॉ. अभय गायकवाड**
- कृषि पणन विश्लेषक,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. प्रवीण गोडसे**
- प्रापण तज्ञ,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**डॉ. संगीता शेटे**
- समाजिक विकास तज्ञ,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. राजेंद्र पटेल**
- एम. आय. एस. तज्ञ,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. कुलदीप जाधव**
- कृषी व्यवसाय मूल्य साखळी विशेषज्ञ
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. अभिजीत कांबळे**
- पर्यावरण विशेषज्ञ,
- PCMU, स्मार्ट प्रकल्प



**श्री. अविनाश भोसले**
- पुरवठा मूल्य साखळी तज्ञ
- PIU, कृषी, स्मार्ट प्रकल्प

तांत्रिक सहाय्य : प्रायमूव्ह, पुणे

# अनुक्रमणिका

**प्रशिक्षण पुस्तिकेची ओळख ........................................................................ ६**

१.प्रस्तावना ........................................................................................................ ६

२. प्रशिक्षण पुस्तिकेचा उद्देश........................................................................... ६

३. प्रशिक्षण पुस्तिका कोणासाठी? ................................................................... ७

४. प्रशिक्षण पुस्तिकेत काय आहे? ................................................................... ७

**प्रकरण क्रमांक १ स्मार्ट प्रकल्पांतर्गत सामुदायिक संपादणूकीची प्रक्रिया .................................. ९**

१.१ प्रस्तावना ..................................................................................................... ९

१.२ संकल्पना...................................................................................................... १०

१.३ संपादन प्रक्रियेचे गरज व महत्व ................................................................... १०

१.४ संपादन व खरेदी मधील फरक...................................................................... ११

१.५ संपादनाची / खरेदीची तत्वे व व्याप्ती ........................................................... १२

१.६ संपादन समितीची रचना................................................................................ १४

१.७ संपादन समितीच्या जबाबदाऱ्या................................................................... १५

१.८ संपादन कृती आराखडा निर्मिती.................................................................... १७

**प्रकरण क्रमांक २ स्मार्ट प्रकल्पातर्गत साहित्य खरेदी व बांधकामे संपादन पध्दती ...................... १९**

२.१ प्रस्तावना ...................................................................................................... १९

२.२ समुदाय आधारित संस्था पातळीवर करावयाची प्रातिनिधिक कामे ........................................ १९

२.३ साहित्य, बांधकाम व विना सल्ला सेवा संपादणूकीसाठीच्या पद्धती.......................................... २९

२.४ संपादन प्रक्रीया अंमलात आणताना विचारात घ्यावयाचे महत्वाचे मुद्दे ..................................... २९

२.५ समुदाय पातळीवर साहित्य व कामे खरेदीसाठी संपादनापूर्वीची, दरम्यान व संपादनानंतरची प्रक्रिया: ३३

२.६ संपादन पध्दतीतील महत्वाची कागदपत्रे / रेकॉर्ड:............................................................ ३४

**प्रकरण क्रमांक ३ स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थांसाठी निधी वितरणाची कार्यपद्धत ... ३६**

३.१ प्रस्तावना ...................................................................................................... ३६

३.२ उपप्रकल्प निहाय अनुदानाचे स्वरूप व टप्पे ........................................................... ३७

३.३ उपप्रकल्पा संदर्भात जतन करावयाच्या लेखाविषयक दस्तऐवज ......................................... ४९

३.४ संस्था आणि कर दायित्व आणि अन्य महत्वाच्या तरतुदी........................................................५१

**प्रकरण क्रमांक ४ सामाजिक व्यवस्थापन आराखडा......................................................... ५४**

४.१ प्रस्तावना.......................................................................................................................५४

४.२ सामाजिक व्यवस्थापनाचे मुख्य घटक...............................................................................५५

**प्रकरण क्रमांक ५ शेतीच्या मुख्य प्रवाहात महिलांचा सहभाग ........................................... ७५**

५.१ लिंगभाव (जेंडर) ..........................................................................................................७५

५.२ लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना ............................................................................ 77

५.३ लिंगभाव विश्लेषण ........................................................................................................८२

५.४ लिंगभाव विश्लेषण का करायचे? ....................................................................................८२

५.५ लिंगभाव विश्लेषणाची साधने.........................................................................................८२

५.६ महिलांना शेती व्यवसायाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे विशेष धोरण..................................८३

**प्रकरण क्रमांक ६ पर्यावरण संरक्षण................................................................................ ८८**

६.१ प्रकल्पा अंतर्गत पर्यावरण रक्षण - संकल्पना आणि गरज........................................................८८

६.२ एकात्मिक पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन अभ्यास (Environment & Social Management framework-ESMF ..........................................................................................................८८

६.३ उपप्रकल्प निहाय्य नकारात्मक उपक्रमांची यादी (Negative list of Activities) .........................९१

६.४ उपप्रकल्प प्रस्तावांच्या पर्यावरण संरक्षण विषयक छाननी प्रक्रियेचे टप्पे ..................................९५

६.५ चांगल्या औद्योगीक पध्दती - बांधकाम – नूतनीकरण आणि नवीन प्रकल्प (गोदामांचे बांधकाम, प्रतवारी आणि वर्गीकरण युनिट, शीतगृह, बाजारपेठ इत्यादी)..........................................................९७

**प्रकरण क्रमांक ७ चांगल्या कृषी पद्धती ......................................................................... १००**

७.१ संकल्पना आणि गरज.................................................................................................. १००

७.२ चांगल्या कृषी पद्धती (Good Agricultural Practices) मानकांची तत्वे .............................. १०१

७.३ शेतकरी उत्पादक गटांसाठी ग्लोबल G.A.P प्रमाणपत्र मिळवण्यासाठीची कार्यप्रणाली................ १०२

७.४ अन्न सुरक्षा, ट्रेसेबिलिटी आणि गॅप (जीएपी) प्रमाणीकरण ................................................ १०३

७.५ अन्न सुरक्षा आणि ट्रेसेबिलिटी ...................................................................................... १०३

७.६ अन्न सुरक्षा आणि अधिकतम कीटकनाशक अवशेष पातळी (MRL) अनुपालन ......................... १०३

**प्रकरण क्रमांक ८ सेंद्रिय शेती पध्दती............................................................................ १०५**

८.१ संकल्पना आणि गरज.................................................................................................. १०५

८.२ सेंद्रिय शेती पद्धती तत्वे ............................................................................................... १०५

८.३ सेंद्रिय शेती व्यवस्थापन................................................................................................ १०५

८.४ सेंद्रिय शेती प्रमाणिकरण करण्यासाठीची कार्यप्रणाली ........ १०८

**प्रकरण क्रमांक ९ चांगल्या पशुसंवर्धन पद्धती ........ १११**

९.१ संकल्पना........ १११

९.२. घरगुती पोल्ट्री, शेळी आणि मेंढी पालन युनिट्सचे व्यवस्थापन........ १११

९.३ कत्तलखाना व्यवस्थापनाच्या पध्दती ........ ११४

**प्रकरण क्र.१० परिशिष्ट........ ११६**

परिशिष्ट क्र.१ खरेदी करणेस मान्यता देणेचा ठराव (प्रपत्र क्र. १)........ ११७

परिशिष्ट क्र.१.१ संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेसाठी सादर करावयाचे पत्र प्रारूप (प्रपत्र क्र. १.१) ........ ११८

परिशिष्ट क्र.२ पुरवठा आदेश मान्यतेचा ठरव (प्रपत्र क्र. २) ........ १२०

परिशिष्ट क्र.३ दर पत्रक मागणी पत्र (प्रपत्र क्र. ३) ........ १२१

परिशिष्ट क्र.३.१ दरपत्रकाचा मसुदा (पुरवठादार यांचा लेटर हेड वर) (प्रपत्र क्र. ३.१) ........ १२३

परिशिष्ट क्र.४ दरपत्रक / निविदा उघडण्याचा नमुना (प्रपत्र क्र. ४)........ १२४

परिशिष्ट क्र.५ तुलनात्मक तक्ता (प्रपत्र क्र. ५)........ १२५

परिशिष्ट क्र.६ पुरवठा आदेश (प्रपत्र क्र. ६) ........ १२६

परिशिष्ट क्र.७ TENDER NOTICE (प्रपत्र क्र. ७) ........ १२८

परिशिष्ट क्र.८ Opening of Technical Bids (प्रपत्र क्र. ८) ........ १३२

परिशिष्ट क्र.९ Name of CBO- (प्रपत्र क्र.९) ........ १३३

परिशिष्ट क्र.१० Opening of Financial Bids (प्रपत्र क्र. १०) ........ १३४

परिशिष्ट क्र.११Combined Evaluation report Name of CBO (प्रपत्र क्र. ११) ........ १३५

परिशिष्ट क्र. १२ On Letter head of CBO (प्रपत्र क्र. १२)........ १३६

# प्रशिक्षण पुस्तिकेची ओळख

**प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुस्तिकेची तोंड ओळख व्हावी यासाठी पुस्तिका तयार करण्यामागील उद्देश, लक्षित गट, पुस्तिकेची रचना इ. बाबतची माहिती या भागात दिली आहे.**

## १.प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने राज्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला आहे. लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नव उद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन प्रमुख पिकांच्या सर्वसमावेशक व स्पर्धात्मक कृषी मुल्यसाखळया विकसित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी शेतकऱ्यांचा समावेश असणाऱ्या समुदाय आधारित संस्थांनी (CBO) पिकाच्या मुल्यसाखळीतील अंतीम खरेदीदारांशी भागीदारी करून समुदाय आधारित संस्था पातळीवर शेती/ शेतीशी निगडीत क्षेत्रात व्यवसाय उभारून व तो चांगल्या पध्दतीने चालवून संस्थेच्या सभासदांचा निव्वळ नफा वाढविण्यासाठी काम करणे अभिप्रेत आहे.

राज्यातील समुदाय आधारित संस्थांनी सदर प्रकल्पात सक्रीय सहभाग घेवून प्रकल्पातील उत्पादक भागीदारी उपप्रकल्प, बाजारपेठ संपर्क वाढीसाठीचा उपप्रकल्प पुरक व नाविन्यपूर्ण गुंतवणूकीसाठीचा उपप्रकल्प, गोदाम आधारित उपप्रकल्प यापैकी एका उप-प्रकल्पाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा उभारणी करणे अभिप्रेत आहे. यासाठी जागतिक बँकेच्या नियमावलीनुसार व शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार समुदाय आधारित संस्थांनी वरीलपैकी एका उप प्रकल्पाची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे. या नियमावली व सुचनेनुसार उप प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यात प्राप्त होणाऱ्या निधीचा सुयोग्य व पारदर्शक विनियिग करावयाचा आहे. सामुदायिक संपादणूक प्रक्रियेचा अवलंब करून वस्तू, सेवा साहित्यांची खरेदी करावयाची आहे. प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यात समाजातील प्रत्येक घटकांचा विशेषतः महिलांचा सहभाग घ्यावयाचा आहे. याचबरोबर व्यवसाय उभारणी आणि संचालना दरम्यान पर्यावरणास कोणतीही हानी होणार नाही याची देखील काळजी घ्यावयाची आहे. या दृष्टीकोनातून समुदाय आधारित संस्थांना निश्चित करण्यात आलेल्या या नियमांची, धोरणांची आणि मार्गदर्शक सूचनांची माहिती होणे महत्वाचे आहे. यासाठी प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प आणि प्रायमूव्ह संस्था, पुणे यांनी जागतिक बँकेच्या सहाय्याने **"स्मार्ट प्रकल्पाच्या क्रॉस कटिंग थीमॅटिक एरिया"** या विषयावरील प्रशिक्षण पुस्तिकेची निर्मिती केली आहे.

## २. प्रशिक्षण पुस्तिकेचा उद्देश

समुदाय आधारित संस्थांच्या प्रमुखांना (संचालकांना) स्मार्ट प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निधी वितरणाचे टप्पे, सामुदायिक संपादणूक प्रक्रिया, सामाजिक व पर्यावरण संरक्षण इ.विषयांची माहिती सोप्या भाषेत उपलब्ध करून देणे हा पुस्तिका तयार करण्यामागील मुख्य उद्देश आहे.

## ३. प्रशिक्षण पुस्तिका कोणासाठी?

स्मार्ट प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या समुदाय आधारित संस्थांचे संचालक, कर्मचारी, सभासद हे या पुस्तिकेचे मुख्य लक्षित गट आहे तसेच प्रकल्पांतर्गत विविध पातळीवर कार्यरत अधिकारी, कर्मचारी तसेच निमशासकीय संस्थांचे प्रतिनिधी यांना देखील आपल्या कार्यक्षेत्रात प्रकल्प अंमलबजावणीचे काम प्रभावीपणे करण्यासाठी या पुस्तिकेचा निश्चितच उपयोग होईल.

## ४. प्रशिक्षण पुस्तिकेत काय आहे?

पुस्तिकेत सुरूवातीला सामुदायिक संपादणूकीची प्रक्रिया मांडण्यात आली आहे. त्यानंतर प्रकल्पाअंतर्गत उप प्रकल्प अंमलबजावणीसाठी टप्पेनिहाय प्राप्त होणारा निधी व त्यासाठीचे निकष विषद करण्यात आली आहेत. तदनंतर प्रकल्पा अंतर्गत, पुस्तिकेच्या पुढील भागात कृषि क्षेत्रात सामाजिक पडताळणी अभ्यासातील मुख्य निरीक्षणे व सामाजिक समावेशन या विषयाची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. यानंतर महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे विशेष धोरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्याची विस्तारित माहिती देण्यात आली आहे. पुस्तिकेच्या शेवटच्या भागात पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अवलंबावयाच्या चांगल्या कृषि व औद्योगीक, सेंद्रिय शेती व पशुसंवर्धन पद्धती नमूद करण्यात आल्या आहेत. या सर्व माहितींचा, सूचनांचा व धोरणांचा अवलंब करून समुदाय आधारित संस्थांनी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे.

# सामुदायिक संपादणूकीची प्रक्रिया

| क्र. | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १ | स्मार्ट प्रकल्पांतर्गत सामुदायिक संपादणूकीची प्रक्रिया |
| २ | स्मार्ट प्रकल्पांतर्गत साहित्य व कामे संपादनाच्या विविध पध्दती |

# प्रकरण क्रमांक १ स्मार्ट प्रकल्पांतर्गत सामुदायिक संपादणूकीची प्रक्रिया

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना सामुदायीक संपादन विषयाची तोंडओळख व्हावी.**

## १.१ प्रस्तावना

जागतिक बँक अर्थसहाय्यीत मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत समुदाय आधारीत संस्थांनी (CBOs) तयार केलेल्या मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पांना राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीकडुन मान्यता घेणे अपेक्षित आहे. या उपप्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी संबंधीत समुदाय आधारीत संस्थांनी करावयाची आहे. सविस्तर प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी करताना समुदाय आधारित संस्थाना साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा इत्यादीची संपादणूक करावी लागणार आहे. सदर संस्थांनी हे काम प्रकल्पासाठी जागतिक बँकेने ठरवून दिलेल्या संपादन प्रक्रियेचा अवलंब करून पूर्ण करणे अनिवार्य आहे. या कामात स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करणाऱ्या यंत्रणांनी (कृषि, पशुसंवर्धन, एमएसआरएलएम, माविम, एमसीडीसी, व्हिएसटीएफ इ.) या संपादन / खरेदी प्रक्रियेत मार्गदर्शनाची आणि सनियंत्रणाची भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे.

राज्यात स्मार्ट हा प्रकल्प हा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविणेत येत असल्याने प्रकल्पांतर्गत प्रस्तावाची सर्व प्रकारची खरेदी करताना प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या "संपादन पुस्तिका" (Procurement Manual) व सामाजिक अंमलबजावणी पुस्तिका (Community Operation Manual) नुसार करावयाची आहे. यासाठी स्मार्ट कार्यालयाने दिनांक २९/०८/२०२२ रोजी समुदाय आधारित संस्थांनी (CBO) मूल्यसाखळी विकासाचा मंजूर उपप्रकल्प राबविताना साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा इत्यादीच्या संपादन (खरेदी) प्रक्रियेसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा तसेच नमुना प्रपत्रांचा आधार घ्यावा. या संपादन मार्गदर्शक सुचना सामाजिक अंमलबजावणी पुस्तिकेच्या (COM) व संपादन पुस्तिकेच्या (PM) अधीन राहून निर्गमित करण्यात आल्या असून प्रत्यक्ष काम करताना काही शंका / संदिग्धता असल्यास सामाजिक अंमलबजावणी पुस्तिका (COM) व संपादन पुस्तिकेमधील (PM) तरतुदी अंतिम असतील.

प्रकल्पांतर्गत करावयाच्या साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा इत्यादी बाबींच्या संपादणूक प्रक्रियेची कार्यपद्धत समजून घेण्यापूर्वी समुदाय आधारित संस्थाना संपादणूक म्हणजे नेमके काय? व त्याचे महत्व, तत्वे व व्याप्ती जाणून घेणे महत्वाचे आहे. चला तर मग सर्वप्रथम सामुदायिक संपादणूकीची संकल्पना समजून घेऊ.

## १.२ संकल्पना

कोणत्याही भौतिक कामांची निर्मितीसाठी साहित्य/ मत्ता/ बांधकाम/ मशिनरीची इ. ची आवशकता असते. याच बरोबर सल्ला व विना सल्ला सेवा देखील घ्याव्या लागतात मात्र अशा साहित्य/ मत्ता/ बांधकाम/ मशिनरीची खरेदी करताना ती योग्य पध्दतीने व विहित वेळेत पार पाडली नाही तर त्यातून निर्माण होणाऱ्या भौतीक कामांची गुणवत्ता खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही परिणामी निर्माण झालेली कामे व सेवावर झालेला खर्च हा अपव्यय ठरतो.

या पार्श्वभूमीवर, सामुदायिक संपादणूक प्रक्रिया अनुषंगिक सेवा घेणाऱ्या संस्थाना खरेदी प्रक्रिया अंमलात आणण्यास आणि ती नियंत्रित करण्यास सक्षम करते यामुळे व्यवहारात पारदर्शकता राहते व जबाबदारी देखील निश्चित होते. यामुळे पैशाचा अपव्यव कमी होतो आणि उत्तम दर्जाचे काम/ सेवा प्राप्त होण्यास मदत होते. स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी होणा-या संस्थाना प्रकल्पातर्गत जी कामे हाती घ्यावयाची आहेत, त्यामध्ये त्यांनी सक्रीय लोकसहभाग घेणे आवश्यक आहे. यासाठी संस्थांनी हातात घेतलेली कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य/ मत्ता/ बांधकाम/ मशिनरीची इ. जागतिक बॅंकेने ठरवून दिलेल्या संपादन प्रक्रियेचा अवलंब करून सर्वानुमते खरेदी करावयाचे आहेत.

कोणत्याही प्रकारच्या व्यवसायिक हेतूसाठी लागणाऱ्या साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा प्राप्त करून घेण्यासाठी जी प्रक्रिया पार पाडावी लागते त्यास 'संपादणूक' असे म्हणतात. ज्यावेळी हि प्रक्रिया लोक/ सामुदायिक सहभागातून पूर्ण केली जाते त्यावेळी त्यास 'सामुदायिक संपादणूक' प्रक्रिया असे म्हणतात.

## १.३ संपादन प्रक्रियेचे गरज व महत्व

जागतिक बॅंक अर्थसहाय्यीत मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थांनी सादर केलेल्या मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पांना राज्यस्तरीय समितीकडून मान्यता देण्यात येते. अशा मंजूर उपप्रकल्पांची अंमलबजावणी संबंधित समुदाय आधारित संस्थांनी करावयाची आहे. या उपप्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक साहित्य, मत्ता, बांधकाम, मशिनरी, विना सल्ला सेवा इ. ची संपादणूक समुदाय आधारित संस्थांनी करावयाची आहे. तसेच स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (कृषी, पशुसंवर्धन, MCDC, VSTF, माविम, MSRLM इ.) यांनी संपादन / खरेदी प्रक्रियेत मार्गदर्शनाची आणि संनियंत्रणाची भूमिका बजावयाची आहे. वाजवी किंमतीत उत्तम दर्जाची वस्तू, सेवा व बांधकाम हे विहित कालावधीत सामुदायिक समूह पातळीवर / अंमलबजावणीच्या ठिकाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संपादन प्रक्रिया ही महत्वाची भूमिका बजावते.

**संपादन प्रक्रिया प्रभावीपणे केल्यास आपणास काय फायदे होतील?**

- सेवा, वस्तू व कामाचे संपादन पारदर्शक पणाने झाल्याने विश्वासर्हता वाढते.
- निधीचा विनियोग योग्य प्रकारे व विहित कालावधीत होतो.
- संपादन धोरणाचे काटेकोर पालन केल्याने प्रकल्प विहित वेळेत पूर्ण होऊ शकतो. योग्य नियोजन, खुली स्पर्धा, जाहीर प्रसिध्दी, सर्व समावेशकता, पारदर्शक प्रक्रिया, सर्वांना समान संधी यामुळे आर्थिक बचत होते.
- याशिवाय नियोजीत काम विहित मुदतीत पूर्ण करून सार्वजनिक पातळीवर विश्वास निर्माण करता येतो.



## १.४ संपादन व खरेदी मधील फरक

माल / वस्तु वा सेवा यांची पैशाच्या मोबदल्यात मालकी मिळविण्याची क्रिया म्हणजे खरेदी होय. संपादन हे प्रशासकीय व आर्थिक बाबीशी निगडीत काम आहे. संपादन म्हणजे नुसती खरेदी नसून त्याची व्याप्ती फार मोठी आहे. कोणतीही वस्तू, कामे आणि सेवा विहित कालावधीत, योग्य/वाजवी दरात उपलब्ध करून घेण्यासाठी कराव्या लागणा-या सर्व कामांचा उदा. प्रत्यक्षातील गरज विचारात घेऊन काय घ्यायचे हे ठरविणे, त्याचा पुरवठादार शोधणे, दरपत्रक / निविदा मागविणे, प्राप्त दरपत्रक / निविदेचे मुल्यांकन करणे, पुरवठादार निश्चिती करून त्यास आदेश देणे, वस्तुची / साहित्याची तपासणी करणे, अनुषंगीक सर्व बाबींचा दस्ताऐवज ठेवणे इ. बाबींचा यात समावेश होतो.

बहुतांश वेळा संपादन आणि खरेदी हे दोन शब्द दैनंदिन व्यवहारात एकाच अर्थाने वापरले जातात. परंतु त्यांत फरक आहे व सदर विषय हाताळणा-या संपादन समितीच्या सदस्यांना/ समुदाय आधारित संस्थेच्या संचालकांना व क्षेत्रीय अधिका-यांना / कर्मचा-यांना यातील फरक माहित असणे गरजेचे आहे. संपादन प्रक्रियेची अंमलबजावणी करताना समुदाय आधारीत संस्थेस मंजूर झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या अमलबजावणीसाठी लागणा-या आवश्यक वस्तू, कामे आणि सेवा विहित कालावधीत, योग्य / वाजवी दरात उपलब्ध करून घेण्यासाठी कराव्या लागणा-या सर्व कामांचा (उदा. मशिनरी घेण्याचे ठरविणे, पुरवठादार शोधणे, दरपत्रक मागविणे, पुरवठा आदेश देणे, मशिनरी तपासून स्विकारणे, अनुषंगीक बाबींचा दस्तावेज ठेवणे इ.) त्यात समावेश होतो.

आर्थिक घटकांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी व निधीच्या बचतीसाठी सामुदायिक संपादन हे एक प्रभावी साधन आहे. प्रकल्पांतर्गत सहभागी होणाऱ्या सामुदायिक आधारित संस्थामध्ये संपादन प्रक्रिया ही

जागतिक बँकेच्या मार्गदर्शक सुचनांच्या आधिन राहून पारदर्शकपणे, सर्वसमावेशकरीत्या, स्पर्धात्मक पद्धतीने व कार्यक्षमरीत्या राबविणे अपेक्षित आहे. कामे, साहित्य आणि सेवा यांचे संपादन करणे अभिप्रेत आहे.

## १.५ संपादनाची / खरेदीची तत्वे व व्याप्ती

स्मार्ट प्रकल्पातील उपप्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी लागणारा निधी समुदाय आधारित संस्थास्तरावर उपलब्ध करून दिला जाणार आहे. या पद्धतीमुळे निर्णयप्रक्रिया व वस्तुंची खरेदी तसेच विविध कामांची उभारणी  सामुदायिक आधारित संस्थास्तरावर होणार असून या प्रक्रियेदरम्यान आवश्यक ती सर्व खरेदी / संपादन जागतिक बँकेच्या नियमावलीच्या आधारे करणे अपेक्षित आहे. त्यामुळे संपादन प्रक्रियेला प्रकल्पांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे.

सामुदायिक संपादन / खरेदी प्रक्रिया राबविताना काही तत्त्वे विचारात घेऊन सामुदायिक आधारित संस्थांनी कामे करावयाची आहे. यात मुख्यत्वे उत्तरदायित्व, स्पर्धात्मक, सातत्य, परिणामकारकता, चांगल्या प्रकारे देवाण-घेवाण, एकता, योग्य व समग्र निर्णय, प्रतिसादाची तयारी, पारदर्शकता या तत्वांचा त्यांनी अवलंब करणे आवश्यक आहे. तसेच वस्तू, सेवा व बांधकामे संपादन करताना त्यांचा योग्य दर्जा, पुरेसे प्रमाण, योग्य वेळ, योग्य दर, योग्य पद्धतीने साहित्य खरेदी, व अन्य सेवा यामध्ये या बाबींचा अवलंब करावा."पैशाची इष्टतम किंवा आदर्श किंमत" या तत्वाचे पालन करण्यासाठी खरेदीदाराने खालील बाबींचे पालन करणे आवश्यक आहे.

- अधिकाधिक स्पर्धेस चालना.
- गरजेनुसार किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची असेल असा देकार स्वीकारणे.
- देकाराचे नि:पक्षपातीपणे आणि सर्वसमावेशक मुल्यांकन वेळीच करणे.
- सर्व संभाव्य खर्चाचा काळजीपूर्वक विचार करणे.
- काळजीपूर्वक स्थापित केलेले मुल्यांकन निकष.
- खरेदीची किंमत किरकोळ विक्री किमतीपेक्षा (MRP)अधिक असू नये.

- बांधकाम, साहित्य खरेदी, सल्ला सेवा यांचे संपादन अधिक परिणामकारकपणे व खर्चाचा विचार करून योग्य किमतीत करावी.
- सहभागी होणारे सर्व पात्र ठेकेदार / निविदा सादर करणारे/प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांना समान संधी उपलब्ध करून देणे तसेच कामे, साहित्य खरेदी इत्यादी बाबतची सर्वांना सारखी माहिती देणे आवश्यक आहे.
- या सर्व संपादन प्रक्रियेमध्ये पारदर्शकता बाळगणे आवश्यक आहे.

समुदाय पातळीवर प्रभावी संपादनासाठी खालील तत्वे गृहीत धरावित.

| | |
|---|---|
| **खुली स्पर्धा -** | संपादन प्रक्रिया ही अत्यंत खुल्या पध्दतीने होणे अपेक्षित आहे. यामध्ये किमान दर प्राप्त होण्यासाठी स्पर्धा घडवून आणणे अभिप्रेत आहे. यासाठी किमान तीन वेगवेगळया पात्र निविदा धारकांकडून दर प्राप्त होणे आवश्यक आहे. |
| **सर्व पात्र निविदाधारकांना सहभागी होण्याची समान संधी** | खुलेपणाने सर्व पात्र पुरवठादार (सेवा/वस्तू) किंवा कंत्राटदार यांना या प्रक्रियेमध्ये भाग घेता आला पाहिजे. |
| **अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील जबाबदार घटकांचा समावेश** | सामुदायिक आधारित संस्थाचे संचालक, व्यवस्थापक, अंमलबाजवणी सुलभीकरण करणाऱ्या यंत्रणेतील अधिकारी / कर्मचारी (प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी इ.) यांचा प्रक्रियेत सक्रीय सहभाग असावा. |
| **पारदर्शकता -** | पारदर्शकता आणि खुलेपणा ही संपादनांची मुख्य अंगे आहेत. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संपादन समिती गठीत करणे, मागविण्यात येणाऱ्या निविदेमधील अटी शर्तीची स्पष्टता निविदा दस्तऐवजामध्ये देणे, सर्व सहभागी निविदाकारांच्या कागदपत्रांची योग्य प्रकारे छाननी करणे, त्याचे योग्य मुल्यांकन करणे व त्यानंतरच पात्र न्युनतम दर देणाऱ्या निविदाधारकास पुरवठा आदेश देणे. या सर्व बाबीचे व्यवस्थित लेखांकन करणे. त्याचे दस्तावेज तयार करणे, कार्यालयात प्रदर्शित करणे व त्याचे जतन करणे यासारख्या बाबींचा यात समावेश होतो. |

### १.५.१ प्रकल्पांतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कामांची व्याप्ती

स्मार्ट प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या समुदाय आधारित संस्थेने सविस्तर प्रकल्प आराखडा अंमलबजावणी दरम्यान विविध साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा यांची सामुदायिक पद्धतीने संपादन/प्रापण करणे अपेक्षित आहे. सर्वसाधारणपणे यात खालील प्रातिनिधिक घटकांचा समावेश असेल.

| वस्तु | कामे | विना सल्ला सेवा व्यतिरिक्त सेवा | सल्ला सेवा |
|---|---|---|---|
| **विविध यंत्रे, ग्रेडर मशीन, मशिनरी, साहित्य इ.** | दुरुस्ती कामे, नवीन गोदाम बांधणे, शीतगृह बांधणे, इ. | भाडोत्री वाहन, भाडेतत्वावर प्रशिक्षण हॉल, लॉजिस्टिक सेवा इ. | सनदी लेखापाल, अभियंता, तांत्रिक सल्लागार इत्यादी |

**जागतिक बँक संपादन नियमावली**

सर्व प्रकारची खरेदी/संपादन प्रक्रिया करण्यासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे जागतिक बँकेच्या संपादन विषयक नियमानुसार सामुदायिक संपादन पद्धतीचा अवलंब करावा. याशिवाय जागतिक बँकेची जुलै २०१६ (ज्यामध्ये नोव्हेंबर २०१७, ऑगस्ट २०१८ व नोव्हेंबर २०२० मध्ये केलेल्या सुधारणा) ची संपादन नियामवली ही प्रकल्पातील सर्व प्रकारच्या वस्तू, बांधकामे, विना सल्ला सेवा, सेवा सल्लागार खरेदी इत्यादी प्रकारच्या सर्व कामांसाठी लागू आहे. याशिवाय आय.बी.आर.डी.कर्ज आय.डी.ए. सदस्य निधी व अनुदान यासंबंधीच्या भ्रष्टाचार प्रतिबंध व कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सूचना या देखिल लागू असतील.

## १.६ संपादन समितीची रचना

प्रकल्पांतर्गत सविस्तर प्रकल्प आराखड्यास मंजुरी मिळाल्यानंतर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व सहभागी समुदाय आधारित संस्था स्तरावर संपाद समितीचे गठन होणे आवश्यक आहे .संपादन समितीमध्ये समुदाय आधारीत संस्था पातळीवरील किमान सात सदस्य असणे आवश्यक आहे. या सोबतच संपादन प्रक्रियेचे काम पुढे घेऊन जाण्यासाठी जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील मुल्य साखळी विकास तज्ञ किंवा या पदावर नियुक्ती झाली नसल्यास संबंधीत मंडळ कृषी अधिकारी / संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेचा क्षेत्रीय कर्मचारी हा तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहातील व तो / ती अतिरिक्त पदसिद्ध सदस्य असेल. संपादन समितीची रचना खालील तक्तयात नमुद केली आहे.

| अ.क्र. | पद | कोणामधून निवडावे |
|---|---|---|
| १ | संपादन / खरेदी समिती अध्यक्ष | संचालकांपैकी एक |
| २ | सदस्य- वित्त | संचालकांपैकी एक |
| ३ | सदस्य -संपदान | संचालकांपैकी एक |
| ४ | सदस्य-महिला | महिला संचालका पैकी एक किंवा महिला संचालक नसल्यास एक महिला भागधारक |
| ५ | सदस्य-अनुसूचित जाती / जमाती | अनुसूचित जाती / जमातीच्या संचालकापैकी एक किंवा अनुसूचित जाती / जमाती संचालक नसल्यास एक अनुसूचित जाती / जमातीचा भागधारक |

| अ.क्र. | पद | कोणामधून निवडावे |
|---|---|---|
| ६ | सदस्य – अल्प भूधारक शेतकरी | अल्प / अत्यल्प भूधारक संचालकांपैकी एक किंवा अल्प / अत्यल्प भूधारक संचालक नसल्यास एक अल्प / अत्यल्प भूधारक असणारा भागधारक |
| ७ | तांत्रिक सल्लागार | जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील मुल्य साखळी विकास तज्ज्ञ किंवा या पदावर नियुक्ती झाली नसल्यास संबंधीत मंडळ कृषी अधिकारी / संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेचा क्षेत्रीय कर्मचारी |
| ८ | सदस्य- सचिव | संचालकांपैकी एक |

## १.७ संपादन समितीच्या जबाबदाऱ्या

समुदाय आधारित संस्था मुख्यत्वे गावांमध्ये / समुदाय पातळीवर स्थित असल्याने ते स्वत: खरेदी करणार आहेत.त्यांना त्यासाठी प्रकल्पामार्फत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तसेच राज्य आणि विभागीय तांत्रिक सहाय्य गटाद्वारे तांत्रिक सहाय्य प्रदान केले जाणार आहे. समुदाय आधारित संस्था साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी/ विना सल्ला सेवा इ. साठी दर पत्रक / निविदा तसेच अनुषंगिक दस्तऐवज तयार करतील आणि वरील यंत्रणांच्या सहकार्याने / तांत्रिक गटाद्वारे संपादणूकीची प्रक्रिया पूर्ण करतील. आवश्यकतेनुसार तांत्रिक आरेखन, स्पेसिफ़िकेशन इ. बाबींचा समावेश करावा. समुदाय आधारित संस्थेने खरेदीपूर्वी वस्तू आणि कामाची योग्य गुणवत्ता (तांत्रिक निकष) सुनिश्चित करण्यासाठी पुरवठा आणि कामांच्या प्रतीची आणि गुणवत्तेची मानके निश्चित करणे अपेक्षित आहे. समुदाय आधारित संस्थेअंतर्गत प्रकल्पाच्या माध्यमातून जी जी कामे विशेषत: खरेदी, बांधकामे व अन्य सेवा घ्यावयाच्या आहेत, त्याबाबतची सर्व जबाबदारी संपादन समितीची असेल. या सर्व प्रक्रियेत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तांत्रिक सहाय्य करेल तसेच संनियंत्रणाचे काम करेल.

संपादन समितीने प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने सर्व संपादन/खरेदी प्रक्रिया करणे अभिप्रेत आहे. यामध्ये खालील महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे.

**संपादन समितीच्या प्रमुख जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील.**

- उपप्रकल्पातील साहित्य, वस्तू, कामे, विना सल्ला सेवा इ.बाबत गरजांचे निश्चितीकरण करणे.
- उप प्रकल्पाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे (खरेदीचा प्राधान्यक्रम निश्चित करून)
- त्यानुसार संपादन आराखडा तयार करणे
- संपादन आराखड्यास समुदाय आधारित संस्थेच्या बैठकीत मंजुरी घेऊन आवश्यकतेनुसार वरील कार्यालयास सादर करणे.
- तांत्रिक तपशिलासह (स्पेसिफिकेशन) निविदा कागदपत्रे तयार करणे व आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडून त्यास पुर्व मान्यता घेणे.
- पुरवठादार व कंत्राटदाराकडून निविदा/कोटेशन किंवा कामास इच्छुक असल्याचा प्रस्ताव मागवणे किंवा या कामासाठी सल्लागारांकडून नेमावयाचा असल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव मागवणे.
- प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची पडताळणी करून तांत्रिक मुल्यमापन करणे व आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडून त्यास पुर्व मान्यता घेणे
- त्यानंतर आर्थिक निविदा उघडून आर्थिक मुल्यमापन करणे तसेच पुरवठा / कार्यारंभ आदेशाचा मसुदा व कराराचा मसुदा तयार करून सक्षम यंत्रणेकडून त्यास पुर्व मान्यता घेणे.
- करारावर स्वाक्षरी करणे, खरेदीचे / पुरवठा आदेश देणे.
- कराराप्रमाणे समुदाय आधारित संस्थेचे मंजूर कामावर / कामाच्या प्रगतीवर देखरेख करणे .
- कामाच्या देयके / बिलांचे प्रदान करणे.
- कामाचा प्रगती अहवाल सादर करणे.
- उपप्रकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रे (संपादन कागदपत्रासह) तयार करणे वा अद्यावत करणे.
- संपादन प्रक्रियेशी संबंधित व अन्य संबंधित कागदपत्रे अंमलबजावणी पश्चात परीक्षण व स्वतंत्र वार्षिक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देणे.
- प्रकल्प समन्वय आणि व्यवस्थापन युनिट, समुदाय आधारित संस्थेस लेखापरीक्षकास खरेदी बाबत मीहिती देणे.
- प्रकल्पा अंतर्गत होणा-या विविध अधिकाऱ्यांच्या भेटी दरम्यान करण्यात आलेल्या संपादन प्रक्रियेची माहिती देणे.

**<u>संपादन समितीने लक्षात ठेवायचे मुद्दे</u>**

- उपप्रकल्पातील साहित्य खरेदी करणेपूर्वी संपादन समितीने साहित्य खरेदी करणेस संचालक मंडळाचा तत्वतः मान्यता दिल्याचा ठराव घेणे अपेक्षित आहे. (**संदर्भ परिशीष्ट क्र.१** नमूना प्रपत्र -१)
- जर पुरवठा आदेशाची रक्कम रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास पुरवठा आदेश देण्यासाठी संचालक मंडळाची मान्यतेचा ठराव घ्यावा. (**संदर्भ परिशीष्ट क्र.२** नमूना प्रपत्र -२)

## १.८ संपादन कृती आराखडा निर्मिती

संपादन कृती आराखडा तयार करणे हे सविस्तर प्रकल्प आराखड्याच्या अंमलबजावणीतील पहिले काम आहे. समुदाय आधारित संस्थेने तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प आराखड्यास राज्यस्तरीय प्रकल्प समितीची मंजुरी मिळाल्या नंतर त्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ करताना संपादन समितीची स्थापना करावी. त्यानंतर संपादन समितीने आराखड्यातील प्रस्तावित केलेल्या वस्तू, बांधकामे, मशनरी व सेवा संदर्भातील कामे विचारात घेवून स्थानिक पातळीवर अंमलबजावणीसाठीचा प्राधान्यक्रम लक्षात घेवून संचालक मंडळाच्या सहकार्याने अंमलबजावणीच्या विविध टप्प्यात करावयाच्या कामांचा संभाव्य खर्चासह संपादन आराखडा तयार करावा. आराखडा तयार करताना त्यामध्ये मुख्यत्वे कामाचा तपशील, त्याची रक्कम, संपादन पद्धत, निविदा उघडण्याची तारिख इ. माहिती द्यावी. संपादन आराखडा तयार करण्याचे काम सोपे व्हावे यासाठीचे नमुना प्रपत्र खाली दिले आहे.

## संपादन आराखडा

**सीबीओ स्तरीय संपादन आराखडा (बांधकामे, वस्तू व सेवा)**

| संदर्भ क्र. | तपशील | संदर्भ क्र. | अंदाजित किंमत (रु. लाखात) | | | संपादन पद्धत | प्रकल्पाद्वारे पुनरावलोकन खरेदी (पूर्व मान्यता / खरेदीनंतर मान्यता) | निविदा उघडण्याची तारीख (अंदाजित) | निविदा निश्चीतीचा दिनांक (अंदाजित) | प्रत्यक्ष करार दिनांक | प्रत्यक्ष करार रक्कम (लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | करार संख्या | एकक किंमत | एकूण किंमत | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | **बांधकामे** | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | **साहित्य / वस्तू आणि उपकरणे** | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | **सल्लागार सेवा** | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

# प्रकरण क्रमांक २ स्मार्ट प्रकल्पातर्गत साहित्य खरेदी व बांधकामे संपादन पध्दती

**या प्रकरणाच्या अभ्यासाअंती प्रशिक्षणार्थींना स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत उपप्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान आवश्यक साहित्य खरेदी, कामे व सल्ला सेवा संपादन करण्यासाठीच्या विविध पध्दती कळतील.**

## २.१ प्रस्तावना

समुदाय आधारित संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजुरी मिळाल्यावर त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना साहित्य / मत्ता / बांधकाम / विना - सल्ला सेवा इ. बाबींसाठीची संपादन प्रक्रिया समुदाय आधारीत संस्थांनी करणे अपेक्षित आहे.

## २.२ समुदाय आधारित संस्था पातळीवर करावयाची प्रातिनिधिक कामे

समुदाय आधारीत संस्थांनी उपप्रकल्पाची अंमलबजावणी करताना करावयाची कामे व त्या अनुषंगाने करावयाची वस्तु / कामे / विना सल्ला सेवा इत्यादी बाबतची नमुना दाखल यादी दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे .

खालील तक्त्यात नमुद केलेली खरेदी करावयाच्या बाबींची यादी ही प्रातिनिधीक स्वरूपातील असून उपप्रकल्प निहाय त्यात बदल होऊ शकतो.

| खरेदीच्या बाबी | वर्णन |
|---|---|
| **वस्तु (Goods)** | विविध यंत्रे, ग्रेडर मशीन, मशिनरी, साहित्य इ. |
| **कामे (Works)** | दुरुस्ती कामे, नवीन गोदाम बांधणे, शीतगृह बांधणे, इ. |
| **विना सल्ला सेवा (Non Consultancy Services)** | भाडोत्री वाहन, भाडेतत्वावर प्रशिक्षण हॉल, लॉजिस्टिक सेवा इ. |
| **सल्लागार सेवा (Consultancy Services)** | सनदी लेखापाल, अभियंता, तांत्रिक सल्लागार इत्यादी |

## २.३ साहित्य, बांधकाम व विना सल्ला सेवा संपादणूकीसाठीच्या पद्धती

समुदाय आधारित संस्थेस मंजुर झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालातील खरेदी करावयाच्या साहित्य / मत्ता / बांधकाम / मशिनरी / विनासल्ला सेवा (Non Consultancy Services) बाबींची किंमत विचारात घेवून संपादन समितीने खरेदीसाठीची योग्य पद्धत निवडावी. हे काम करताना स्थानिकपातळीवर मोठ्या खरेदीचे लहान तुकडे करून टप्प्या टप्प्याने खरेदी होणार नाही याची काळजी घ्यावी. मत्ता व सेवांची खरेदी ही सामाजिक अंमलबजावणी पुस्तिका व संपादन पुस्तिकेनुसार करण्यात यावी.खरेदीचे अंदाजित रक्कम / मुल्य व अनुषंगिक संपादनाची पद्धत खालील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र. | खरेदीची अंदाजित रक्कम | संपादन / खरेदी पध्दत | निविदा दस्तऐवजाचे विहित नमुने |
|---|---|---|---|
| १ | रु. २०,०००/- व त्याहून कमी | थेट खरेदी (दरपत्रके न मागवता) | आवश्यकता नाही. |
| २ | रु. २०,००१ ते<br>रु. ३,००,०००/- पर्यंत | दरपत्रक / शॉपिंग पध्दतीने (स्थानिक पातळीवरील दरपत्रके मागवून) | प्रपत्र - ३ बांधकाम प्रपत्र अ |
| ३ | रु. ३,००,००१ ते<br>रु. ४०,००,०००/- पर्यंत | दरपत्रक / शॉपिंग पध्दतीने जिल्हा स्तरावरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागवून | वस्तू - E- 5<br>बांधकाम - W- 5 |
| ४ | रु. ४०,००,००१ ते<br>रु. ७०,००,०००/- पर्यंत | दरपत्रक / शॉपिंग पध्दतीने विभागीय स्तरावरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागवून | वस्तू - E- 5<br>बांधकाम - W- 5 |
| ५ | रु. ७०,००,००१ ते<br>रु. ७००,००,०००/- पर्यंत | स्थानिक निविदा पध्दतीने राज्य स्तरावरील वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करून | वस्तू - E- 2<br>बांधकाम - W- 2 |

### २.३.१ संपादनाच्या विविध पद्धती

राज्य शासनाच्या योजना राबविताना उपलब्ध आर्थिक मर्यादेपेक्षा जागतिक बँकेच्या प्रकल्पातील प्रस्तावित करण्यात आलेल्या (विशेषत: दरपत्रके मागवून खरेदीची) आर्थीक मर्यादा फारच अधिक आहे. एकीकडे यामुळे कामे लवकर होऊ शकतील तर दुसरीकडे ही खरेदी करताना फार पारदर्शकता ठेऊन अत्यंत जबाबदारीने खरेदी

प्रक्रिया राबविणे अपेक्षित आहे. वरील तक्त्यात नमूद केलेल्या संपादनाच्या विविध पद्धतींची संक्षिप्त माहिती खाली दिली आहे.

**१. थेट खरेदी** :

या पध्दती अंतर्गत प्रकल्पामध्ये लागणाऱ्या रु. २० हजार पर्यंतच्या वस्तू, कामे, विनासेवा सल्ला किंवा सल्लागार सेवा थेट खरेदीदरपत्रके न मागविता सद्सद् विवेकाने करता येईल. तथापि, अशी खरेदी एका आर्थिक वर्षात पुन्हा : पुन्हा करावी लागणार आहे याची पूर्व कल्पना असूनही केवळ खरेदीची अन्य पध्दत टाळण्यासाठी तुकडे पाडून खरेदी करु नये. एका आर्थिक वर्षात अशा प्रकारच्या वस्तुच्या खरेदीचे एकुण मूल्य रु.५० हजार पेक्षा जास्त नसावे.

**२. शॉपिंग पद्धत (स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून ) दरपत्रकाव्दारे खरेदी (आर्थिक मर्यादा रु. २०,००१/- ते रु. ३,००,०००/- पर्यन्त) :**

१) या पध्दतीत दरपत्रकाद्वारे करण्यात येणारी खरेदी करिता पुरवठादार यांच्याकडून आमंत्रित करण्यात येणारे दर मागणी विनंती पत्र (RFQ) सोबत जोडलेल्या नमुन्यात आमंत्रित करावे. (नमुना प्रपत्र ३) स्थानिक पातळीवर त्यामध्ये ज्या बाबींची खरेदी करावयाची आहे त्यानुसार योग्य बदल करण्यात यावेत.

२) दर मागणी  विनंती पत्र कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर, प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करणे बंधनकारक आहे. तसेच समुदाय आधारीत संस्थेच्या संकेतस्थळावर (जर उपलब्ध असल्यास) देखील ती प्रकाशीत करावी. ऑनलाईन उपलब्ध असलेल्या माहितीवरुन तसेच अन्य माहितीच्या स्त्रोतातून माहिती घेऊन अशा पुरवठादारांना इमेलव्दारे आणि ऑफलाईन पत्र देऊन दरपत्रके मागवावित. इमेल वर दर पत्रक विनंती पत्र पाठविताना प्रत्येक पुरवठार यांना वेगवेगळे स्वतंत्र इमेल करावेत जेणेकरून दरपत्रक कोणत्या पुरवठादार यांच्याकडून मागविण्यात आले आहेत हे गोपनीय ठेवता येईल.

३) दर मागणी विनंती पत्रात पुरवठादाराच्या किमान पात्रता अटी नमूद कराव्यात उदा. पॅन कार्ड प्रत, GST नोंदणीपत्र, पूर्व अनुभव इत्यादी बाबी नमूद कराव्यात.

४) RFQ पत्रात खरेदी करावयाच्या बाबीचे मापदंड / Specification द्यावेत परंतु कोणत्याही बँडचे नाव नमुद करु नये, तथापि तसे करणे आवश्यक असल्यास विशिष्ट अथवा वेगवेगळया ब्रँडची नावे लिहून त्यासमोर "समतुल्य" शब्द नमुद करावा.

५) RFQ पत्रात खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

- खरेदीची बाब, त्यांचे मापदंड / Specification, संख्या
- पुरवठादाराची किमान पात्रता
- दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण, अंतिम तारीख व वेळ
- दर पत्रक उघडण्याचे ठिकाण, तारीख व वेळ
- इतर अटी व शर्ती उदा. वस्तू / सेवा पुरवठा करण्याचा कालावधी, वस्तूचा हमीचा कालावधी, देयक अदा करण्याचा कालावधी बाबतचा तपशिल.

६) पुरवठादारांना दरपत्रक सादर करण्यास RFQ पत्र निर्गमित केल्यानंतर कमीत कमी १५ दिवसाचा कालावधी दयावा.

७) कमीत कमी वेगवेगळया तीन पात्र पुरवठादारांकडून दरपत्रक प्राप्त होणे आवश्यक आहे. किमान तीन दरपत्रक प्राप्त न झाल्यास ७ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी व त्याबाबत संबधित पुरवठादार यांना कळविण्यात यावे तसेच कार्यालयीन संकेस्थळावर व सूचना फलकावर त्यास प्रसिद्धी देण्यात यावी. मुदतवाढ देऊन देखील कमीत कमी ३ वेगवेगळया पुरवठादार यांच्याकडून दरपत्रक प्राप्त झाले नाहीत तर अशा वेळी दरपत्रक विनंती पत्रातील काही जाचक अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

८) कमीत कमी ३ दरपत्रके निश्चित केलेल्या वेळेत प्राप्त झाल्यानंतर सर्व दरपत्रके संपादन समिती तसेच उपस्थित असलेल्या पुरवठादार यांच्या समोर निश्चित केलेल्या वेळेत उघडण्यात यावीत व त्याबाबतचा उपस्थिती अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात (नमुना प्रपत्र -४) तयार करून त्यावर उपस्थित सर्वांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात. उघडलेल्या दरपत्रकामधील रक्कम उपस्थितांच्या समोर वाचून त्याची नोंद प्रपत्र “४ ” मध्ये घ्यावी व त्यानंतर पुरवठादार / प्रतिनिधी तसेच संपादन समिती सदस्यांचे स्वाक्षऱ्या घ्याव्यात. दरपत्रकावर खाडाखोड नसावी व व्हाईटनर चा वापर करू नये.

९) दरपत्रक उघडल्या नंतर ज्या पुरवठादारानी दरपत्रक सादर केलेले आहेत त्यांचे एकमेकाशी काही हित संबंध आहे का ते तपासावे उदा. दरपत्रकावर एकच संपर्क क्रमांक, एकच पत्ता किंवा एकाच घरातील व्यक्ती, दोन कंपनीचे मालक /संचालक / भागीदार एकच आहे किंवा ते एकाच घरातील आहेत का? याची पडताळणी करावी. असे असल्यास ही / हे दरपत्रक नाकारण्यात यावीत.

१०) दरपत्रक उघडल्या नंतर RFQ पत्रात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करीत आहेत किंवा नाही याची तपासणी संपादन समितीने करावी व तदनंतर जे पुरवठादार पात्र आहेत अश्या सर्व पुरवठादारानी सादर केलेल्या किमतीची तुलना करावी. दरपत्रकांची तुलना करताना दरपत्रकातील नमुद कर वगळून न्युनतम दरपत्रक (एल-१, एल -२, एल ३....) असे निश्चित करण्यात यावे. तदनंतर प्रपत्र “५" नुसार एकत्रित तांत्रिक व आर्थिक मूल्यमापन अहवाल तयार करून यावरही संपादन समिती सदस्याच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

११) एकत्रित तांत्रिक व आर्थिक मूल्यमापन अहवाल (प्रपत्र ५) नुसार ज्या पुरवठादाराने सर्वात न्युनतम दर सादर केले आहेत अशा पुरवठादारास पुरवठा आदेश सोबत जोडलेल्या नमुन्यात (प्रपत्र ६) प्रमाणे देण्याबाबत सक्षम प्राधिकारी (Competent Authority) यांची मंजुरी घेऊन पुरवठा आदेश निर्गमित करावा. पुरवठा आदेशात दरपत्रक विनंती पत्रात नमूद केलेल्या अटी शर्ती नमूद कराव्यात.

१२) परंतु दरपत्रक उघडल्या नंतर जर कमीत कमी ३ पुरवठादार तांत्रिक दृष्ट्या पात्र होत नसल्यास अशा वेळी दरपत्रक विनंती पत्रातील काही जाचक अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

१३) पुरवठा आदेशानुसार खरेदीची बाब प्राप्त झाल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार वित्तीय नियमावली नुसार कर वजावट करून देयक वेळेवर अदा करण्यात यावे.

**३. शॉपिंग पद्धत जिल्हा / विभाग स्तरावरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागविणे (आर्थिक मर्यादा रु. ३,००,००१/- ते रु.७०,००,०००/- पर्यन्त):**

१) या पद्धतीमध्ये दरपत्रकाद्वारे करण्यात येणारी खरेदीसाठी पुरवठादार यांच्याकडून आमंत्रित करण्यात येणारे RFQ पत्र हे सोबत जोडलेल्या नमुन्यात आमंत्रित करावे (नमुना प्रपत्र- W-5/ E-5 ) त्यामध्ये ज्या बाबींची खरेदी करावयाची आहे त्यानुसार योग्य ते बदल करण्यात यावेत.

२) सदरचे RFQ पत्र संस्थेच्या संकेतस्थळावर (जर उपलब्ध असल्यास) आणि प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे तसेच खरेदीची अंदाजित किंमत ४० लक्ष पर्यंत असल्यास एका स्थानिक वृत्तपत्रात व जर खरेदीची किमत ४० लक्ष पुढे ते ७० लक्ष असल्यास विभागीय स्तरावरील वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून दरपत्रक मागविण्यात यावेत तसेच RFQ पत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करावी. सदर काम सोपे व्हावे यासाठी जाहिरात नमूना (प्रपत्र-७) अन्वये जोडण्यात आलेला आहे.

३) दोन लिफाफा पद्धतीने खरेदी प्रक्रिया करावी. यामध्ये स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लिफाफ्याचा समावेश असावा.

४) आवश्यकतेनुसार निविदा शुल्क आकारण्यात यावे. निविदा शुल्क रोख स्वरुपात अथवा demand draft स्वरुपात निविदेसोबत स्वीकारावे.

५) ईएमडी / इसारा रक्कम / बयाना रक्कम ऐवजी पुरवठादारकडून demand draft स्वरुपात किंवा सोबत जोडलेल्या नमुन्यात स्वयंघोषित Bid Security Declaration घेण्यात यावे.

६) दरपत्रक सादर करण्यास कमीत कमी १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा.

७) RFQ पत्रामध्ये पुरवठादाराची किमान पात्रता अटी नमूद कराव्यात उदा. पॅन कार्ड प्रत, GST नोंदणीपत्र, मागील तीन वर्षाची आर्थिक उलाढाल, पूर्व अनुभव इत्यादी.

८) RFQ पत्रात खरेदी करावयाच्या बाबीचे मापदंड / Specification द्यावेत, परंतु कोणत्याही ब्रँडचे नाव नमुद करु नये, तथापि तसे करणे आवश्यक असल्यास विशिष्ट अथवा वेगवेगळया ब्रँडची नावे लिहून त्यासमोर "समतुल्य" शब्द नमुद करावा.

९) RFQ विनंती पत्रामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

- खरेदीची बाब, त्यांचे वर्णन, संख्या
- दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण, तारीख व वेळ
- दरपत्रक उघडण्याचे ठिकाण, तारीख व वेळ
- इतर अटी व शर्ती उदा. वस्तू / सेवा पुरवठा करण्याचा कालावधी, वस्तूच्या हमीचा कालावधी, देयक अदा करण्याचा कालावधी इत्यादी.

१०) विहित मुदतीत किमान तीन (३) पुरवठादाराकडून दरपत्रके प्राप्त झाली तर पुढील कार्यवाही करावी अन्यथा दरपत्रके मागविण्याच्या मुदतीस ७ दिवस मुदत वाढ द्यावी. त्याबाबत सहभागी संबधित पुरवठादार यांना कळविण्यात यावे त्याकरिता शुद्धीपत्रक प्रकल्प कार्यालयाच्या संकेस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात यावे. मुदत वाढ देण्यापूर्वी दरपत्रक मागणी पत्रातील काही जाचक अटी असल्यास त्याचा फेर आढावा घेऊन संपादन समितीच्या पूर्व मान्यतेने त्यात आवश्यक ते बदल करावेत व किमान तीन दरपत्रके प्राप्त झाल्यावरच पुढील कार्यवाही करावी. 'अशी

मुदतवाढ जास्तीजास्त दोन वेळा देण्यात यावी. दोन वेळेस मुदतवाढ देऊनही ३ (तीन) दरपत्रके प्राप्त न झाल्यास पुढील पध्दतीचा अवलंब करावा.

अ. फक्त एकच (१) दरपत्रके प्राप्त झाल्यास निविदेतील काही जाचक अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

आ. फक्त दोन (२) दरपत्रके प्राप्त झाल्यास प्राप्त दरपत्रकानुसार संपादन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करावी.

११) कमीत कमी ३ दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर किंवा २ वेळा मुदतवाढ देऊन दोन दरपत्रक प्राप्त झाल्यास प्रथम तांत्रिक दस्तऐवज निश्चित केलेल्या वेळेत संपादन समिती तसेच पुरवठादार उपस्थित असल्यास त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत सर्वासमोर उघडण्यात यावेत. याबाबतचा उपस्थिती अहवाल तयार करून त्यावर उपस्थित सर्वांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात. (प्रपत्र-८)

१२) सर्व पुरवठादारांचे तांत्रिक दस्तऐवज उघडल्या नंतर सादर करण्यात आलेले तांत्रिक दस्तऐवज हे RFQ पत्रात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करीत आहेत किवा नाही याची तपासणी संपादन समितीने करावी. त्यानुसार त्याबाबतचा तांत्रिक मूल्यमापन अहवाल तयार करून (नमुना प्रपत्र-९) सक्षम प्राधिकारी (Competent Authority) यांची मंजुरी घेऊन कार्यालयाच्या संकेस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर तांत्रिक मूल्यमापन अहवाल प्रसिद्ध करावा. त्यामध्ये आर्थिक निविदा उघडण्याची दिनांक, वेळ व ठिकाण नमूद करण्यात यावे.

१३) कमीत कमी दोन पुरवठादार तांत्रिकदृष्ट्या पात्र होत नसल्यास अशा वेळी RFQ पत्रातील काही अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करावी.

१४) खरेदी प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारच्या पुरवठादारास / निविदाधारकास कोणत्याही प्रकारची सवलत देऊ नये.

१५) कमीत कमी दोन पुरवठादार तांत्रिकदृष्ट्या पात्र होत असतील तर पात्र पुरवठादारांचे आर्थिक प्रस्ताव संपादन समिती तसेच पुरवठादार उपस्थित असल्यास त्यांच्या समोर निश्चित केलेल्या वेळेत उघडण्यात यावेत (प्रपत्र १०). आर्थिक प्रस्ताव उघडल्या नंतर प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करून (आर्थिक मुल्यांकन अहवाल) तयार करून निविदा रक्कमेनुसार निविदाधारकाची क्रमवारी (एल-१, एल-२, एल ३,...) निश्चित करण्यात यावी (प्रपत्र ११). सदर अहवाल कार्यालयाच्या

संकेतस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर (नमुना प्रपत्र ११) प्रसिद्ध करावा. तसेच सदर आर्थिक मूल्यमापन अहवाल सर्व सहभागी निविदाधारकांना देखील कळवावा.

१६) ज्या पुरवठादाराने सर्वात न्यूनतम दर सादर केला आहे अशा पुरवठादारास पुरवठा आदेश द्यावा. (वस्तु करीता नमुना प्रपत्र - १२ व बांधकामा करीता निविदा दस्तऐवज मधील LOA नमूना)

१७) यशस्वी निविदाधारकाकडून सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात यावी व त्यांचे सोबत करार करण्यात यावा.

१८) पुरवठा आदेशानुसार खरेदीची बाब प्राप्त झाल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार वित्तीय नियमावली नुसार वजावट करून देयक वेळेवर अदा करण्यात यावे.

या पद्धतीचा वापर करताना संपादन प्रक्रियेचा प्रस्ताव रु १० लाख पेक्षा जास्त रक्कमेचा असल्यास मुद्दा क्र २.४ मध्ये नमूद केल्यानुसार खरेदी प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मान्यता (Prior Review) घेणे अपेक्षीत आहे.

**४. राज्यस्तरावरील वृत्तपत्रात निविदा प्रसिद्ध करून निविदा मागविणे (आर्थिक मर्यादा रु.७०,००,००१/- ते ७ कोटी पर्यंत)**

या पद्धतीमध्ये खरेदी हि स्थानिक स्पर्धात्मक निविदा (Local Competitive Bidding) पद्धतीने खालील प्रमाणे करावी लागेल.

१) जागतिक बँकेने निश्चित केलेल्या निविदा दस्तऐवज वापरणे बंधनकारक आहे. नमुना दस्त ऐवज पुस्तिके सोबत जोडण्यात आलेले आहेत. (W-2/ E-2)

२) निविदा सूचना जाहिरात एका राज्यस्तरावरील वृत्तपत्रात प्रसिद्ध (जाहिरात नमुना प्रपत्र -७) करण्यात येऊन निविदा दस्तऐवज समुदाय आधारित संस्थेच्या संकेतस्थळ (जर उपलब्ध असल्यास) आणि प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून निविदा मागवाव्यात.

३) निविदा दोन लिफाफा पद्धतीने मागविण्यात यावी यामध्ये तांत्रिक व आर्थिक लिफाफ्याचा समावेश असावा.

४) आवश्यकतेनुसार निविदा शुल्क आकारण्यात यावे. निविदा शुल्क रोख स्वरुपात अथवा demand draft स्वरुपात निविदेसोबत स्वीकारावे.

५) ईएमडी / इसारा रक्कम / बयाना रक्कम ऐवजी पुरवठादारकडून demand draft स्वरुपात किंवा सोबत जोडलेल्या नमुन्यात स्वयंघोषित Bid Security Declaration घेण्यात यावे.

६) निविदा प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारच्या निविदाधारकास कोणत्याही प्रकारची सवलत देऊ नये.

७) पुरवठादारास निविदा सादर करण्यास निविदा प्रसिद्ध केल्यापासून कमीत कमी ३० दिवस एवढा कालावधी देण्यात यावा.

८) संभाव्य पुरवठादार / ठेकेदार समवेत निविदा पूर्व बैठकीचे आयोजन करण्यात यावे. सदरच्या बैठकीची तारीख निश्चित करताना बैठकीनंतर पुरवठादार / ठेकेदार यांना निविदा सादर करण्यास बैठकीचा अहवाल प्रसिद्ध केल्यापासून कमीत कमी १० दिवसांचा कालावधी देण्यात दयावा.

९) विहित मुदतीत किमान तीन (३) पुरवठादाराकडून निविदा प्राप्त झाली तर पुढील कार्यवाही करावी अन्यथा निविदा सादर करण्याच्या मुदतीस ७ दिवस मुदत वाढ द्यावी. त्याकरिता शुद्धीपत्रक प्रकल्प कार्यालयाच्या संकेस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात यावे. ज्या पुरवठादार यांनी निविदा सादर केल्या आहेत त्यांना मुदत वाढीबाबत कळविण्यात यावे. मुदतवाढ देण्यापूर्वी निविदा दस्तऐवज मधील काही जाचक अटी असल्यास त्याचा फेर आढावा घेऊन संपादन समितीच्या पूर्व मान्यतेने त्यात आवश्यक ते बदल करावेत. किमान तीन निविदा प्राप्त झाल्यावरच पुढील कार्यवाही करावी. अशी मुदतवाढ जास्तीजास्त दोन वेळा देण्यात यावी. दोन वेळेस मुदतवाढ देऊनही ३ (तीन) निविदा प्राप्त न झाल्यास पुढील पध्दतीचा अवलंब करावा.

अ. फक्त एकच निविदा प्राप्त झाल्यास निविदेतील काही जाचक अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

आ. फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्यास पुढील संपादन प्रक्रिया करण्यात यावी.

१०) कमीत कमी २/३ निविदा प्राप्त झाल्यानंतर प्रथम तांत्रिक दस्तऐवज निश्चित केलेल्या वेळेत संपादन समिती तसेच पुरवठादार उपस्थित असल्यास त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत सर्वासमोर उघडण्यात यावेत. याबाबतचा उपस्थिती अहवाल तयार करून त्यावर उपस्थित सर्वांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात. (प्रपत्र-८)

११) निविदा मूल्यमापन निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानुसार करण्यात यावे.

१२) सर्व पुरवठादारांचे तांत्रिक दस्तऐवज उघडल्यानंतर सादर करण्यात आलेले तांत्रिक दस्तऐवज हे निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करीत आहेत किंवा नाही याची तपासणी संपादन समितीने करावी. त्यानुसार त्याबाबतचा तांत्रिक मूल्यमापन अहवाल तयार करून (नमुना प्रपत्र ९) व सक्षम प्राधिकारी (Competent Authority) यांची मंजुरी घेऊन प्रकल्प कार्यालयाच्या संकेस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर तांत्रिक मूल्यमापन अहवाल प्रसिद्ध करावा. त्यामध्ये आर्थिक निविदा उघडण्याची दिनांक, वेळ व ठिकाण नमूद करण्यात यावे.

१३) कमीत कमी दोन पुरवठादार तांत्रिकदृष्ट्या पात्र होत नसल्यास अशा वेळी निविदा दस्तऐवजातील काही अटींचा फेर आढावा संपादन समितीने घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करून नवीन खरेदी प्रक्रिया करावी.

१४) कमीत कमी दोन पुरवठादार तांत्रिक दृष्ट्या पात्र होत असतील तर पात्र पुरवठादारांचे आर्थिक प्रस्ताव संपादन समिती तसेच पुरवठादार उपस्थित असल्यास त्यांच्या समोर निश्चित केलेल्या वेळेत उघडण्यात यावेत (प्रपत्र १०). आर्थिक प्रस्ताव उघडल्यानंतर प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करून (आर्थिक मुल्यांकन अहवाल) तयार करून निविदा रक्कमेनुसार निविदाधारकाची क्रमवारी (एल-१, एल-२, एल ३,...) निश्चिती करण्यात यावी (प्रपत्र ११). सदर अहवाल कार्यालयाच्या संकेतस्थळावर व कार्यालयाच्या सूचना फलकावर (नमुना प्रपत्र ११) प्रसिद्ध करावा. तसेच सदर आर्थिक मूल्यमापन अहवाल सर्व सहभागी निविदाधारकांना देखील कळवावा.

१५) ज्या पुरवठादाराने सर्वात न्यूनतम दर सादर केला आहे अशा पुरवठादारास पुरवठा आदेश द्यावा. (वस्तु करीता नमुना प्रपत्र - १२ व बांधकामाकरीता निविदा दस्तऐवज मधील LOA नमूना)

१६) यशस्वी निविदाधारकाकडून सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात यावी व त्यांचे सोबत करार करावा.

१७) पुरवठा आदेशानुसार खरेदीची बाब प्राप्त झाल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार वित्तीय नियमावली नुसार वजावट करून देयक वेळेवर अदा करावे.

या पद्धतीचा वापर करताना मुद्दा क्र २.४ मध्ये नमूद केल्यानुसार खरेदी प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सक्षम प्राधिका-याची पूर्व मान्यता (Prior Review) घेणे बंधनकारक राहील.

## २.४ संपादन प्रक्रीया अंमलात आणताना विचारात घ्यावयाचे महत्वाचे मुद्दे

समुदाय आधारित संस्थेच्या प्रतिनिधीने साहित्य / मत्ता / बांधकाम / मशीनरी / विना सल्ला सेवा इ. च्या खरेदी / संपादनासाठी विविध संपादन पद्धतीचा अवलंब करताना खालील बाबी व प्रक्रिया विचारात घ्याव्यात.

**१. खरेदी प्रक्रीया राबविणेसाठी पुर्व मान्यता (Prior Review) :-** खरेदीच्या पूर्व अवलोकनाची मर्यादा प्रकल्पाच्या प्रापण पुस्तिका व प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार खाली नमूद केलेल्या तक्त्यानुसार असेल. अशा पुर्व मान्यतेमध्ये दर पत्रक विनंती पत्रक / निविदा दस्तऐवजास, तदनंतर तांत्रिक मूल्यमापन अहवालास, आर्थिक मूल्यमापन अहवालास व पुरवठा आदेशाच्या प्रारूपास प्रत्येक टप्प्यावर पुर्व मान्यता (Prior Review) घेणे आवश्यक आहे. खरेदीची रक्कम / मुल्य आणि पूर्व मान्यतेचे अधिकार दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे.

| अ.क्र. | संपादन अंदाजित रक्कम | पूर्व मान्यतेचे अधिकार |
|---|---|---|
| १ | रु. १०,००,०००/- पर्यंत | संचालक समिती - समुदाय आधारित संस्था |
| २ | रु. १०,००,००१/- ते रु ७०,००,०००/- पर्यंत | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष |
| ३ | रु. ७०,००,००१/- व त्यापेक्षा जास्त | प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष |

संपादन नियमावलीनुसार रु. १० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या संपादन प्रक्रियेच्या खालील टप्प्यावर संबधीत प्राधिकाऱ्याची / कार्यालयाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.

**२. बांधकामांच्या अंदाजत्रकास तांत्रिक मान्यतेबाबत:**

प्रकल्पात प्रस्तावित बांधकाम SSR दरानुसार करावे, कामांची अंदाजपत्रके खाजगी सनदी अभियंत्यांकडून करून घ्यावीत. तथापि, अनुदानाची परिगणना शासकीय योजनेतील बाबनिहाय मापदंडानुसार करण्यात येत आहे. हि बाब विचारात घेऊन प्रस्तावित उपप्रकल्पातील बाबींना अथवा एकूण प्रकल्पाला स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. कामाची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने सनियंत्रण करण्यासाठी संस्थानी सनदी अभियंत्याच्या (Chartered Engineer) सेवा घेणे अपेक्षित आहे.

**३. दर मागणी पत्राचा / निविदा दस्तऐवज प्रारूप:**

समुदाय आधारित संस्थेचा उपप्रकल्प मंजूर झाल्यानंतर त्यामधील प्रस्तावित बाबींच्या अंमलबजावणीसाठी संपादन प्रक्रिया राबविताना CBO प्रथम निविदा दस्तऐवजाचा / दर मागणी पत्राचा मसुदा तयार करून जिल्हा अंमलबजावणी कक्षामार्फत तपासणी करून घेण्यासाठी संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडे पूर्व

संमती घेण्या करीता सादर करेल. प्राप्त प्रस्तावाची तपासणी करून प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत रु.७० लाखापर्यंतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल व रु. ७० लाखपेक्षा जास्त रक्कमेचे प्रस्ताव संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्षाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात येईल.

**४. तांत्रिक मूल्यमापन अहवाल:**

समुदाय आधारित संस्थेने मंजूर केलेल्या दर मागणी पत्राचा / निविदा दस्तऐवजानुसार जाहिरात प्रसिद्ध करून संपादन प्रक्रिया सुरु करावी. सदर प्रक्रियेंतर्गत समुदाय आधारीत संस्थेचे संपादन समिती सदस्य व निविदाधारकांच्या उपस्थितीत सर्व प्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात याव्यात व त्या निविदांची तपासणी संपादन समितीव्दारे दर मागणी पत्राचा / निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अटी-शर्ती नुसार करण्यात यावी. त्यानंतर त्याबाबतचा तांत्रिक मुल्यांकन अहवाल तयार करून त्यामध्ये पात्र / अपात्र निविदा नमूद करण्यात याव्यात. सदरचा तांत्रिक मूल्यमापन अहवाल पूर्व मान्यतेकरीता जिल्हा अंमलबजावणी कक्षामार्फत संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडे मंजुरीसाठी सादर करावा. सदरचा तांत्रिक मूल्यमापन अहवाल पूर्व मान्यतेसाठी सादर करताना सोबत प्राप्त निविदांच्या एका छायांकित प्रत (फाईल) सादर करण्यात यावी. प्राप्त तांत्रिक मूल्यमापन अहवालाची / प्रस्तावाची तपासणी करून संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत रु.७० लाखापर्यंतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल व रु.७० लाखपेक्षा जास्त रक्कमेचे प्रस्ताव संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्षाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात येईल.

तांत्रिक मुल्यांकन अहवालास पूर्व मान्यता मिळाल्यानंतर सदर तांत्रिक मुल्यांकन अहवाल प्रसिद्ध करून पात्र / अपात्र निविदाधारकांना कळविण्यात यावा. तसेच पात्र निविदाधारकांना आर्थिक निविदा उघण्याचे वेळापत्रक देखील कळविण्यात यावे.

**५. आर्थिक मूल्यमापन अहवाल, कार्यारंभ / पुरवठा आदेशाचे प्रारूप व कराराच्या मसुद्याबाबत:**

निर्धारित केलेल्या वेळेस आर्थिक निविदा समुदाय आधारीत संस्थेच्या संपादन समिती सदस्य व तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकांच्या उपस्थितीत उघडण्यात याव्यात. त्याचा तुलनात्मक तक्ता (आर्थिक मुल्यांकन अहवाल) तयार करून निविदा रक्कमेनुसार निविदाधारकाची क्रमवारी (एल-१, एल - २, एल ३,...) निश्चित करण्यात यावी. तदनंतर सदर आर्थिक मुल्यांकन अहवाल, कार्यारंभ आदेशाचे प्रारूप तसेच कराराचा मसुदा जिल्हा अंमलबजावणी कक्षामार्फत संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडे मंजुरीसाठी सादर करावा. प्राप्त प्रस्तावाची तपासणी करून संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत रु.७० लाखापर्यंतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल व रु.७० लाखपेक्षा जास्त रक्कमेचे प्रस्ताव संबधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत प्रकल्प समन्वयन व

व्यवस्थापन कक्षाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात येईल. आर्थिक मुल्यांकन अहवाल, कार्यारंभ आदेशाचे प्रारूप तसेच कराराचा मसुद्यास प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबधीत समुदाय आधारित संस्थेव्दारे संबधीत पुरवठादारास कार्यादेश निर्गमित करावा.

**६. देयक अदायगी :**

पुरवठा आदेशानुसार योग्य दर्जाचे साहित्य योग्य परीमाणात पुरवठा झाल्याची खात्री करावी. अशी खात्री करण्यासाठी आवश्यक तिथे तांत्रिक सहाय्य हे योग्य त्या तज्ञांकडून / संस्थेकडून घ्यावे. बांधकमो व साहित्याची देयके अदा करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

**६.१ बांधकामाची देयके अदायगीबाबत -**

- समुदाय आधारित संस्थाकडून नियुक्त केलेल्या सनदी अभियंत्याकडून मापन पुस्तिकेत नोंदी घेण्यात याव्यात.
- सदर नोंदी विभागीय अंमलबजावणी कक्षाच्या स्तरावरील / बाजार क्षेत्र अभियंत्याकडून नोंदी तपासून व प्रमाणित करून घ्याव्यात.
- देयके अदायागीसाठी आवश्यक ती प्रमाणपत्र संबधीत संस्थेकडून प्राप्त करून घेऊनच विहित कर कपाती करूनच देयके अदा करण्यात यावी.

**६.२ साहित्य खरेदीची देयके अदायगीबाबत**

- साहित्यांच्या नोंदी साठा नोंदवहीत (Stock Register) कराव्यात. तसेच बिलाच्या मागील बाजूस खालीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात यावे. प्रमाणित करण्यात येते की,

➢ सदरचा खर्च हा उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी केला आहे.

➢ देयकात नमूद केलेल्या वस्तु सुस्थितीत प्राप्त झालेल्या असून त्याची नोंद साठा नोंदवहीत (Stock Register) पृष्ट क्र. .... वर घेण्यात आली आहे.

➢ देयकात नमूद केलेले दर योग्य असून देयक पारित करण्यास हरकत नाही.

- पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार पुरवठा झाल्यानंतर बिलाची अदायगी करावी. जीएसटी व अन्य करांबाबत शासकीय नियमांचे पालन करावे.

**७. प्रशासकीय व आकस्मिक खर्च:** उपप्रकल्पाच्या प्रशासकीय व आकस्मिक खर्चाच्या तरतुदीतून (Pre Operating Expenditure) केलेल्या किरकोळ खरेदीच्या पुरवठादारास GST लागू नसल्यास (उलाढाल

रु.२०.०० लक्षच्या आत असेल तर) जी.एस.टी. नियमावलीनुसार जी.एस.टी. नोंदणी करणे आवश्यक नसल्याचे प्रमाणपत्र घेऊन देयक पारित करावे. पुरवठादारास द्यावयाच्या देयकाची रक्कम अदा करताना रु.५,०००/- पर्यंत रोखीने व्यवहार करणेस हरकत नाही. रु.५,०००/- पेक्षा अधिकची रक्कम देय असल्यास धनादेशाद्वारे / आरटीजीएस / एनईएफटी / इतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अदा केली जावी.

**८. जतन करावयाचे अभिलेखे:** समुदाय आधारीत संस्था (CBO) स्तरावर खरेदी करण्यात येणाऱ्या सर्व बाबींच्या संपादन अभिलेखांचे व्यवस्थितरित्या जतन करण्यात यावे. सदर अभिलेखे वेळोवेळी प्रकल्पाशी संबधित अधिकारी / कर्मचारी यांना तपासणीसाठी व लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत. खरेदीच्या प्रत्येक स्तरावर खालील दस्ताऐवज कायमस्वरुपी ठेवण्यात यावे.

- खरेदी प्रक्रियेस मंजुरी देण्याबाबतची नस्ती
- खरेदी बाबतची जाहिरात
- दरपत्रक विनंती / मागणी पत्र
- दरपत्रक / विनंती पत्र समक्ष दिल्यास पुरवठादाराची त्याबाबतची पोहोच
- सादर केलेल्या निविदा / दरपत्रके
- दरपत्रक / निविदांचे मुल्यमापन अहवाल
- खरेदी समित्यांच्या बैठकांचे इतिवृत्त
- कार्यारंभ आदेश / पुरवठा आदेश
- पुरवठादारासोबत केलेला करारनामा
- वस्तु पुरवठा झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन
- वस्तु प्राप्त झालेबाबत साठा नोंदवहीतील (Stock Register) नोंदी
- कन्सुमेबल नोंदवही
- पुरवठादारांना केलेली प्रदाने
- आवश्यकतेनुसार वस्तुंचे /उपकरणांचे / औजारांचे / साहित्यांचे गुणवत्ता अहवाल (Test Report)
- वस्तु व उपकरणांचे कार्यान्वयन झाल्याचे प्रमाणपत्र (Installation Report)

**९. इतर बाब:** संपादन / खरेदीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असावी. खरेदी करावयाच्या वस्तु स्वतःसाठी खरेदी करताना व त्यासाठी खर्च करताना जी काळजी घेतली जाते तशी काळजी सारासार विचार करून सदसदविवेक बुद्धीने (Prudence) निर्णय घेऊन खरेदी करावी. संपादणूक प्रक्रियेच्या सुलभीकरणासाठी आवश्यक नमुना प्रपत्रे **परिशिष्ट १ ते १२** मध्ये जोडली आहेत.

## २.५ समुदाय पातळीवर साहित्य व कामे खरेदीसाठी संपादनापूर्वीची, दरम्यान व संपादनानंतरची प्रक्रिया:

समुदाय आधारित संस्थेने बांधकाम व साहित्य संपादन प्रक्रिया प्रभावीपणे करण्यासाठी संपादनापूर्वी, दरम्यान व नंतर खालील कामे करणे अपेक्षित आहे.

| अ. बांधकामाचे संपादन | मशिनरी व इतर साहित्याचे च्या संपादनासाठीची |
|---|---|
| **पूर्व तयारी-** | |
| • सर्वप्रथम मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालाचे अवलोकन करावे – विशेषतः प्रस्तावित कामाचा तांत्रिक तपशील – ( लांबी, रुंदी, उंची व किंमत)<br>• कामाचे अदांजपत्रक पाहावे (व्यवसाय आराखडयातील तरतूद विचारात घ्यावी)<br>• निविदा दस्तऐवज व निविदा सुचना तयार करावे.<br>• त्यास सक्षम यंत्रणेची पूर्वमान्यता घेणे– आवश्यकतेप्रमाणे | • सर्वप्रथम मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालाचे अवलोकलन करावे - साहित्याची संख्या, क्षमता, नग इ.<br>• आराखडयात नमुद क्षमता व नग व इतर तांत्रिक तपशील विचारात घेवून खरेदी करावयाच्या साहित्याचे अंदाजित किंमत पाहून व संपादणूक पध्दत निश्चित करून दरपत्रक/निविदा तयार करावी.<br>• पुरवठादारांकडून मशनरी/साहित्याची दरपत्रके/ कोटेशन/ निविदा मागविण्यासाठी प्रती तयार कराव्यात.<br>• सक्षम यंत्रणेची पूर्वमान्यता घेणे– आवश्यकतेप्रमाणे |
| **प्रत्यक्षातील संपादन प्रक्रिया-** | |
| • कामाची निविदा सुचना प्रसिध्द करणे (वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करणे, संस्था कार्यालय इ.)<br>• निविदा स्विकारणे.<br>• निश्चित केलेल्या तारखेस निविदा उघडाव्यात.<br>• प्राप्त कोटेशनचे तांत्रिक मूल्यांकन करणे - इतिवृत्त, उपस्थिती प्रपत्र व तांत्रिक मुल्यांकन अहवाल तयार करावा व आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडून त्यास पूर्व मान्यता घ्यावी.<br>• तदनंतर आर्थिक निविदा उघडून आर्थिक मुल्यमापन करणे तसेच कार्यारंभ आदेशाचा मसुदा व कराराचा मसुदा तयार करून सक्षम यंत्रणेकडून त्यास पूर्व मान्यता घेणे.<br>• काम सुरू करणेबाबातचा ठेकेदारास आदेश द्यावा.<br>• ठेकेदाराने कंपनीच्या नावाने सुरक्षा ठेव रक्कम कंपनीच्या खात्यावर जमा करावे. | • पुरवठादारांना दरपत्रक देणे / आवशकतेनुसार रक्कम पाहून वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करावी.<br>• पुरवठादाराकडून विहीत कालमर्यादेपर्यंत प्राप्त झालेली भरलेले दरपत्रके / निविदा जमा करावी.<br>• निश्चित केलेल्या तारखेस दरपत्रके / निविदा उघडावा.<br>• प्राप्त दरपत्रके / निविदाचे तांत्रिक मुल्यांकन करणे - इतिवृत्त, उपस्थिती प्रपत्र व तांत्रिक मुल्यांकन अहवाल तयार करावा व आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडून त्यास पूर्व मान्यता घ्यावी.<br>• तदनंतर आर्थिक निविदा उघडून आर्थिक मुल्यमापन करणे तसेच पुरवठा आदेशाचा मसुदा व कराराचा मसुदा तयार करून सक्षम यंत्रणेकडून त्यास पूर्व मान्यता घेणे.<br>• मशनरी व साहित्याचा पुरवठा करणेबाबतचा पुरवठादारास आदेश द्यावा. |

| **कामाची अंमलबजावणी-** | |
|---|---|
| • कामास प्रारंभ करावे.<br>• संचालक मंडळाने चालु कामाचे संनियंत्रण करावे.<br>• प्रकल्प अंमलबजावणी कक्षाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन व संनियंत्रण घ्यावे.<br>• मोजमाप नोंदवही तयार करून घ्यावी.<br>• तयार केलेल्या बिलानुसार टॅक्सेसचा भरणा करावा.<br>• ठेकेदारास बील अदा करावे.<br>• उर्वरीत कामाची पूर्तता व मोजमाप नोंदवही तयार करून घ्यावी.<br>• काम पूर्ण झाल्याची खात्री करावी.<br>• टॅक्सेस भरून उर्वरीत बील अदा करावे. | • मशिनरी व साहित्य पोहचल्यावर पुरवठा आदेशानुसार तपासून घ्यावेत डिलिव्हरी चलन घेणे तशी पुरवठादारास पोच द्यावी.<br>• मशनरी साहित्य बसविणे व त्याची कार्यान्वयन चाचणी घ्यावी.<br>• मशनरी चालविण्याचे प्रशिक्षण गरजेनुसार पुरवठा आदेशानुसार द्यावे.<br>• तसेच बिल प्राप्त करून त्याचे पेमेंट अदा करावे व मशनरीच्या / साहित्याच्या वापरास प्रारंभ करावा.<br>• संनियंत्रण व हमी कालावधीत अडचणी आल्यास पुरवठादारास कळविणे व विहीत कालावधीत त्याची दुरूस्ती करावी.<br>• गरजेनुसार मशनरीच्या निगराणीसाठी वार्षिक देखभाल करारनामा करणे. |

## २.६ संपादन पध्दतीतील महत्वाची कागदपत्रे / रेकॉर्ड:

समुदाय आधारित संस्थेने बांधकाम व साहित्य संपादना बाबत त्यांच्या स्तरावर खालील महत्वाची कागदपत्रे / रेकॉर्ड ठेवणे अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| १. मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल.<br>२. संपादन आराखडा.<br>३. दर पत्रक विनंती / मागणी पत्रक<br>४. दरपत्रक विनंती पत्र समक्ष दिल्यास पुरवठादाराची त्याबाबतची पोहोच<br>५. सादर केलेल्या निविदा / दरपत्रके<br>६. दरपत्रक/ निविदांचे मुल्यमापन अहवाल<br>७. खरेदी समित्यांच्या बैठकांचे इतिवृत्त<br>८. कार्यारंभ आदेश / पुरवठा आदेश<br>९. पुरवठादारासोबत केलेला करारनामा | १०. वस्तु पुरवठा झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन<br>११. वस्तु प्राप्त झालेबाबत साठा नोंदवहीतील (Stock Register) नोंदी<br>१२. कन्सुमेबल नोंदवही<br>१३. पुरवठादारांना केलेली प्रदाने<br>१४. आवश्यकतेनुसारवस्तुंचे / उपकरणांचे/ औजारांचे / साहित्यांचे गुणवत्ता अहवाल (Test Report)<br>१५. वस्तु व उपकरणांचे कार्यान्वीत प्रमाणपत्र (Installation Report) |

# निधी वितरणाची कार्य पद्धत

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १ | स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थांसाठी निधी वितरणाची कार्य पद्धत |

# प्रकरण क्रमांक ३ स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थांसाठी निधी वितरणाची कार्यपद्धत

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना स्मार्ट प्रकल्पांतर्गत मुल्यसाखळी विकासासाठीच्या विविध उपप्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे स्वरूप व ते प्राप्त करून घेण्यासाठीची प्रक्रिया स्पष्ट होईल.**

## ३.१ प्रस्तावना

स्मार्ट या प्रकल्पांतर्गत पारंपारिक कृषी व्यवस्थेचे बळकटीकरण करून ती अधिकाधिक बाजापेठभिमुख बनवणे आणि मुल्यसाखळीतील खाजगी क्षेत्राचा सहभाग अधिक व्यापक करण्यावर भर दिला आहे. त्यासाठी मात्र शेतक-यांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या समुदाय आधारित संस्थांच्या माध्यमातून काढणीपश्चात हाताळणी, मुल्यवृध्दी आणि प्राथमिक प्रक्रिया केलेला माल संघटीत खरेदीदार, प्रक्रिया उद्योजक, निर्यातदार इ. यांना पुरवठा करण्याची व्यवस्था निर्माण करणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने अशा समुदाय आधारित संस्थांनी आपला नियोजित व्यवसाय सुरू करण्यासाठी समुह पातळीवर एकत्रित येऊन निधी प्राप्त करून घेण्यासाठी स्मार्ट प्रकल्पांकडे प्रस्ताव सादर करणे अभिप्रेत आहे. हे काम करत असताना समुदाय आधारीत संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महिला शेतकरी, दुर्बल घटक, अनुसूचित जाती आणि जमाती इत्यादींना सहभागी करणे अभिप्रेत आहे. प्रकल्पांतर्गत निवडीचे मुलभूत निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या नियमाने समुदाय आधारित संस्थांची निवड केली जाईल. स्मार्ट प्रकल्पांतर्गत निवड होणाऱ्या संस्थांनी प्रकल्पाकडून निधी प्राप्त करून घेण्यासाठी खालील उपघटकावर आधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे अपेक्षित आहे.



| उत्पादक भागीदारी उपप्रकल्प (पी.पी.) | बाजार संपर्क वाढ उपप्रकल्प (एम.ए.पी.) | धान्य गोदाम आधारित उप प्रकल्प (डब्ल्यु.बी.बाय.) | नाविन्यपूर्ण पूरक उपप्रकल्प (सी.आय.आय.) |
|---|---|---|---|
| खरेदीदारांना जितका शेतमाल लागतो व ज्या दर्ज्याचा लागतो, तो शेतमाल जे शेतकरी एकत्र येऊन पुरवठा करण्यास तयार आहेत अशा समुदाय आधारित संस्थाना काढणी पश्चात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदानाचे वितरण करणे. | शेतक-याला सध्या विक्री करीत असलेल्या बाजारापेक्षा नवीन बाजारपेठेशी जोडण्यासाठी संबंधित बाजारपेठेस आवश्यक अशा गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी तांत्रिक सहाय्य व काढणीपश्चात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदानाचे वितरण करणे. | ग्राम पातळीवर विकेंद्रीत स्वरूपात शेतमाल साठवणूकीच्या सुविधा उपलब्ध करून देणे व गोदाम पावतीचा लाभ देणे. | विशेषत: उत्पादक भागीदारी उपप्रकल्प व बाजार संपर्क वाढ उपप्रकल्प या अंतर्गत विकसित करावयाच्या मूल्य साखळया मधील ज्या बाबींना अनुदान प्रस्तावित केलेले नाही परंतु त्या बाबी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञाना वर आधारित आहेत अशा बाबींसाठी नाविन्यपूर्ण पूरक उपप्रकल्प म्हणून अनुदान देणे. |

समुदाय आधारित संस्थाना त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार टप्पे निहाय निधी प्राप्त करून घेण्यासाठीची कार्यपद्धत या प्रकरणात सविस्तर मांडण्यात आली आहे.

## ३.२ उपप्रकल्प निहाय अनुदानाचे स्वरूप व टप्पे

स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत समुदाय आधारित संस्थांनी निवडलेल्या उपप्रकल्पावर आधारित सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. या सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तसेच राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीकडून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर एकूण प्रकल्प खर्चाच्या जास्तीत जास्त ६०% निधी हा अनुदान स्वरुपात संबंधित समुदाय आधारित संस्थेस वितरीत केला जाणार आहे. या अनुदानाची रक्कम **व्यवहार्यता अंतर निधी (VIABILITY GAP FUNDING)** पद्धतीने काढली जाईल. उरलेली ४०% रक्कम मात्र लाभार्थी संस्थेने स्वता: जमा करणे अपेक्षित असून त्यासाठी संस्था बँकेकडून कर्ज देखील घेऊ शकते. **तथापि बँकेचे कर्ज घेणे हे समुदाय आधारीत संस्थांना बंधनकारक नाही.** प्रकल्पाकडून निधी प्राप्त करून घेण्यासाठी समुदाय आधारित संस्थांना मात्र काही अटींची पूर्तता करणे अपेक्षित आहे. याबाबतची माहिती खाली विषद केली आहे.

**अनुदान प्राप्तीसाठीच्या अटी**

१) स्मार्ट प्रकल्पांतर्गत निधी प्राप्त करून घेण्यासाठी समुदाय आधारित संस्थेनी स्वतंत्र बँक खाते उघडावे.



२) उपप्रकल्पाचे लेखांकन करण्यासाठी TALLY ACCOUNTING SOFTWARE/ ANY OTHER SEMILAR DOUBLE ENTRY ACCOUNTING SOFT WARE उपलब्ध करून घ्यावे.

३) उपप्रकल्पाचे लेखांकन करण्यासाठी सनदी लेखापालाची (CA) अथवा TALLY DOUBLE ENTRY ACCOUNTING SOFTWARE ज्ञान असलेल्या व्यक्तीची नेमणूक करावी.

४) कोणत्याही परिस्थितीत प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग वैयक्तिक कारणासाठी करणे प्रतिबंधत असेल.

अट २ आणि ३ च्या पूर्ततेसाठी येणारा खर्च मिळणाऱ्या अनुदानातून आकस्मिक खर्च घटकांतर्गत करता येऊ शकतो.




ज्या संस्थेचा उपप्रकल्प मंजूर झाला असेल, त्या संस्थेला अनुदानाची रक्कम जमा होण्यासाठी बँकेत चालू (current) बँक खाते उघडण्यात यावे. ह्या खात्यावरील व्यवहारासाठी दोन सभासदांची नेमणूक करावी. तसेच खालील सूचना बँकेमध्ये (STANDING INSTRUCION) द्याव्यात.

अ) रु. ५,०००/- पेक्षा अधिक रकमेचा खर्च धनादेश (CHEQUE) , RTGS / NEFT मार्फत केला जाईल.

आ) समुदाय आधारीत संस्थेस उपप्रकल्पांतर्गत सीस्टर कन्सर्न कडून सेवा अथवा वस्तुची खरेदी करावयाची असल्यास सदर संस्थेने योग्य त्या संपादन प्रक्रियेचा अवलंब करून तसेच त्या संबंधीच्या देयकांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे.

**नोट: समुदाय आधारीत संस्थेने प्रकल्पासाठी उघडलेल्या बँक खात्यामधून अनुदान करारातील उपक्रमांवरच रक्कम खर्च करणे अभिप्रेत आहे.**

## ३.२.१ अनुदान करार (GRANT AGREEMENT)

अनुदान प्राप्तीसाठीच्या वरील पूर्व अटींची पूर्तता झाल्यानंतर उपप्रकल्प मंजूर झालेल्या समुदाय आधारित संस्थांचा शासनाच्या संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेबरोबर (PROJECT IMPLEMENTATION UNIT) विहित नमुन्यात अनुदान करार करण्यात येईल. मार्गदर्शक सूचनेनुसार या करारामध्ये अनुदानाची रक्कम, लाभार्थ्यांचा हिश्याची रक्कम तसेच त्याच्या भरण्याची पद्धत स्पष्टपणे नमूद करणे अभिप्रेत आहे. यासोबतच प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यात अनुदान मिळण्यासाठी लाभार्थ्यांचा हिस्सा बँकेमध्ये जमा होणे आवश्यक असून त्यानंतरच मागणी पत्राची पूर्तता आणि छाननी करून अनुदानाची रक्कम PFMS द्वारे प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत समुदाय आधारित (CBO) संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा केला जाईल. वर नमूद केल्यानुसार अनुदान करार करतानाच संस्थेच्या बँक खात्यामधून रक्कम काढण्याच्या पद्धतीबाबतची खालील सूचना (STANDING INSTRUCION) देणे आवश्यक आहे.

- रु. ५,०००/- पेक्षा अधिक रकमेचा खर्च धनादेश (CHEQUE), RTGS / NEFT मार्फत केला जाईल.
- समुदाय आधारीत संस्थेस उपप्रकल्पांतर्गत सीस्टर कन्सर्न कडून सेवा अथवा वस्तुची खरेदी करावयाची असल्यास सदर संस्थेने योग्य त्या संपादन प्रक्रियेचा अवलंब करून तसेच त्या संबंधीच्या देयकांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे.
- सदर खात्यातील निधी संस्थेने मंजूर कामा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कामाला वापरू नये.

- संस्थेने सर्व लेखे (Accounts) TALLY ACCOUNT SOFTWARE / ANY OTHER SEMILAR TALLY DOUBLE ENTRY ACCOUNTING SOFT WARE मध्ये ठेवावे. **वरील दोन्ही सूचना ह्या अनुदान कराराचा भाग असतील.**

### ३.२.२ अनुदानाची मर्यादा आणि त्यांची हप्तेवारी

समुदाय आधारित संस्था आणि प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा यांच्यात अनुदान कराराची प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर समुदाय आधारित संस्थाना खालील प्रमाणे निधीचे वितरण करण्यात येणार आहे.

या अनुदानाची रक्कम **व्यवहार्यता अंतर निधी** (VIABILITY GAP FUNDING) पद्धतीने काढली जाईल. उरलेली ४०% रक्कम मात्र लाभार्थी संस्थेने जमा करणे अपेक्षित आहे. सदरची रक्कम संबंधित संस्था त्याच्या स्वतःच्या इक्विटी आणि बँक कर्जाद्वारे उपलब्ध करून घेऊ शकते. **तथापि बँकेचे कर्ज घेणे हे प्रकल्पांतर्गत अनिवार्य नाही.**




### ३.२.३ अनुदान प्राप्त करून घेण्यासाठीची प्रक्रिया

स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत समुदाय आधारित संस्थेने तयार केलेल्या उपप्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प आराखड्यास राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीकडून मंजुरी प्राप्त झाल्यावर अनुदानाची प्रस्तावित रक्कम समुदाय आधारीत संस्थेस एकूण चार टप्प्यात दिली जाईल. टप्पे निहाय अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी प्रकल्पांतर्गत निश्चित करण्यात आलेल्या प्रक्रियेचा अवलंब समुदाय आधारित संस्थेने करणे गरजेचे आहे. यासाठी समुदाय आधारित संस्थेने निश्चित केलेल्या उप प्रकल्पानुसार अनुदान प्राप्तीसाठीची कार्यपद्धत खाली विश्लेषित केली आहे.

## उप प्रकल्प क्र. १ उत्पादक भागीदारी उपप्रकल्पासाठी अनुदानाचे स्वरूप

वर नमुद केल्यानुसार प्रकल्पाद्वारे वितरीत करण्यात येणारे अनुदान हे व्यवहार्यता अंतर निधीनुसार (Viability gap funding) जास्तीत जास्त उपप्रकल्प किंमतीच्या ६० टक्के इतक्या मर्यादेत वितरीत करण्यात येणार असून उर्वरित उपप्रकल्प किंमतीच्या किमान ४० टक्के हिस्सा लाभार्थी संस्थेला द्यावा लागणार आहे. वर नमुद केल्यानुसार अनुदानाची रक्कम सी.बी.ओ.ला एकूण चार टप्प्यात देण्यात येणार आहे.




### १. संस्थेस निधीचे वितरण कसे होणार?

वरील धावत्या तक्त्यात दिल्याप्रमाणे उत्पादक भागीदारी उपप्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या समुदाय आधारित संस्थेस अनुदानाची रक्कम एकूण ४ टप्प्यात वितरीत करण्यात येणार आहे. समुदाय आधारीत संस्था आपला लाभार्थी हिस्सा किंवा स्वनिधी उभारण्यासाठी बँकेकडून कर्ज घेऊ शकतात किंवा स्वत: कर्ज न घेता देखील स्व:रकमेतून लाभार्थी हिस्सा उभारू शकतात. लाभार्थी हिस्सा (किमान ४० %) उभा करण्याच्या कामी बँकेकडून कर्ज घेणाऱ्या व कर्ज न घेणाऱ्या समुदाय आधारीत संस्थांना निधीचे वितरण कसे होणार व त्यासाठीच्या पूर्व अटी काय आहेत याबाबतची सविस्तर माहिती खाली विश्लेषीत केली आहे.

### १.१ पहिला टप्पा वितरणासाठी आवश्यक पूर्व अटी




समुदाय आधारीत संस्थेस अनुदानाच्या एकूण रकमेपैकी पहिल्या हस्त्यांतर्गत प्रस्तावित ५०% रक्कम अग्रीम स्वरूपात प्राप्त करून घेण्यासाठी खालील अटी पूर्ण करणे गरजेचे असून यासोबतच अनुषंगिक दस्ताऐवज सादर करणे अपेक्षित आहे. अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त करून घेण्यासाठीच्या अटी व अनुषंगीक दस्ताऐवज तक्ता खाली दिला आहे.

| अ.क्र. | पूर्व अट | अनुषंगिक दस्ताऐवज |
|---|---|---|
| १ | उपप्रकल्पास प्रशासकीय मंजूरी | सदर उपप्रकल्पास State project approval committee चा मंजूरी आदेश. |
| २ | लाभार्थी संस्थेकडून मागणी | लाभार्थी संस्थेने सादर केलेले मागणी पत्र |
| ३ | संबंधीत अंमलबजावणी कक्षाकडून शिफारस | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुखाच्या स्वाक्षरीने शिफारस प्रत. |
| ४ | स्मार्ट प्रकल्प, लाभार्थी संस्था व लाभार्थ्यांच्या बँक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुख यांनी साक्षांकित केलेली,त्रिपक्षीय कराराची प्रत. |
| ५ | लाभार्थी संस्थेने स्मार्ट प्रकल्पासाठी स्वतंत्र चालू खाते उघडून, त्यामध्ये पहिल्या हप्त्याशी निगडीत, लाभार्थी हिस्सा जमा करणे. | |
| ५.अ) | **कर्ज घेतले प्रकरणे** | |
| | १) स्मार्ट प्रकल्पासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे | १) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेली प्रत. |
| | २) पहिल्या हप्त्याशी निगडीत, लाभार्थी हिस्सा जमा करणे | २) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला बँकेचा खाते उतारा. |
| | ३) कर्ज मंजूरी | ३) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, सांक्षाकित केलेले कर्ज मंजूरीचे पत्र. (Bank loan sanction letter) |
| ५.ब) | **कर्ज न घेतले प्रकरणे** | |
| | १) स्मार्ट प्रकल्पासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे | १) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेली प्रत |
| | २) पहिल्या हप्ताशी निगडीत, लाभार्थी हिस्सा जमा करणे | २) बँकेच्या प्राधीकाऱ्याने सांक्षाकीत केलेला बँकेचा खाते उतारा |
| ६ | उपप्रकल्पामध्ये बांधकामाच्या समावेश असल्यास, त्यास तांत्रिक मंजूरी | सदरची तांत्रिक मंजूरी प्रकल्पांतर्गत असलेल्या अभियंता / संबंधीत विभाग यांचेकडून घेणे आवश्यक राहील. |
| ७ | समुदाय आधारीत संस्था स्तरावर स्मार्ट प्रकल्पासाठी लेखांकन करण्यासाठी Tally सांक्षाकीत लेखापालाची नियुक्ती | समुदाय आधारीत संस्थेने सोबत दिलेल्या सहपत्र - ३ नुसार, दिलेले घोषणापत्र. |
| ८ | समुदाय आधारीत संस्था स्तरावर स्मार्ट प्रकल्पासाठी लेखांकन करण्यासाठी Tally किंवा तत्सम प्रणालीची खरेदी | समुदाय आधारीत संस्थेने सोबत दिलेल्या सहपत्र- ३ नुसार, दिलेले घोषणापत्र. |

### १.२ दुसरा टप्पा वितरणासाठी आवश्यक पूर्व अटी




समुदाय आधारीत संस्थेस अनुदानाच्या एकूण रक्कमेतील दुसऱ्या हप्त्यांतर्गत प्रस्तावित ३० % रक्कम अग्रीम स्वरूपात प्राप्त करून घेण्यासाठी खालील अटी पूर्ण करणे गरजेचे असून यासोबतच अनुषंगिक दस्ताऐवज सादर करणे अपेक्षित आहे. अनुदानाचा दुसरा हप्ता प्राप्त करून घेण्यासाठीच्या अटी व अनुषंगीक दस्ताऐवज तक्ता खाली दिला आहे.

| अ.क्र. | पूर्व अट | अनुषंगिक दस्ताऐवज |
|---|---|---|
| १ | लाभार्थी संस्थेकडून मागणी | लाभार्थी संस्थेने सादर केलेले मागणी पत्र |
| २. | संबंधित अंमलबजावणी कक्षाकडून शिफारस | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुखाच्या स्वाक्षरीने शिफारस पत्र. |
| ३ | **पहिल्या हप्त्यापोटी एकूण जमा झालेल्या रकमेपैकी ७० टक्के रक्कम खर्ची पडल्यानंतर** | |
| ३. अ) | कर्ज घेतले प्रकरणी | १) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र.<br>२) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला कर्ज खात्याचा उतारा.<br>३) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला चालू खात्याचा उतारा.<br>४) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आतापर्यंत झालेल्या खर्चाची बिले |
| | कर्ज न घेतले प्रकरणे | १) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र.<br>२) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला चालू खात्याचा (Special account) उतारा.<br>३) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची बिले. |
| ४. | **दुसऱ्या हप्त्याशी निगडीत लाभार्थी हिस्सा जमा करणे** | |
| ४.अ) | **कर्ज घेतलेले प्रकरणे** | बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला कर्ज मंजूरीचे पत्र (Bank loan sanction letter). |
| ४.ब) | **कर्ज न घेतले प्रकरणे** | लाभार्थी हिस्सा जमा केल्याबाबत बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला बँकेचा खाते उतारा. (Special account) |
| ५. | संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्ष / प्रकल्प अंमलबजावणी कक्ष येथील लेखापालाने केलेली तपासणी. | लेखापालाने सादर केलेला व संबंधित कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरी केलेला विहित नमुन्यातील तपासणी अहवाल. |

| | | |
|---|---|---|
| ६. | तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी | स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटोंसह (Geo-tagged) मोका तपासणी अहवाल. |

### १.३ तिसऱ्या टप्पा वितरणासाठी आवश्यक पूर्व अटी




समुदाय आधारीत संस्थेस अनुदानाच्या एकूण रक्कमेतील तिसऱ्या हप्त्यांतर्गत प्रस्तावित १०% रक्कम अग्रीम स्वरूपात प्राप्त करून घेण्यासाठी खालील अटी पूर्ण करणे गरजेचे असून यासोबतच अनुषंगिक दस्ताऐवज सादर करणे अपेक्षित आहे. अनुदानाचा तिसरा हप्ता प्राप्त करून घेण्यासाठीच्या अटी व अनुषंगीक दस्ताऐवज तक्ता खाली दिला आहे.

| अ.क्र. | पूर्व अट | अनुषंगिक दस्ताऐवज |
|---|---|---|
| १. | लाभार्थी संस्थेकडून मागणी | लाभार्थी संस्थेने सादर केलेले मागणी पत्र. |
| २. | संबंधित अंमलबजावणी कक्षाकडून शिफारस | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुखाच्या स्वाक्षरीने शिफारस पत्र. |
| ३. | पहिल्या हप्त्यापोटी एकूण जमा झालेल्या रकमेपैकी १००% रक्कम व दुसऱ्या हप्त्यापोटी एकूण जमा रकमेच्या ७०% रक्कम खर्ची पडल्यानंतर | |
| ३.अ) | **कर्ज घेतले प्रकरणे** | १) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र.<br>२) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला कर्ज खात्याचा उतारा.<br>३) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला चालू खात्याचा उतारा.<br>४) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची बिले. |
| | **कर्ज न घेतले प्रकरणे** | १) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र.<br>२) बँकेच्या प्राधीकाऱ्याने, साक्षांकित केलेला चालू खात्याचा (Special account) उतारा.<br>३. सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची बिले |
| ४. | **तिसऱ्या हप्त्याशी निगडीत लाभार्थी हिस्सा जमा करणे** | |

| अ.क्र. | पूर्व अट | अनुषंगिक दस्ताऐवज |
|---|---|---|
| ४.अ) | **कर्ज घेतले प्रकरणे** | लाभार्थी हिस्सा जमा झाला आहे यासाठी – <br>१) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला बँकेचा खाते उतारा. <br>२) बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेले कर्ज मंजूरीचे पत्र. (Bank loan sanction letter). |
| ४.ब) | **कर्ज न घेतले प्रकरणे** | लाभार्थी हिस्सा जमा झाला आहे यासाठी, बँकेच्या प्राधिकाऱ्याने, साक्षांकित केलेला बँकेचा खाते उतारा. |
| ५. | संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्ष / प्रकल्प अंमलबजावणी कक्ष येथील लेखापालाने केलेली तपासणी. | लेखापालाने सादर केलेला व संबंधित कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरी केलेला तपासणी अहवाल. |
| ६. | तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी | स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटोंसह (geo-tagged) मोका तपासणी अहवाल. |




### १.४ चौथ्या व अंतिम हप्त्याचे निधी वितरण –

चौथ्या व अंतिम हप्त्याचे निधी वितरण संदर्भात, समुदाय आधारीत संस्थेने त्या हप्त्याशी निगडीत पूर्ण रक्कम आधी खर्च करावयाची आहे व झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रकल्पाकडून करावयाची आहे. सदरची प्रतिपूर्ती मागविण्यापूर्वी, खाली नमुद केलेल्या तक्त्यातील पूर्व अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पूर्व अट | अनुषंगिक दस्ताऐवज |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल यांचेकडून लेखापरिक्षण | १) लेखापरिक्षण अहवाल <br>२) प्रकल्प नियुक्त सनदी लेखापाल यांनी चौथ्या हप्त्याशी निगडीत, प्रमाणित केलेले, झालेल्या खर्चाची बिले. |
| २. | तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी | स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटोंसह (geo-tagged) मोका तपासणी अहवाल. |
| ३. | लाभार्थी संस्थेकडून मागणी | लाभार्थी संस्थेने सादर केलेले मागणी पत्र. |
| ४. | संबंधित अंमलबजावणी कक्षाकडून शिफारस | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुखाच्या स्वाक्षरीने शिफारस पत्र . |

**उप प्रकल्प क्र.२. स्मार्ट अंतर्गत बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पासाठी (Market Access Plan - MAP) निधी वितरण व्यवस्था:-**

वर नमुद केलेली निधी वितरण प्रक्रिया ही उत्पादक भागीदारी उपप्रकल्प, बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प व धान्य गोदाम आधारीत उपप्रकल्प यांना लागू असेल. बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पास (Market Access Plan - MAP) देखील लागू राहरील. तथापि MAP सारख्या उपप्रकल्पांना संशोधनासाठी म्हणून रक्कम रु. १० लाखाच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध होऊ शकते. बाजार संशोधनासाठी देण्यात आलेल्या अनुदानातून मुख्यत्वे प्रवास खर्च, बाजार सर्वेक्षण, बाजार अभ्यासासाठी नियुक्त सल्लागाराची फी इत्यादी बाबींवर खर्च करता येईल. वरील निधी प्रकल्पाकडून लाभार्थी संस्थेस दोन टप्यात उपलब्ध होईल. निधी उपलब्ध होण्यासाठीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

प्रकल्पास प्राथमिक मान्यता मिळाल्यानंतर, लाभार्थी संस्था, बाजार संशोधन करावयास व त्या अनुषंगाने प्रकल्पाकडून अनुदान प्राप्त करून घेण्यास, पात्र असेल मात्र त्यासाठी लाभार्थी संस्थेने प्रकल्पास बाजार संशोधनासाठीचे अंदाजपत्रक सादर करावयाचे आहे. बाजार संशोधनासाठी प्रकल्प निधी प्रकल्पाकडून दोन टप्यात उपलब्ध होईल. त्यापैकी प्रथम टप्प्याचे, ५०% अनुदान, हे अग्रीम रुपात असेल व उर्वरित ५०% अनुदान, हे प्रतिपूर्तीच्या स्वरुपात असेल. प्रतिपूर्ती मिळण्यासाठी खालील पूर्व अटी व त्या अनुषंगिक कागदपत्रे आवश्यक असतील.

i. पूर्वी सादर केलेले अंदाजपत्रक

ii. झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र,

iii. झालेल्या खर्चाची देयके

iv. Study report of any

v. Geo-tagged photographs

vi. दौऱ्यांशी संदर्भात इतर कागदपत्रे (तिकिट, बोर्डींग पास इ.)

उर्वरीत सर्व निधी वितरणाची प्रक्रिया ही उत्पादक भागीदारीप्रमाणेच असेल.

**उप प्रकल्प क्र. ३ स्मार्ट अंतर्गत पुरक व नाविन्यपूर्ण गुंतवणूक उपप्रकल्पासाठी (CII) निधी वितरण व्यवस्था**

सदरचा उपक्रम हा ज्या समुदाय आधारीत संस्थांनी उत्पादक भागिदारी (PP) उपप्रकल्प व बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प (MAP) राबविला आहे त्या संस्थांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान / बाबी (ब्लॉक चेन, पिकाच्या वाण आयात करणे इ.) राबविण्यासाठी एक अतिरिक्त (Add-on) उपक्रम म्हणून राबविता येईल. सदर उपक्रमांतर्गत समुदाय आधारीत संस्थेस उपप्रकल्प किंमतीच्या ६० टक्के रक्कम किंवा रक्कम रू.५० लाख (या दोन्हीपैकी कमी

असलेली रक्कम) हे प्रकल्प अनुदान स्वरूपात देण्याचे प्रस्तावित आहे. या अनुदानाची रक्कम दोन टप्यात वितरीत त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

**अ. अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त करून घेण्यासाठीची प्रक्रिया**




संस्थेचा उपप्रकल्प मंजूर झाल्यावर, ५०% अनुदान मिळवण्यासाठी संस्थेला खालील बाबी पूर्ण कराव्या लागतील.

१) समुदाय आधारीत संस्थेस पहिला हप्ता एकुण प्रकल्प अनुदानाच्या ५०% पर्यंतचा असेल. प्रकल्प अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यापूर्वी, प्रत्येक CBO ने पहिल्या हप्त्यासाठी अनुदान कराराच्या परिशिष्टात नमूद (अनुदानाच्या हिश्याशी जुळणारा लाभार्थी हिस्सा) केलेली रक्कम जमा करणे अपेक्षित आहे. समुदाय आधारीत संस्थेने ही रक्कम SMART अंतर्गत PP/MAP प्रस्तावासाठी उघडलेल्या चालू बँक खात्यात जमा करावी.

२) लाभार्थींचे योगदान PP/MAP चालू बँक A/c. मध्ये जमा केल्यानंतर, त्याबाबतचा पुरावा म्हणून बँक पासबुकची साक्षांकित प्रत विहीत नमुन्यातील मागणी पत्रासहीत (परिशिष्ट क्र. ८ मध्ये दिलेला नमुना तक्ता क्र. १) जिल्हा अंमलबजावणी कक्षास (DIU) / किंवा प्रकल्प अंमलबजाणी कक्षाच्या (PIU) संबंधित जिल्हा यंत्रणेकडे किंवा PIU कडे मागणी पत्रासोबत सादर करावी.

३) जिल्हा अंमलबजावणी कक्ष (DIU) किंवा संबंधित प्रकल्प अंमलबजाणी कक्षाचे (PIU) जिल्हा कार्यालय प्राप्त झालेला वरील प्रस्ताव अनुदानाचा हिस्सा बँक खात्यात जमा झाल्याचे दर्शविणाऱ्या बँक पासबुकच्या साक्षांकित प्रतीसहीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षास तीन दिवसांच्या आत (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) सादर करतील.

४) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) वरील कागदपत्रे मिळाल्यावर आणि त्याची पडताळणी केल्यानंतर, सात दिवसाच्या (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) आत समुदाय आधारीत संस्थेच्या चालु बँक खात्यात वितरीत करतील.




**ब. अनुदानाचा <u>दुसरा / अंतिम हप्ता</u> प्राप्त करून घेण्यासाठीची प्रक्रिया**

प्रकल्प अनुदानाचा दुसरा आणि अंतिम हप्त्यात प्रकल्प अनुदानाच्या शिल्लक रकमेचा (पहिल्या हप्त्याची रक्कम वजा जाता) समावेश असेल. सदरचा हप्ता मिळण्यासाठी संस्थेने खालील बाबी पूर्ण करणे अपेक्षित आहे.

अ) सर्वप्रथम समुदाय आधारीत संस्थेने या उपप्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेली उर्वरीत सर्व कामे पूर्ण करणे अपेक्षित आहे. उपप्रकल्पात समाविष्ट सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर त्या बाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र खर्चाच्या कागदपत्रासहीत संस्थेने प्राधिकृत केलेल्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने (परिशिष्ट क्र. ९ मध्ये दिलेला नमुना तक्ता क्र.२)

दुसऱ्या / अंतीम हस्याच्या मागणीसाठी तयार करून तो जिल्हा अंमलबजावणी कक्षास (DIU) / किंवा प्रकल्प अंमलबजाणी कक्षाच्या (PIU) संबंधित जिल्हा यंत्रणेकडे किंवा PIU कडे मागणी पत्रासोबत सादर करावी.

ब) जिल्हा अंमलबजावणी कक्षाने (DIU) किंवा संबंधित प्रकल्प अंमलबजाणी कक्षाचे (PIU) जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वरील प्रस्तावाची विशेषत: उपयोगीता प्रमाणपत्राची छाननी करावी तसेच क्षेत्रिय पडताळणीसाठी मोका तपासणी उपक्रमाचे आयोजन करावे.

क) जिल्हा अंमलबजावणी कक्ष (DIU) किंवा संबंधित प्रकल्प अंमलबजाणी कक्षाच्या (PIU) जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वरील प्रस्ताव आपल्या मोका तपासणी अहवालासहीत सात दिवसांच्या आत (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षास सादर करावा.

ड) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने (PIU) वरील कागदपत्रे मिळाल्यावर आणि त्याची पडताळणी / छाननी केल्यानंतर, सात दिवसाच्या (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) आत समुदाय आधारीत संस्थेच्या चालु बँक खात्यात वितरीत करावा.

### उप प्रकल्प क्र. ४ स्मार्ट अंतर्गत धान्य गोदाम आधारित उपप्रकल्पासाठी निधी वितरण व्यवस्था:-

- सदरचा उपक्रम प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष म्हणून सहभागी झालेल्या महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ (PIU-MCDC), व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान (PIU-MSRLM/MSWC) यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे.
- सदर उपक्रमात, उपप्रकल्प किंमतीच्या ६०% च्या मर्यादेत प्रकल्प हिस्सा व लाभार्थी हिस्सा ४०% च्या मर्यादित असेल.
- सदर उपक्रम राबविताना CMA ची भूमिका महत्वाची आहे, त्याचे व्यवस्थापकीय अनुदान समुदाय आधारीत संस्थेकडून देणे अपेक्षित आहे. परंतू सदरचा खर्च प्रकल्पाकडून १००% केला गेल्यास, प्रकल्प अनुदानाचा हिस्सा त्याअनुषंगाने (adjust) समायोजित केला जाईल.
- या उपप्रकल्पाअंतर्गत समुदाय आधारीत संस्थेस अनुदानाचे वितरण हे उत्पादक भागीदारी उपप्रकल्पांच्या धर्तीवर असेल.

**वरील सर्व विवेचन आपण एक उदाहरण घेऊन त्याचे चित्र रुपांतर करून समजून घेऊ यात. यासाठी आपण उत्पादक भागीदारी प्रस्तावांना (PP) निधी वितरणाबाबतचे उदाहरण घेऊयात.**

- उपप्रकल्पाची एकूण किंमत रू. १ कोटी, म्हणजेच रु.१०० लाख असे गृहित धरु यात.
- प्रकल्पाद्वारे वितरीत करण्यात येणारे अनुदान हे व्यवहार्यता अंतर निधी (VIABILITY GAP FUNDING) नुसार उपप्रकल्प किंमतीच्या जास्तीत जास्त ६०% असे गृहित धरु. म्हणजेच सदर उदाहरणामध्ये रू.६० लाख इतके असेल. संस्थांचा लाभार्थी हिस्सा उपप्रकल्प किंमतीच्या ४० % म्हणजेच रू.४० लाख इतका असेल.
- सदर उदाहरणामध्ये, अनुदान करारामध्ये समुदाय आधारित संस्थांनी ५०:३०:१०:१० या प्रमाणात अनुदानाचे टप्पे निवडले आहेत, असे गृहित धरु. सदर उदाहरणा मध्ये, उपप्रकल्पास स्मार्ट प्रकल्पाकडून निधी वितरणाचे टप्पे खाली दर्शविल्याप्रमाणे असतील.


एकूण प्रकल्पाची किंम्मत १०० लक्ष
प्रकल्प अनुदान निधी ६० लक्ष
समुदाय आधारीत संस्थाचा स्व:निधी ४० लक्ष
पहिला हप्ता ५०% प्र.अनुदान च्या (३० लक्ष)
दुसरा हप्ता ३०% प्र.अनुदान च्या (१८ लक्ष)
तिसरा हप्ता १०% प्र.अनुदान च्या (६ लक्ष)
बाकी हप्ता १०% प्र.अनुदाना च्या (६ लक्ष)
पहिला हप्ता ५०% CBO संस्थेच्या (२० लक्ष)
दुसरा हप्ता ३०% CBO संस्थेच्या (१२ लक्ष)
तिसरा हप्ता १०% CBO संस्थेच्या (४ लक्ष)
बाकी हप्ता १०% CBO संस्थेच्या (४ लक्ष)
टप्पा- १
टप्पा १- समुदाय आधारीत संस्थेने स्मार्ट प्रकल्पासाठी उघडलेल्या बँक खात्यामध्ये रु.२० लक्ष जमा करावे.
टप्पा २- विहित अटीची पूर्तता झाल्यानंतर टप्पा १ शी निगडीत प्रकल्प अनुदान रु.३० लक्ष CBO संस्थेच्या बँक खात्यात जमा करावेत.
(पहिल्या टप्प्याच्या ७०% निधी खर्चित झाल्यावर)
म्हणजेच २० लाखातील १४ लाख खर्च झाल्यानंतर व ३० लाखातील २१ लाख खर्च झाल्यानंतर
टप्पा-२
टप्पा १ - समुदाय आधारीत संस्थेने स्मार्ट प्रकल्पासाठी उघडलेल्या बँक खात्यामध्ये रु.१२ लक्ष जमा करावे.
टप्पा २ - विहित अटीची पूर्तता झाल्यानंतर टप्पा प्रकल्प अनुदान रु.१८ लक्ष CBO संस्थेच्या बँक खात्यात जमा करावेत.
टप्पा-३
(तिसरा हप्ता अग्रीम पद्धतीने दिला जाईल)
पहिल्या टप्प्यातील १०० टक्के आणि दुसऱ्या टप्प्यातील ७० टक्के रक्कम खर्च झाल्यावर
टप्पा १ - समुदाय आधारीत संस्थेने स्मार्ट प्रकल्पासाठी उघडलेल्या बँक खात्यामध्ये रु. ४ लक्ष जमा करावे.
टप्पा २ - प्रकल्प अनुदान रु. ६ लक्ष CBO संस्थेच्या बँक खात्यात जमा करावेत.
टप्पा-४
(चौथा हप्ता प्रतिपूर्ती स्वरूपात दिला जाईल)
टप्पा १ – समुदाय आधारीत संस्थेने स्मार्ट प्रकल्पाच्या खात्यात ४ लक्ष जमा करावे
टप्पा २ - प्रकल्प अनुदान रु.६ लक्ष परतावा पध्दतीने जमा केले जाईल.

## ३.३ उपप्रकल्पा संदर्भात जतन करावयाच्या लेखाविषयक दस्तऐवज

समुदाय आधारित संस्थांनी स्मार्ट प्रकल्पांतर्गत उपप्रकल्पा संदर्भात खालील लेखाविषयक दस्तऐवज जतन करावयाचे आहेत.

| तपशील | दस्तऐवज | |
|---|---|---|
| **बांधकाम विषयक दस्तऐवज.** | • प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, समन्वय आणि व्यवस्थापन कक्ष यांचेकडून मिळालेली बांधकाम मंजुरी, कंत्राटदाराला दिलेला कार्यारंभ आदेश,<br>• त्यांची रनिंग बिले (RUNNING BILLS),<br>• उपयोगिता प्रमाणपत्र<br>• बांधकामांचे विविध टप्प्याचे फोटो,<br>• कामाला मुदतवाढ दिली असल्यास त्याचा आदेश,<br>• बांधकाम पूर्णत्वाचा दाखला,<br>• प्रकल्प अंमलबजावणी कक्ष अथवा जिल्हा अमलबजावणी कक्ष प्रमुख यांच्यामार्फत मिळालेला मंजुरी अहवाल<br>• कर कपातीचे आणि भरण्याचे कागदपत्रे |  |
| **वस्तू आणि यंत्रसामुग्री विषयक दस्तऐवज** | • प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, समन्वय आणि व्यवस्थापन कक्ष यांचेकडून मिळालेली खरेदी मंजुरी,<br>• पुरवठादाराबरोबर केलेले करार आणि आदेश,<br>• मालाची पोच पावती (DILIVARY CHALLAN), शिल्लक मालाच्या नोंद पुस्तिका (STOCK REGISTER),<br>• खरेदी पावती (INVOICE), |  |
| **प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक विषयक दस्तऐवज** | • या मध्ये सेवापुरवठादारा बरोबर झालेले करार,<br>• प्रशिक्षणासाठी दिलेले हॉल भाडे,<br>• वाहन भाडे,<br>• केटरिंग चार्ज इ. चे करार,<br>• हजेरी पत्रक,<br>• कार्येक्रमाची छायाचित्रे,<br>• पावत्या<br>• कर कपातीचे आणि भरण्याचे कागदपत्रे ठेवावीत |  |

| तपशील | दस्तऐवज | |
|---|---|---|
| **बांधकाम विषयक दस्तऐवज.** | • प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, समन्वय आणि व्यवस्थापन कक्ष यांचेकडून मिळालेली बांधकाम मंजुरी, कंत्राटदाराला दिलेला कार्यारंभ आदेश,<br>• त्यांची रनिंग बिले (RUNNING BILLS),<br>• उपयोगिता प्रमाणपत्र<br>• बांधकामांचे विविध टप्प्याचे फोटो,<br>• कामाला मुदतवाढ दिली असल्यास त्याचा आदेश,<br>• बांधकाम पूर्णत्वाचा दाखला,<br>• प्रकल्प अंमलबजावणी कक्ष अथवा जिल्हा अमलबजावणी कक्ष प्रमुख यांच्यामार्फत मिळालेला मंजुरी अहवाल<br>• कर कपातीचे आणि भरण्याचे कागदपत्रे |  |
| **कर कपातीचे आणि कर भरण्याचे दस्तऐवज** | • वेळोवेळी केलेल्या करकपातीचे चलन,<br>• करकपातीचे रिटर्न इ.<br>• लाभार्थी संस्थांच्या स्तरावर खर्चाच्या स्वरुपानुसार, आयकर कायद्यानुसार लागू असलेल्या करांचा (TDS) तपशील नमुना ३ मध्ये दिला आहे |  |
| TALLY SOFTWARE | • संस्थेने उपप्रकल्पचे लेखे TALLY SOFTWARE मध्ये द्विनोंद पद्धतीद्वारे (DOUBBLE ENTRY SYSTEM) अद्ययावत ठेवावेत.<br>• TALLY SOFTWARE/ DOUBBLE ENTRY SYSTEM मधून रोकड वही (CASH BOOK), बँक ताळमेळ पत्र, ताळेबंद, मोजमाप पुस्तिका, Dead Stock नोंदवही इ. माहितीचे प्रिंट काढून संस्थच्या सचिवाच्या सही शिक्याने फाईल करून ठेवाव्यात. | Tally<br>POWER OF SIMPLICITY<br>Tally.ERP 9 |

### ३.४.१ इतर महत्वाच्या बाबी



- खरेदी आणि लेखा विषयक नोंदीपुस्तक आणि दस्तऐवज जपून ठेवणे आवश्यक आहे.
- बँक खात्याचे पासबुक अद्ययावत ठेवावे.
- लेखाविषयक अभिलेख सुरळीत आणि नियमानुसार चालू असल्याची खातरजमा करण्यासाठी जिल्हा अंमलबजावणी स्तरावरील प्रकल्प नियुक्त लेखापाल संस्थेला दर महिन्याला भेट देऊन मार्गदर्शन करतील आणि सदर भेटीचा अहवाल कार्यालय प्रमुखांना सदर करतील.
- लाभार्थी संस्थेने प्रकल्प नियुक्त लेखापरीक्षकाकडून एक वेळेस आणि संस्थेच्या लेखापरिक्षकाकडून दोन वेळेस उपयोगिता प्रमाणपत्र असे तीन वेळेस प्रकल्पास सादर करणे आवश्यक आहे.
- उपप्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी संस्थच्या लेखापरिक्षकाकडून उपयोगिता प्रमाणपत्र (परिशिष्ट क्र. ९ मध्ये दिलेला नमुना तक्ता) सादर करणे आवश्यक आहे.

## ३.४ संस्था आणि कर दायित्व आणि अन्य महत्वाच्या तरतुदी

**कर म्हणजे सरकारी देणे. असे म्हणतात की, ज्या ठिकाणी उत्पन्नाची / वस्तूची / सेवेची निर्मिती होते त्या ठिकाणी करदायित्व निर्माण होते.**

आपल्या उपप्रकल्पात सामील झालेल्या सर्व प्रकारच्या संस्थाना सरकारने लागू केलेले विविध प्रकारचे कर विविध टप्प्यावर भरावे लागतात. कर हे सर्वसाधारणपणे २ प्रकारचे असतात.




१) प्रत्यक्ष कर : उदा. आयकर
२) अप्रत्यक्ष कर: जी.एस.टी

आपल्या देशात सरकारी यंत्रणा ३ पातळयावर काम करत असतात. त्या नुसार करांचे वर्गीकरण समोरील चित्रात प्रमाणे नमूद करता येते.

**आयकर आणि जी.एस.टी कायद्यानुसार कर पात्रता आणि कर देयता काढणे हि एक गुंतागुंतीची आणि किचकट स्वरुपाची प्रक्रिया आहे. त्याच प्रमाणे ती तारखानुसार काढावी लागते. तारीख चुकली की व्याज, दंड इ. नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणूनच आपल्या उप प्रकल्पामध्ये, ह्या कामासाठी संस्थाना मदत करण्यासाठी तज्ञ सनदी लेखापरीक्षकांची नेमणूक केलेली आहे. त्यांचे सहकार्य संस्थांनी आवश्यकतेनुसार घ्यायला हवे.**

आयकर कायद्यामध्ये करकपातीच्या तरतुदी आहेत. संस्थेच्या **नोकरदार कर्मचारी वर्गाचा पगार** जर वर्षाला रु. ५,००,०००/- पेक्षा अधिक झाला तर सनदी लेखापरीक्षकांच्या मार्गदर्शनानुसार करकपात आणि करभरणा तसेच आयकर कपातीचे विवरण पत्र भरावे.

त्याच प्रमाणे, संस्था **सल्लागार आणि कंत्राटदार** नेमते तेव्हा, त्यांना रक्कम अदा करताना नियमाप्रमाणे करकपात करून तीचा भरणा सरकारी तिजोरीमध्ये पुढील महिन्याच्या ७ तारखे पर्यंत भरावा लागतो आणि त्याचे विवरण पत्र दर तीन महिन्यांनी भरावे लागते. त्या करकपातीचा दर खालील प्रमाणे आहे.

**जर सल्लागार आणि कंत्राटदार PAN देत नसेल तर करकपात सरसकट २०% दराने करावी.**

लाभार्थी संस्थांच्यास्तरावर खर्चाच्या स्वरुपानुसार, आयकर कायद्यानुसार लागू असलेल्या करांचा (TDS) सविस्तर तपशील परिशिष्ट क्र. १० मधील नमुना क्र. ३ मध्ये दिला आहे.

**तळटीप:** वरील निधी वितरणाची कार्यपध्दत ही प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्वानुसार बनविलेली आहे. त्यात वेळोवेळी होणारे बदल संबंधित संस्थांनी समजून घेणे आवश्यक आहे. तसेच या प्रशिक्षण पुस्तिकेमधील काही मुद्द्यावर जर शंका असतील तर प्रकल्पाची मार्गदर्शक पुस्तिका (FMM) वापरावी. याचबरोबर प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने मागितलेले विविध प्रकारचे दाखले (declaration) संस्थेने सादर केले पाहिजेत.

# सामाजिक व्यवस्थापन आराखडा व महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष धोरण

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १ | सामाजिक व्यवस्थापन आराखडा |
| २ | शेतीच्या मुख्य प्रवाहात महिलांचा सहभाग |

# प्रकरण क्रमांक ४ सामाजिक व्यवस्थापन आराखडा

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणर्थींना स्मार्ट प्रकल्पांतर्गत सामाजिक व्यवस्थापनासाठी निर्धारीत केलेल्या आराखडयाची त्याच्या घटकांची  माहिती होईल व सदर घटकांच्या अंमलबजावणीसाठीची कार्यपध्दत कळेल.**

## ४.१ प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषी उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्व समावेशक कृषी मुल्य साखळया विकसित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी प्रकल्पांतर्गत उपप्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध उपक्रम प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. सदर उपप्रकल्पांची अंमलबजावणी दरम्यान **सामाजिक सुरक्षितता** राखण्याच्या दृष्टीकोनातून (उपप्रकल्प अंमलबजावणीमुळे होणारा  परिणाम (सकारात्मक/नकारात्मक) समजून घेऊन नकारात्मक परिणाम होणार असतील तर ते न होवू देणे किंवा त्या संदर्भातील  धोका कमी करणे), प्रकल्पाने सामाजिक व्यवस्थापन आराखडा निश्चित केला आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवसाय कार्यान्वयाच्या / संचालनाच्या टप्प्यात सामाजिक विकास तत्त्वांचा समावेश करण्यासाठी सामाजिक व्यवस्थापन आराखडयाची (SMF) मदत होईल. या आराखड्यामुळे प्रकल्पा अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या आणि घटकांच्या अंमलबजावणीसाठी अवलंबावयाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती मिळते. तसेच सामाजिक विकास आराखडा छाननीचे निकष, लिंगभाव, आदिवासी विकास, क्षमता बांधणी, सनियंत्रण व मुल्यमापन इ. यांच्याशी संबंधीत मुख्य मुदयांची माहिती प्राप्त होते.

स्मार्ट प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेल्या सामाजिक व्यवस्थापन आराखडा (SMF) प्रकल्पाच्या परिणाम पडताळणी दरम्यान तसेच प्रकल्पा अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांच्या प्रभावी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यासाठी आणि सामाजिक व सांस्कृतिक संवेदनशीलता जपण्यासाठी मार्गदर्शन करते. याचबरोबर जागतिक बँकेच्या सामाजिक विकास तत्त्वांचे पालन करून स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत निश्चित केलेल्या उपक्रमांची अंमलबजावणीची प्रक्रिया सुलभ करण्यास मदत करते.

### ४.१.१ उद्देश

सामाजिक विकास आराखड्याचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रकल्पामुळे समाजावर होणारे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे होणारा विपरीत परिणाम / जोखीम टाळणे.
२. प्रकल्पामुळे काही सामाजिक परिणाम होत असल्यास त्याचा प्रभाव / जोखीम कमी करणे.
३. प्रकल्पाची निश्चिती व उभारणी करताना जागतिक बँकेने तसेच महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेली सामाजिक सुरक्षिततेबाबतच्या प्रमुख घटकांची पूर्तता होत असल्याची खात्री करणे.

४. उपप्रकल्प तयार करण्यासाठी, मूल्यांकनासाठी, उपप्रकल्पांच्या सनियंत्रणासाठी व दस्ताऐवजीकरणासाठी तसेच गरजेनुसार आवश्यक असल्यास सुधारात्मक कृती करण्यासाठी प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष व इतर भागधारकांना मार्गदर्शन करणे.
५. प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान सामाजिक सुरक्षितता अखंडीत ठेवण्यासाठी तसेच आवश्यक असल्यास सुधारात्मक कृती करण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत असल्याची खात्री करणे.

## ४.२ सामाजिक व्यवस्थापनाचे मुख्य घटक




### घटक क्र. १ 'सामाजिक समावेशन'

**१.१ 'सामाजिक समावेशन' म्हणजे काय?**

समाजात वेगवेगळ्या घटकांचे लोक राहतात. प्रत्येक व्यक्तीची जशी व्यक्तिगत ओळख असते, तशी एक सामाजिक ओळखही असते. मी अमूक भाषा बोलते-बोलतो; मी शेतकरी आहे-नाही; मी शिक्षित आहे-नाही; मी मोठ्या शहरात- तालुक्याच्या ठिकाणी-खेड्यात राहते-राहतो; मी अमूक धर्माची-धर्माचा आहे; मी शाकाहारी-मांसाहारी आहे ....अशा विविध ओळख असणाऱ्या गटांमध्ये आपण वावरत असतो.

अनेक लोकांना ते एका विशिष्ट गटाचे आहेत म्हणून राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक-सांस्कृतिक सहभागाची संधी नाकारली जाते. वय, शिक्षण, व्यवसाय, जात, लिंग, धर्म अशा अनेक बाबींवरून कोणाला सहभागी करून घ्यायचे आणि कोणाला टाळायचे हे ठरले जाते. असा भेदभाव करणे बेकायदेशीर असले तरी अनेकदा अनौपचारिक व्यवहारांत असा भेदभाव अनेक लोक करतात असे दिसते. आपणही कळात-नकळत अनेकदा अशा भेदभावाची कृती करत असतो हे विचार केल्यावर आपल्या लक्षात येईल.

सामाजिक समावेशन ही व्यक्तींचा आणि गटांचा सार्वजनिक जीवनातला सहभागामध्ये सुधारणा घडून येण्याची प्रक्रिया आहे. सहभागाची संधी न मिळणाऱ्या वंचित गटांच्या क्षमतांचा विकास करणे, त्यांना सहभागाच्या पुरेशा संधी उपलब्ध होणे, आणि त्यांच्या सामाजिक ओळखीला आत्मसन्मान प्राप्त होणे अशा सर्व पातळ्यांवर सुधारणा होण्यातून सामाजिक समावेशनाची प्रक्रियेला बळ मिळते.

सामाजिक समावेशन या प्रक्रियेचा अधिक सविस्तर विचार करण्यापूर्वी स्मार्ट प्रकल्पाच्या सामाजिक मूल्यांकनातून समोर आलेले निष्कर्ष आणि स्मार्ट प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण याबाबत आपण थोडक्यात माहिती घेणार आहोत.

### १.२ स्मार्ट प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण

स्मार्ट प्रकल्प राज्यातल्या सर्व विभांगात – औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर – राबवला जाईल.

उपप्रकल्प तयार करताना अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी (महिला व पुरूष), महिला उत्पादक व कामगार आणि अनुसूचित जाती व जमाती यांच्या सहभागाचे महत्त्व प्रकल्पाने अधोरेखित केले आहे. या विविध गटांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी जाणून घेणे, उपप्रकल्पांचे त्यांच्यावर होणारे परिणाम जाणून घेणे आणि प्रकल्पाबाबत त्यांचे अभिप्राय जाणून घेणे अशा विविध मार्गांनी सामाजिक समावेशनाचे धोरण अंमलात आणले जाईल.

स्मार्ट प्रकल्पाच्या सामाजिक समावेशन धोरणातील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत:

| | | |
|---|---|---|
| १. | **विविध घटकांचा समावेश:** | स्मार्ट प्रकल्प राज्यातील औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर या सर्व विभागांमध्ये राबविण्यात येणार आहे.<br><br>स्मार्ट प्रकल्पात विविध प्रकारच्या शेतकरी स्त्री-पुरूषांचा सहभाग असावा यासाठी विशेष धोरण आखण्यात आले आहे. ८० टक्के प्रकल्प लाभार्थी अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी असतील. प्रकल्पाच्या लाभार्थींमध्ये महिलांचा सहभाग ५० टक्के असेल. अनुसूचित जातींचे ७ टक्के तर अनुसूचित जमातींचे ६ टक्के शेतकऱ्यांना प्रकल्पाचा लाभ मिळेल. |
| २. | **सर्व घटकांतील लाभार्थींशी विचारविनिमय:** | प्रकल्पाबाबतचे निर्णय आणि प्रकल्प देत असलेल्या सेवा अधिक परिणामकारक व्हाव्यात यासाठी सर्व घटकांतली लाभार्थींशी सातत्याने विचारविनिमय केला जाईल. आवश्यकतेनुसार महिला, युवा वर्ग आणि तत्सम वंचित गटांशी वेगळ्या चर्चा केल्या जातील. |
| ३. | **समता:** | महिला उत्पादक संस्था, अनुसूचित जाती आणि जमाती, गरीब आणि अल्पसंख्य समुहाचे लोक अशा सर्व लाभार्थींना प्रकल्पामध्ये समान संधी |

| | | |
|---|---|---|
| | | असतील आणि त्यांना प्रकल्पाचे लाभही समान तऱ्हेने मिळतील याविषयी प्रकल्प पूर्ण दक्षता घेईल. |
| ४. | **फॅसिलिटेशन:** | प्रकल्पाच्या विविध घटकांचा प्रकल्प अंमलबजावणीत आणि देखरेखीत सहभाग असावा यासाठी प्रकल्पाचे कर्मचारी सातत्याने प्रयत्न करतील. लाभार्थींना जास्तीत जास्त जबाबदरी घेता यावी यासाठी प्रकल्पाचे कर्मचारी सर्वतोपरी प्रयत्न करतील. |
| ५. | **पारदर्शिता:** | प्रकल्पातील सर्व उपक्रम आणि सामुदायिक खरेदीसारख्या प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शी असतील. सर्व लाभार्थींना आणि विशेषत: संस्थागत सदस्यांना प्रकल्पाची माहिती उपलब्ध असेल. |
| ६. | **उत्तरदायित्व:** | प्रकल्पाचे कर्मचारी आणि सामुदायिक संस्था निधी आणि कार्यक्रम यासाठी उत्तरदायी असतील. |

## घटक क्र. २ जागतिक बँकेच्या सामाजिक सुरक्षितता धोरणाची अंमलबजावणी

स्मार्ट प्रकल्पांकरीता जागतिक बँकेचे दोन धोरणे लागू होत असून सदर धोरणांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

### २.१. धोरण ४.१० आदिवासी विकास आराखडा (Indigeious People Framework)

#### अ. राज्यातील आदिवासींची सद्यस्थिती

राज्यातील अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्येपैकी १०.१% लोकसंख्या हि महाराष्ट्रातील असून देशात हे राज्य लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात एकूण ४७ अनुसूचित जमाती (भिल्ल, गोंड, कोळी महादेव, वारली, कोकणा, ठाकूर, आंध इ.) असून एकूण तीन जमाती ह्या दुर्लक्षित गटात मोडतात. राज्यात ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर हे जिल्हे आदिवासी/अनुसूचित आहेत आदिवासी भागातील अशा परीस्थितीत आपले जीवन व्यथित करणारा असा समुदाय विचारात घेता या समुदायास स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत सुधारित कृषी उत्पादन, चांगली बाजारपेठ, दळणवळण, उत्तम साठवण सुविधा आणि उपजीविका विकासासाठी जर सहाय्य केले तर निश्चितच प्रस्तावित प्रकल्पाचा सकारात्मक सामाजिक परिणाम दिसून येईल. तथापि, विशेषत:, आदिम आदिवासी गटास प्रकल्पा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमामुळे आदिवासी समुदायावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही यासाठी प्रकल्पा अंतर्गत आदिवासी आराखडा निर्मितीची प्रक्रिया (Indigenous Peoples Framework (IPF)) तयार करणायत आला आहे.

### ब. आदिवासी आराखडा निर्मितीची प्रक्रिया (Indigenous Peoples Framework (IPF))

स्मार्ट प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्रातील ग्रामीण आणि निवडक निम-शहरी भागात केली जाणार आहे. जागतिक बँकेच्या धोरणानुसार आदिवासी विकास आराखडा (Indigenous Peoples Framework (IPF) तयार करून त्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. आदिवासी समाजावर प्रकल्पाचा सर्वांत जास्त सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी त्यांचा प्रकल्पामध्ये समावेश करणे, त्यांचे जीवनमान उंचावणे, त्यांची संस्था, स्व व्यवस्थापन आणि सदस्यांची क्षमता-बांधणी करून, त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे हा या आराखड्याचा मुख्य उद्देश आहे.

### क. उद्देश

- प्रकल्पा अंतर्गत आदिवासी लोकांचा विनामूल्य, पूर्व आणि माहितीपूर्ण सल्लामसलतीत सहभाग घेणे.
- स्मार्ट प्रकल्पात निश्चित करण्यात आलेल्या उप प्रकल्पातील प्रत्येक उपक्रमात व त्यापासून मिळणारे फायदे आदिवासी समुदायास प्राप्त करून देणे.
- अनावधनाने प्रकल्पातून मिळणाऱ्या कामाचा आणि सेवांचा लाभ समाजातील उच्चभ्रू घटकांपुरता मर्यादित करून असमानता निर्माण होत नसल्याची खात्री करणे.
- प्रकल्पा अंतर्गत स्थानिक संस्कृती जपून आणि योग्य सल्लामसलत प्रक्रियेद्वारे ( विनामूल्य पूर्व आणि सूचित सल्लामसलत) स्थानिक निर्णय प्रक्रियेचा अवलंब करून समुदायाची संमती घेतली जात असल्याची खातरजमा करणे.
- प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांमध्ये विविध स्थानिक लोक आणि समुदायांसाठी योग्य माहिती, संवाद आणि प्रशिक्षण धोरणे प्रस्थापित करणे. हे सर्व पुढील टप्प्याद्वारे सुनिश्चित केले जाईल:

प्रकल्प क्षेत्रात सर्व स्थानिक लोकांचा सहभाग किंवा त्यांची सामूहिक संलग्नता आहे की नाही ( विशेषत: प्रकल्प प्रभावित व्यक्ती) हे ओळखण्यासाठी सर्वेक्षणाद्वारे तपासणी केली जाईल.

### ड. विनामुल्य, प्राथमिक व सूचित सल्लामसलत (Free, Prior, Informed Consultation (FPIC))

स्थानिक समुदायाचे विचार पूर्णपणे जाणून घेवून प्रकल्पासाठी त्यांचा पाठिंबा निश्चित करण्यासाठी प्रकल्पांतर्गत समुदायाशी स्वतंत्र, प्राथमिक व माहितीपूर्ण सल्लामसलत करणे अभिप्रेत आहे. प्रस्तावित प्रकल्पाची माहिती प्रसारित करणे, त्याचा समाजावर होणाऱ्या अनुकूल परिणामांची त्यांना जाणीव करून देणे आणि उप-प्रकल्पाचा स्थानिक कुटुंबाना लाभ होण्यासाठी त्यांना एकत्रित करणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

### इ. विनामुल्य, प्राथमिक व सूचित सल्लामसलत संकल्पना आणि तत्त्वे:

**अ. विनामुल्य:** प्रकल्पाचे समर्थन करण्यासाठी किंवा सहभागी होण्यासाठी प्रकल्प बाधित समुदायांना कोणत्याही प्रकारची जोर जबरदस्तीकेली जाणार नाही, धमकावाले जाणार नाही किंवा यादृष्टीने

अनावश्यकपणे प्रोत्साहन दिले जाणार नाही याची खात्री केली जाणार आहे. यादृष्टीने समुदायाने नियुक्त केलेल्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेचे प्रकल्पांतर्गत दस्तऐवजीकरण करणे आवश्यक असेल.

**प्राथमिक:** प्रकल्पाच्या नियोजन टप्प्यात प्रकल्प बाधित समुदायांशी सल्लामसलत केले जाईल. या सल्लामसलती दरम्यान प्रकल्पाची माहिती समुदायापर्यंत पोहचवली जाईल, या अनुषंगाने त्यांच्या काही शिफारसी असतील तर त्याची नोंद घेतली जाईल. प्रकल्पाची रचना व पर्यायांसंबंधी चर्चा केली जाईल. प्रकल्पांतर्गत निश्चित केलेल्या उपाय योजना, असलेल्या संधी व मिळणारा लाभ, प्रकल्प अंमलबजावणी प्रक्रिया, मुल्यमापन व सनियंत्रण इ. बाबत चर्चा केली जाईल.

**माहितीपूर्ण सल्लामसलत:** बाधित समुदायाशी प्रकल्प अंमलबजावणी व प्रकल्पातील परिणामांची व जोखीमांसंबंधी चर्चा केली जाईल. तसेच प्रकल्पामुळे त्यांच्या दैनदिन जीवनावर होणाऱ्या एकंदरीत परिणामांची त्यांना माहिती होण्याच्या दृष्टीने सांस्कृतिकदृष्ट्या योग्य,स्थानिक भाषेचा वापर करून व अनुकूल असलेल्या संवादाच्या पद्धती वापरून चर्चा केली जाईल.

### उ. प्रकल्पाच्या विविध टप्प्यात आदिवासी विकास धोरण

समुदाय आधारित संस्थांनी आदिवासी आराखडा तयार करण्यासाठीची कार्यपद्धत खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

| टप्पे | कार्यपध्दती | करावयाची कामे व साध्यता |
|---|---|---|
| पूर्वतयारी | गावस्तरावर विनामुल्य, प्राथमिक व सूचित सल्लामसलत घडवून आणण्यासाठी आदिवासी समुदायाशी व त्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधने | स्मार्ट प्रकल्प व प्रकल्प अंमलबजावणी योजनांचा संक्षिप्त लेखाजोखा; आयोजित करण्यात आलेल्या सल्लामसलतीनची संख्या यावरील माहितीचा प्रसार. |
| | विहीत समाज घटकांच्या सभा घेऊन प्रकल्पाची कार्यपध्दती व होणारे फायदेयांची माहिती देणे. | भागधारकांशी सल्ला मसलत व लक्षित गट चर्चा |
| | प्रमुख समस्या ज्या प्रकल्पांतर्गत हाताळता येतील त्यांचा आराखडा तयार करून आदिवासी विकास आराखडा तयार करणे. | • समस्या / मुद्द्यांची यादी तयार होईल.<br>• घेतलेल्या सभांचे इतिवृत्त तयार करणे.<br>• विहीत समाज घटकांच्या विकासासाठी हाती घ्यावयाच्या उपक्रमांची यादी करणे. |
| अंमलबजावणी | सनियंत्रणात आदिवासी घटकांचा समान सहभाग घेणे. | प्रकल्पाचे संनियंत्रण व मुल्यमापन प्रक्रियेमध्ये विहित समाज घटकांच्या प्रतिनिधिंना सहभागी करून घेतले जाईल. |
| | विहित समाज घटकांच्या लोकांना विविध भौतिक सुविधांच्या बांधकामासाठी व काढणी पश्चात सुविधा निर्मितीसाठी रोजगार उपलब्ध करून देणे. | रोजगार प्राप्त झालेल्या आदिवासींची संख्या |

| टप्पे | कार्यपध्दती | करावयाची कामे व साध्यता |
|---|---|---|
| कार्यान्वयन | शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्यकारी समितीमध्ये विहित महिलासह विविध समाज घटकांच्या प्रतिनिधींचा समावेश निश्चित करणे. | विहित समाज घटकांच्या सभासदांना उत्पादक संस्थेच्या कार्यकारी समितीमध्ये जास्तीत जास्त सहभाग मिळेल. |
| | महिलांसह एफपीसीमध्ये भागधारक म्हणून एसटी सदस्यांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे. | भागधारक म्हणून आदिवासी सदस्यांची संख्या, लिंगानुसार विभक्त |
| | एसटी सदस्यांची क्षमता वाढवणे आणि कौशल्य वाढवणे. | प्रशिक्षित आदिवासी सदस्यांची संख्या, लिंगानुसार |

**नमुना प्रपत्र**

**आदिवासी विकास आराखडा (Indigenous Peoples Plan)**

- प्रकल्पाचा तपशील (स्मार्ट प्रकल्प व प्रस्तावित उपप्रकल्प)
- आदिवासी विकास आराखडा निर्मितीची उद्दिष्टे
- आदिवासी विकास आराखडा तयार करण्यासाठी अवलंबलेली कार्यपद्धत
- प्रतिकूल परिणामांचा प्रभाव कमी करणे
- व्यापक समुदाय समर्थनासाठी विनामूल्य आणि पूर्व सूचित संमती (FPIC).
- सामाजिक मूल्यांकन
  - कौटुंबिक सर्वेक्षणाचे निष्कर्ष
  - परिणाम/ प्रभावांचा तपशील - मालमत्ता, सामुदायिक संसाधने, उपजीविकेवर होणारा सकारात्मक आणि प्रतिकूल परिणाम इ.
- कृती आराखडा
  - निश्चित केलेल्या उपाय योजना (IPF मध्ये नमूद केल्याप्रमाणे)
  - अंमलबजावणी दरम्यान विनामुल्य, प्राथमिक व सूचित सल्लामसलत
  - अंमलबजावणीचे वेळापत्रक (उपक्रमनिहाय आणि महिन्यांनुसार)
  - विनामुल्य, प्राथमिक व माहितीपूर्ण केलेली सल्लामसलत
  - प्रस्तावित उपाय योजना
  - अंमलबजावणीचे सनियंत्रण
- सनियंत्रण निर्देशांक
- अंमलबजावणी अंदाजपत्रक
- उपाय योजना अंमलबजावणीसाठी
- सल्ला मसलत करण्यासाठी – साहित्य व लॉजिस्टिक
- तक्रार निवारण यंत्रणा

## २.२. धोरण ४.१२ अनैच्छिक पुनर्वसन

प्रकल्पाचा मुख्य उद्देश हा पिकांच्या काढणीनंतरच्या पायाभूत सुविधां निर्माण करण्यावर आहे. उप-प्रकल्पामध्ये वेअर हाऊस, सायलो, पॅक हाऊस, कोल्ड स्टोरेज, राईस मिल, डाळ गिरणी, प्रतवारी आणि वर्गीकरण युनिट, संकलन/एकत्रीकरण केंद्र, गोठ्यांचे बांधकाम यासारखे उपक्रम हाती घेतले जाऊ शकतात. या पायाभूत सुविधांसाठी जमिनीची आवश्यकता असेल. जमिनीची आवश्यकता हे प्रकल्पांतर्गत सामाजिक मूल्यमापनाच्या मार्गदर्शक तत्त्वांपैकी एक आहे कारण एखाद्या विशिष्ट उप-प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्यामध्ये पुनर्वसन आणि पुनर्वसनाच्या संदर्भात अनेक सुरक्षा समस्यांचा समावेश आहे. उपप्रकल्पाअंतर्गत व्यवसाय उभारणीसाठी सरकारी विभाग/एजन्सीकडे उपलब्ध असलेल्या किंवा शेतकरी उत्पादक कंपनीकडे उपलब्ध असलेल्या जमिनीवर किंवा भाडेतत्त्वावर किंवा भाड्याने जमीन भाड्याने घेतील. या पायाभूत सुविधांच्या विकासादरम्यान कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब बाधित होणार नाही किंवा त्यांचे पुनर्वसन होणार नाही याची खात्री केली जाईल. प्रकल्पाचा सामाजिक आणि पुनर्वसन परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने अशी परिस्थिती उद्भवल्यास प्रकल्पाच्या या प्रभावांना सामोरे जाण्यासाठी पुनर्वसन आराखडा पुनर्वसनाशी संबंधित प्रकल्प क्षेत्रातील सध्याच्या परिस्थितीच्या मूल्यांकनावर आधारित तयार केले जावे. सदरचा आराखडा प्रतिकूल सामाजिक आणि आर्थिक प्रभाव कमी करण्यासाठी दूर करण्यासाठी अवलंबावयाची तत्त्वे आणि दृष्टिकोनांची माहिती देतो.

### अ. पुनर्वसन धोरण आराखडा निर्मितीचा उद्देश

पुनर्वसन धोरण आराखडा (RPF) प्रकल्पाशी संबंधित लागू असलेल्या कायद्यांवर आणि अनैच्छिक पुनर्वसनावर बँक OP ४.१२ वर आधारित आहे. प्रकल्पाच्या नियोजन, रचना आणि अंमलबजावणीमुळे प्रभावित झालेल्या लोकसंख्येवर होणारे प्रतिकूल सामाजिक परिणाम शक्य असल्यास टाळणे असे शक्य नसल्यास त्याचा परिणाम कमी करणे हा पुनर्वसन धोरण आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. यासाठी अशी परिस्थितीत सामाजिक परिणाम मूल्यांकनाद्वारे सामाजिक प्रभावाचे स्वरूप आणि परिणामांचे मूल्यांकन केले जाईल. याचबरोबर आवश्यक असल्यास ईएसएमएफमध्ये प्रदान केलेल्या सामाजिक सुरक्षेशी सुसंगत पुनर्वसन कृती आराखडा (आरएपी) किंवा संक्षिप्त पुनर्वसन कृती आराखडा (एआरएपी), तयार केले जाईल आणि बाधित लोकांना मदत करण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यास सक्षम करण्यासाठी प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी लागू केले जाईल.

खालील दिलेल्या बाबीवर आर्थिक आणि सामाजिक प्रतिकूल प्रभाव  कमी करता येवू शकतील :

- जमीन आणि मालमत्तेचे नुकसान
- निवारा किंवा घराच्या जमिनीचे नुकसान
- उत्पन्न किंवा उपजीविकेचे साधन गमावले
- उत्पादक संसाधने, निवारा / निवासस्थानांमध्ये प्रवेश गमावणे

## ब. विस्थापन पुनर्वसन विषयी मार्गदर्शक तत्वे

- स्थानिक लोक त्यांच्या घरापासून अथवा व्यापारी जागेतून वंचित होतील असा कोणताही उपप्रकल्प राबविला जाणार नाही.
- या प्रकल्पाअंतर्गत कोणतीही खाजगी जमिन भूसंपादित केली जाणार नाही परंतु तसे करावे लागल्यास सदर जागेच्या किंमतीच्या बदल्यात नुकसान भरपाई देण्यात येईल.
- प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीसाठी खाजगी मालक व अतिक्रमण केलेल्या लोकांनी स्वखुशीने व ऐच्छिकपणे - प्रकल्पासाठी जमिनी स्वाधीन करण्यासाठी प्रयत्न करावेत परंतू कोणत्याही प्रकारची जबरदस्ती यासाठी करण्यात येऊ नये. एखाद्या जागेवरील अतिक्रमण संबंधी कारवाई करताना त्यांचे नुकसान झाल्यास संबंधीत कुटुंबास मदर करण्यात येईल.
- विस्थापन व पुनर्वसन आराखडा तयार करताना, त्याची अंमलबजावणी करतांना आणि देखरेख करताना बाधित कुटुंबाशी सल्ला मसलत करण्यात येईल.
- वित्त, भौतिक, मनुष्य बळ यासारखी पर्याप्त साधने या प्रकल्पाअंतर्गत होणा-या विस्थापन व पुनर्वसन कार्यासाठी उपलब्ध करून दिली जातील.
- बाधित कुटुंबातील व्यक्तिंना या प्रकल्पाअंतर्गत रोजंदारीवरील कामासाठी प्राधान्य दिले जाईल.
- सार्वजनिक मालमत्तेला बाधा येत असेल तर (उदा. देवालयाच्या इमारती, गायराने इ.) पर्यायी व्यवस्था केली जाईल अथवा योग्य ती नुकसान भरपाई दिली जाईल.
- प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वीच उपप्रकल्पामुळे होऊ शकणा-या नुकसानीच्या पडताळणी करून पुनर्वसन आराखडा तयार करण्यात येईल.
- प्रकल्प कामांसाठी जर एखाद्या जमीन मालकांने किंवा संस्थेने स्वखुषीने दिली असेल तर आवश्यक ते संमतीपत्र, कागदपत्रे व उता-यातील नोंदी इ. बाबींची दखल घेऊन योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. या संदर्भात काही तक्रार निर्माण झाल्यास त्याची सोडवणूक संबंधित अंमलबजावणी संस्था, प्रकल्प कार्यालय व नोडल एजन्सीच्या स्तरावर केली जाईल.
- भौतिक विस्थापन टाळण्यासाठी आणि पुनर्वसन प्रकल्प म्हणून कारवाई केली जाईल.
    (a) प्रकल्प कोणत्याही PP/MAP/WBIs ला जमीन विकत घेता वित्तपुरवठा करणार नाही.
    (b) प्रकल्प जमिनीच्या थेट खरेदीसाठी वित्तपुरवठा करणार नाही.
    (c) प्रकल्पामध्ये भौतिक विस्थापन होणार नाही.
    (e) पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निवडलेली जमीन अतिक्रमण आणि भारापासून मुक्त असेल.

(d) पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निवडलेली जमीन सामुदायिक किंवा खाजगी जमीन असेल. भाड्याने किंवा भाडेपट्टीसाठी जमीन २९ वर्षांसाठी नोंदणीकृत लीज करार आवश्यक असेल.

## घटक क्र. ३ कामगार आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन

प्रकल्पा अंतर्गत समुदाय आधारित संस्थाना वेगवेगळया कामांसाठी उदा. गोदाम, सायलो, पॅक हाऊस, कोल्ड स्टोरेज, डाळ मिल/सफाई आणि ग्रेडिंग युनिटसाठी शेड इत्यादी. कामगारांची आवश्यकता लागणार आहे. यापैकी सर्वप्रथम व्यवसायाच्या उभारणीसाठी आवश्यक बांधकाम करण्यासाठी, व्यवसायाच्या उभारणी नंतर व्यवसायाच्या संचालना दरम्यान कामगारांची आवश्यकता लागणार आहे. सदरची कामे व्यापक नसली तरी कामगार कायदे आणि जागतिक बँकेच्या धोरणांचे पालन करून बांधकाम साइटवर किंवा पायाभूत सुविधांवर कामगारांना सक्षम वातावरण प्रदान करणे अत्यावश्यक आहे. यासाठी काही कामगार हे स्थलांतरीत करावे लागणार आहेत तर काही कामगार हे स्थानिक स्तरावरून घ्यावे लागणार आहेत. या कामगारांच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी शासनाच्या कामगार कायद्यांचे अनुपालन करणे प्राधान्यक्रमाचे आहे. या दृष्टीकोनातून प्रकल्पाअंतर्गत कामगार व्यवस्थापन आराखडा तयार करणे अभिप्रेत आहे. या दृष्टीकोनातून प्रकल्पाअंतर्गत कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षितेसाठी खालील उद्देश राहतील.

### अ. उद्देश

- कामाच्या ठिकाणी  कामगारांच्या सुरक्षिततेस आणि आरोग्यास प्रोत्साहन देणे.
- कामगारांना समान वागणूक, भेदभाव न करणे आणि सर्व कामगारांना समान संधी देणे.
- महिला, अपंग व्यक्ती, मुले (कामाच्या वयानुसार) यांच्यासह स्थलांतरित कामगार, कंत्राटी कामगार, समुदायातील कामगारांचे संरक्षण करणे.
- सक्तीची मजुरी आणि बालमजुरीस प्रतिबंध करणे.
- शासनाने निर्धारित केलेल्या कामगार कायद्याशी सुसंगत तत्त्वांचे समर्थन करणे.
- प्रकल्प कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी समस्या मांडण्यासाठी सुलभ माध्यम प्रदान करणे.
- कामाच्या ठिकाणी लिंग आधारित हिंसा आणि महिलांचा लैंगिक छळ रोखणे.

### ब. कामगार व्यवस्थापन कसे करावे

नागरी कामासाठी कंत्राटदारासोबत करार करताना, कामगार कायद्यांचे पालन करणाऱ्या कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षेसाठीच्या तरतुदी करारामध्ये समाविष्ट केल्या जातील याची खात्री समुदाय आधारित संस्थांनी केली पाहिजे. तसेच, कंत्राटदाराने नाव, वय, लिंग, मजुरी, कामाचे दिवस, कुशल/अकुशल, कामाचा प्रकार यासह मजुरांचे तपशील जपून ठेवावेत. करारामध्ये नमूद केलेल्या बाबींचे अनुकरण करून कंत्राटदार कामगारांचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करत असल्याची खात्री सीबीओने केली पाहिजे. तसे न झाल्यास सीबीओने कंत्राटदारावर आवश्यक ती कारवाई करावी. त्याचप्रमाणे, समाजावर आधारित संस्थांनी व्यवसाय चालवताना दैनंदिन कामात गुंतलेल्या कामगारांचे योग्य व्यवस्थापन करावे.

### ब.१ स्थलांतरीत झालेल्या मजुरांसाठीची व्यवस्था

बाहेरून आलेल्या मजूरांची आणि कामगारांची नीट काळजी न घेतल्यास काही वेळा स्थानिक संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. विशेषत: उपप्रकल्पाचे गाव छोटे आणि दुर्गम असेल तर बाहेरची माणसांच्या वेगळया व्यवहाराने जुगार, गुन्हेगारी यांसारख्या काही समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. आधीच अपुऱ्या असणाऱ्या आरोग्य आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांच्यावर ताण वाढू शकतो. उपप्रकल्पातील बांधकामाच्या ठिकाणी स्थानिक पातळीवर 'मजूर आणि कामाची स्थिती' याचे व्यवस्थापन केले जाईल. बांधकाम सुरू होण्यापूर्वी याचे नियोजन केले जाईल. वरती कामगार व्यवस्थापनाचे काही पैलू दिले आहेत. बाहेरच्या कामगारांसाठी त्यात पुढील मुद्द्यांची भर पडेल.

- स्थलांतरित झालेल्या बांधकाम मजूरांची निवासाची व्यवस्था करण्यात यावी. कंत्राटदारांनी त्यांना चांगला निवारा, वीज, पाणी, शौचालय, सांडपाणी व्यवस्था यासारख्या आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. याशिवाय प्राथमिक आरोग्य सुविधा, कामगार सुरक्षा व अन्य कल्याणकारी योजनांचा अवलंब कंत्राटदाराने करावा. स्थानिक नैसर्गिक संसाधनांची हानी (उदा.वृक्षतोड) अशा मजूरांमुळे होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- स्थानिक लोकांशी चागले संबंध निर्माण करावी.
- बाहेरून आलेल्या मजुरांच्या राहण्याच्या आणि कामाच्या ठिकाणी नियमावली तयार करावी.
- कामगारांची राहण्याची जागा पुरेशी मोठी असावी, त्यात स्वच्छतागृह असावे. स्वयंपाक करण्याची सोय असावी.
- दारू आणि इतर नशील्या पदार्थांच्या दुष्परिणामांची मजूरांना माहिती द्यावी.
- मजूरांची राहण्याची व्यवस्था (ठिकाण) स्थानिक लोकांशी सल्लामसलत करून नक्की करावी.
- रासायनिक, भौतिक आणि जैविक पदार्थ आणि एजंट्सशी संबंधित योग्य उपायांचा वापर करून, कामाची ठिकाणी, यंत्रसामग्री, उपकरणे आणि त्यांच्या नियंत्रणाखालील प्रक्रिया सुरक्षित आणि आरोग्यास धोका नसल्याची खात्री करावी.
- कामगारांसाठी व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्याविषयी प्रशिक्षण आणि उपकरणांचा मशिनरीचा वापर इ. बाबत प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

### ब.२ कामाच्या ठिकाणी / बांधकाम चालू असताना द्यावयाच्या सुविधा

कामाच्या ठिकाणी कामगारांना खालील सुविधा पुरविणे आवश्यक आहे. संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा समुदाय आधारित संस्थांचे सामाजिक छाननी करतील.

| आरोग्य व सुरक्षा सुविधा | स्वच्छता |
|---|---|
| • कामगारांना कामासाठी आवश्यक ते कपडे (ऍप्रन्स), हेल्मेट, नाक व तोंड झाकण्यासाठी मास्क, हँडग्लोवज, गम बूट्स पुरवण्यात यावेत.<br>• प्रथमोपचाराची व्यवस्था असावी.<br>• दर सहा महिन्यांनी कामगारांची आरोग्य तपासणी केली जावी.<br>• कामगारांचे आवश्यक ते लसीकरण केले जावे.<br>• HIV संबंधी जागृती करण्यात यावी.<br>• कामाच्या ठिकाणी होणारे अपघात आणि त्यावर केलेली कृती यांची नोंद ठेवावी. | • कामगारांना कपडे बदलण्यासाठी वेगळी जागा असावी.<br>• स्त्री आणि पुरूष कामगारांसाठी वेगवेगळी स्वच्छता गृहे असावेत.<br>• स्वच्छ आणि पाण्याची सोय असलेली स्वच्छतागृहे असावीत. |
| **इतर**<br>• महत्त्वाचे सामान सुरक्षित ठेवण्यासाठी लॉकर्स, उपहारगृह, प्रार्थनेसाठी जागा आणि कामाच्या ठिकाणी प्रकाश पुरेसा असावा.<br>• प्रत्येक कामगाराला  कामाचे नियम आणि अटी (किती तास काम, पैसे किती मिळणार इत्यादी) माहिती असावे.<br>• बालकामगार नेमू नयेत.<br>• १४ ते १८ वयोगटातील युवकांना धोकादायक कामे देऊ नयेत.<br>• वेठबिगारीने लोकांना कामाला लावण्यास प्रतिबंध आहे.<br>• कामाच्या ठिकाणी महिला कामगारांच्या सुरक्षिततेविषयी आवश्यक ती काळजी घेतली जावी.<br>• महिलांचे लैंगिक छळ  होणार नाही याबाबतची काळजी घ्यावी. | |

### घटक  क्र. ४ तक्रार निवारण व्यवस्थापन

जागतिक बँकेच्या सूचनेनुसार स्मार्ट प्रकल्पाच्या समन्वय व अंमलबजावणी कक्षात विशिष्ट तक्रार निवारण यंत्रणा (GRM) स्थापित करण्यात आली आहे, ज्यामध्ये प्रभावित लोकांच्या समस्या, तक्रारी आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी योग्य तक्रार निवारण प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.

१. टोल फ्री क्रमांक १८००-२१०-१७७०

१. तक्रारी सादर करण्यासाठी GRM विशिष्ट ईमेल आयडी-mahasmart.grm@gmail.com

३. प्रत्येक स्तरावर म्हणजे, प्रकल्प समन्वय आणि देखरेख युनिट, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PCMU), विभागीय अंमलबजावणी कक्ष (RIU) आणि जिल्हा अंमलबजावणी कक्ष (DIU), या स्तरावर GRM ची स्थापना केली आहे. तक्रार निवारण अधिकारी आणि अपील अधिकारी यांना प्रत्येक स्तरावर नामनिर्देशित केले आहे. जिल्हा अंमलबजावणी युनिटमध्ये उप प्रकल्प संचालक आत्मा  हे तक्रार निवारण अधिकारी (GRO) आणि प्रकल्प संचालक आत्मा हे अपीलीय अधिकारी (AA) आहेत.

तक्रार नोंदवही प्रत्येक स्तरावर ठेवली जाईल ज्यामध्ये प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची नोंद असेल आणि ती निकाली निघेपर्यंत केलेल्या कारवाईचा समावेश असेल. प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीला विशिष्ट संदर्भ

क्रमांकासह टॅग केले जाईल. प्रत्येक तक्रारीची पावती प्रमाणित पोचपावतीद्वारे केली जाईल जी तक्रार प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांच्या आत तक्रारकर्त्याला पाठवली जाईल किंवा वैयक्तिकरित्या सादर केलेल्या तक्रारींच्या प्राप्तीच्या वेळी व्यक्तीकडे सुपूर्द केली जाईल. तक्रारकर्त्याला प्रत्येक स्तरावर सुचविलेल्या प्रस्तावित प्रतिसाद वेळेत निवारणाच्या मार्गाने केलेल्या कारवाईची माहिती त्वरीत दिली जाईल. अनुपालनासाठी प्रस्तावित प्रतिसाद वेळ खाली नमूद केला आहे.

### ४.१ तक्रार निवारण अधिकारी व आपिलीय प्राधिकारी

प्रकल्पा अंतर्गत स्थापित करण्यात आलेल्या तक्रार निवारण कक्षात नियुक्त करण्यात आलेल्या तक्रार निवारण अधिकारी व आपिलीय प्राधिकारी यांचा तपशिल खालील तक्त्यात देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | पदनाम | नामनिर्देशीत पद | तक्रार निवारण कालावधी |
|---|---|---|---|
| **प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | ०७ दिवस |
| १ | समन्वयक (सनियंत्रण व मुल्यमापन) | तक्रार निवारण अधिकारी | |
| २ | अतिरिक्त प्रकल्प संचालक | अपिलीय प्राधिकारी | |
| **प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) - राज्य स्तर** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | ०७ दिवस |
| १ | नोडल अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी | |
| २ | संबंधित विभाग प्रमुख - व्यवस्थापकीय संचालक/ संचालक/ आयुक्त/ मुख्य कार्यकारी अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | |
| **विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, विभाग स्तर - (RIU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | ०७ दिवस |
| १ | नोडल अधिकारी, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा अधिक्षक कृषि अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी | |
| २ | प्रमुख, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा विभागीय कृषि सहसंचालक | अपिलीय प्राधिकारी | |
| **जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, जिल्हा स्तर - (DIU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | १० दिवस |
| १ | नोडल अधिकारी, जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा उपसंचालक, आत्मा | तक्रार निवारण अधिकारी | |
| २ | प्रमुख, जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा | अपिलीय प्राधिकारी | |

## ४.२. तक्रार निवारण अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची जबाबदारी

### अ. तक्रार निवारण अधिकारी यांची जबाबदारी खालीलप्रमाणे आहे.

- कार्यालयात दर्शनीय ठिकाणी नोटिस बोर्डवर तक्रार निवारण अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे नाव, दूरध्वनी क्रमांक, भेटण्याची वेळ व ई-मेल आयडी (mahasmart.grm@gmail.com) इ. तपशील नमूद करणे.
- तक्रार प्राप्त झालेल्या दिवसापासून ०३ दिवसाच्या आत तक्रारकर्त्यास तक्रार प्राप्त झाल्याची लेखी/ई-मेलद्वारे पोच देणे (टोकन कम्प्लेंट नंबरसहीत).
- विहीत कालावधीत तक्रारीचे निवारण करणे.
- एखादया स्तरावर संबंधित नसलेले तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी सदर तक्रार योग्य ठिकाणी अग्रेषित करणे. तसेच सदर माहिती संबंधित तक्रार कर्त्यास कळविणे.
- दरमहा प्रकल्पाच्या MIS प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करणे.

### आ. अपिलीय प्राधिकारी यांची जबाबदारी खालीलप्रमाणे आहे.

- सर्वे तक्रारीचे विहीत वेळेत निवारण करण्याकरीता सनियंत्रण करणे.
- दरमहा प्रकल्पाच्या MIS प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करण्याबाबत खातरजमा करणे.
- तक्रारकर्ते वेगवेगळया माध्यमाद्वारे तक्रार दाखल करु शकतात. उदा. भ्रमणध्वनी, व्हॉटसअप, ई- मेल, लेखी तक्रार इ .सर्व तकारीची नोंद घेवून त्याची पोच पावती तक्रार करणाऱ्या व्यक्तीला देवून विहित मुदतीत तक्रारीचे निवारण प्रकल्पाद्वारे करण्यात येईल. जर तक्रार करणाऱ्या व्यक्तीला तक्रारीचे निवारण समाधानकारक वाटत नसेल तर ते पुढील स्तरावर तक्रार दाखल करु शकतात.

### इ. तक्रार निवारण नोंदवही

- प्राप्त तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे तक्रार निवारण नोंदवही ठेवण्यात यावी.

| अनु. क्र. | नाव व पत्ता | तक्रारीचे स्वरूप | तक्रार प्राप्त दिनांक | तक्रारीचा टोकन क्र. | तक्रारकर्त्यास तक्रारीची पोच दिल्याचा दिनांक | तक्रारीचे उत्तर दिल्याचा दिनांक | तक्रार निवारण अधिकारी स्वाक्षरी | अपिलीय प्राधिकारी स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

### ४.३ नकारात्मक यादीचे अनुपालन (Compliance with Negative List)

वर दिलेल्या निकषांसोबत आणखी एक महत्त्वाची यादी आहे ती म्हणजे नकारात्मक यादी तिचे पालन होणे आवश्यक आहे.

- या उपप्रकल्पामधील उपक्रमांकरीता खाजगी जागा ताब्यात घेणे अनिवार्य आहे का?
- या उपप्रकल्पामधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेतली जाणार आहे का?
- या उपप्रकल्पातील उपक्रमांमुळे लोकांचे तसेच घरे, दुकाने, इमारती, इ.चे स्थलांतरण होणार आहे का?
- या उप-प्रकल्पातील उपक्रमांमुळे सामान्य मार्ग, सुविधा व संसाधने वापरण्याची संधी बंद होणार आहे का?
- याउपप्रकल्पातील उपक्रमांमुळे स्थानिक उदरनिर्वाह व व्यवसायांवर विपरित परिणाम होणार आहे का?
- या उपप्रकल्पांमध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेल्या क्षेत्रातील गावामध्ये आदिवासी समाजाला प्रकल्पाची माहिती देण्याकरीता पुर्वसूचना देवून विनाशुल्क चर्चा केली नाही असे आहे का?
- या उपप्रकल्पामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेल्या क्षेत्रातील क्षेत्रातील अशी गावे आहेत का जेथे आदिवासी समाजाची व्यापक स्तरावर प्रकल्प अंमलबजावणीकरीता संमती मिळाली नाही?
- या उपप्रकल्पामध्ये अशा कोणत्याही उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धा, प्रथा आणि त्यांच्या उदरनिर्वाहावर नकारात्मक परिणाम होऊ शकेल?
- या उपप्रकल्पामध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे पुरातत्व, ऐतिहासिक व सांस्कृतिक मालमत्तेवर विपरित परिणाम होऊ शकेल?
- या उपप्रकल्पामध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामध्ये बालकामगार , वेठबिगार किंवा इतर कामगारांचे शोषण करण्याच्या पध्दतीचा अवलंब असेल?
- या उपप्रकल्पामध्ये खोल खोदकाम, घातक रसायने, स्फोटके, धोकादायक स्थळे संबंधित उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे कामगार आणि स्थानिक समुदायांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात येईल?
- या उपप्रकल्पामध्ये बांधकाम किंवा प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान कामगारा करीता काही धोकादायक कामांचा समावेश आहे का?

### ब.३ समुदाय आधारित संस्थांची सामाजिक तपासणी

स्मार्ट प्रकल्पात ज्या सामुदायिक संस्था निवडल्या जातील त्या सर्वांना सामाजिक व्यवस्थापन आराखड्याचे पूर्ण

पालन करायचे आहे. त्या दृष्टीने सामुदायिक संस्थांच्या उपप्रकल्पांची निवड करताना सामाजिक व्यवस्थापन आराखड्यात दिलेले निकष वापरले जातील ते निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**१. जागेचा वापर, पुनर्वसन, जागा संपादन, आदिवासी कार्यक्षेत्र याबाबत माहिती**

| क्र. | तपशील | होय | नाही | होय असल्यास तपशील द्यावा |
|---|---|---|---|---|
| १. | या उपप्रकल्पातील उपक्रमांकरिता खाजगी जागा ताब्यात घेणे प्रस्तावित आहे का? | | | |
| २. | या उपप्रकल्पातील उपक्रमांकरिता ग्रामपंचायत अथवा शहरी स्थानिक संस्था यांच्या जागेचे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ३. | प्रस्तावित जागेवर अतिक्रमण नसल्याचे ग्रामपंचायत /संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ४. | प्रस्तावित जागेवर कोणत्याही प्रकारची घुसखोरी झालेली नाही याबद्दल ग्रामपंचायत /संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ५. | सदर जागेवर कायदेशीर व बेकायदेशीर स्थलांतरित कराव्या लागणाऱ्या रचनांची (उपजीविकेचे साधन उदा. टपरी, दुकान इ.) संख्या? | | | |
| ६. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे स्थलांतरित कराव्या लागणाऱ्या कुटुंबांची संख्या? | | | |
| ७. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे सामूहिक मालमत्ता, जसे की गायरान जमीन, स्मशानभूमी, दफनभूमी इ. चे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ८. | उपप्रकल्पात निवडलेल्या जागेचा व आजुबाजूच्या जागेचा वापर कशाकरीता होतो? (उदा. सामुदायिक सुविधा, शेती, पर्यटन, खाजगी मालमत्ता इ.) | | | |
| ९. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे खालील नमुद बाबींची कायमस्वरूपी किंवा तात्पुरती हानी होणार आहे का?<br>पिके, फळझाडे, किरकोळ दुकाने, भाजीपाला/मासे/ मटण विक्री, सायकल दुरुस्ती दुकान, गॅरेज, चहाचे दुकान, गायरान जमीन इ. | | | |
| १०. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवरील लोकांना (महिला व पुरूष) रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे का? | | | |
| ११. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवर दारिद्र्य निर्मूलनाचे लक्ष्य साध्य होण्यास मदत होणार आहे का? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | उपप्रकल्प आराखडा नियोजनामध्ये व अंमलबजावणीमध्ये स्थानिक लोकांचा (महिला व पुरूष) पुरेसा सहभाग घेतला जाणार आहे का? | | | |
| १३. | उपप्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १४. | उपप्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या महिलांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १५. | उपप्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या वंचित कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १६. | उपप्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १७. | उपप्रकल्प क्षेत्र परिशिष्ट-V क्षेत्रातील (आदिवासी जिल्हे व तालुके ) आहे का? | | | |
| अ | राष्ट्रीय व स्थानिक कायद्यानुसार/धोरणानुसार व मानववंशशास्त्राच्या अभ्यासानुसार उपप्रकल्पातील लोक/समूह “आदिवासी लोक/ समूह डोंगराळ जमाती/अनुसूचित जमाती” म्हणून ओळखल्या जातात का? | | | |
| ब. | उपप्रकल्पातील हा समुदाय स्वत:ला प्रस्थापितांपेक्षा भिन्न/वेगळया सामाजिक व सांस्कृतिक घटकाचा मानतो का? | | | |
| क. | उपप्रकल्पातील हा समुदाय एकत्रपणे वेगळी वस्ती करून राहतो का? / वंशपरंपरागत क्षेत्रात राहतात का? व नैसर्गिक संसाधनांशी सामूहिकरीत्या संलग्न आहेत का? | | | |
| ड. | उपप्रकल्पातील हा समुदाय प्रस्थापितांपेक्षा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय पातळीवर वेगळेपणा राखून आहेत का? | | | |
| इ. | उपप्रकल्पातील आदिवासी लोकांची बोलीभाषा प्रस्थापितांपेक्षा वेगळी आहे का? | | | |
| ई. | उपप्रकल्पातील हा समुदाय ऐतिहासिक दृष्ट्या, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या उपेक्षित, वंचित, आणि वगळले गेले आहेत आणि/किंवा त्यांच्याशी भेदभाव केला गेला आहे असे आहे का? | | | |
| १८. | उपप्रकल्पातील या प्रकारचा समुदाय “आदिवासी लोक/समूह” म्हणून कोणत्याही राष्ट्रीय अथवा स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेसंबंधी गठित औपचारिक समितीत प्रतिनिधित्व करतो का? | | | |
| १९. | उपप्रकल्पामार्फत सदर आदिवासी समुदायाला अप्रत्यक्ष अथवा प्रत्यक्ष लाभ होणार आहे का? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | उपप्रकल्पामधील उपक्रमांमुळे आदिवासी लोकांच्या रूढी व पारंपरिक तसेच सामाजिक संस्कृतीवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे परिणाम होणार आहे का? (उदा. बालसंगोपन, शिक्षण, कला, आरोग्य इ.) | | | |
| २१. | या उपप्रकल्पातील उपक्रमांमुळे आदिवासींच्या उदरनिर्वाह तसेच जीवनमान प्रणालीवर परिणाम होणार आहे का? (उदा. अन्न उत्पादन प्रणाली, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हस्तकला आणि व्यापार, | | | |
| २२. | उपप्रकल्प हा आदिवासी लोकांच्या ताब्यात असलेल्या व त्यांच्या मालकीच्या व वापरात असलेल्या जागेमध्ये आहे का? | | | |

### ४.४ सामाजिक कृती आराखडा

**१. सामाजिक कृती आराखडा अंमलबजावणीकरीता जबाबदार व्यक्तीचे नाव -**

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमुद करा) |
|---|---|---|
| **२. उप-प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्राची माहिती** | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र अनुसूचित *Schedule V*[1] *(*आदिवासी*)* क्षेत्रामध्ये आहे का? | | |
| उप-प्रकल्पांमध्ये विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (Particularly Vulnerable Tribal Groups) आहेत का?[2] | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र डावे विंग अतिरेकी[3]/नक्षलवादी (Left Wing Extremism) क्षेत्रामध्ये येते का? | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र आकांक्षी जिल्हा (Aspirational District) अंतर्गत येते का?[4] | | |
| **३. नकारात्मक यादीचे अनुपालन (Compliance with Negative List)** | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा ताब्यात घेणे अनिवार्य आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेतली जाणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे लोकांचे तसेच घरे, दुकाने, इमारती, इ.चे स्थलांतरण होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे सामान्य मार्ग, सुविधा व संसाधने वापरण्याची संधी बंद होणार आहे का? | | |

[1] *Schedule V आदिवासी जिल्हे व तालुके यांची यादी पुढील संकेतस्थळावर उपलब्ध - https://cdnbbsr.s3waas.gov.in/s3c8758b517083196f05ac29810b924aca/uploads/2019/11/2019112132.pdf*

[2] *असुरक्षित आदिवासी गट- कटकारिया (कठोडिया), कोलम, मारिया गोंड*

[3] *डावे विंग अतिरेकी[3]/नक्षलवादी क्षेत्र - चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया*

[4] *आकांक्षी जिल्हे- नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद*

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमुद करा) |
|---|---|---|
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे स्थानिक उदरनिर्वाह व व्यवसायांवर विपरित परिणाम होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील गावामध्ये आदिवासी समाजाला प्रकल्पाची माहिती देण्याकरीता पुर्वसूचना देवून विनाशुल्क चर्चा केली नाही असे आहे का? | | |
| या उप प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील अशी गावे आहेत का जेथे आदिवासी समाजाची व्यापक स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी करीता संमती मिळाली नाही? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा कोणत्याही उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धा, प्रथा आणि त्यांच्या उदरनिर्वाहावर नकारात्मक परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे पुरातत्व, ऐतिहासिक व सांस्कृतिक मालमत्तेवर विपरित परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामध्ये बाल कामगार,[5] वेठबिगार[6] किंवा इतर कामगारांचे शोषण करण्याच्या पध्दतीचा अवलंब असेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये खोल खोदकाम कामे, घातक रसायने, स्फोटके, धोकादायक स्थळे संबंधित उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे कामगार आणि स्थानिक समुदायांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात येईल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये बांधकाम किंवा प्रकल्प् अंमलबजावणीदरम्यान कामगाराकरीता काही धोकादायक कामांचा समावेश आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे महिला, मुले आणि मुली यांचे हित, आरोग्य व सुरक्षा यांस हानी पोहोचेल? | | |
| **४. उपप्रकल्प अंमलबजावणी** | | |
| **४.१ उप-प्रकल्पांमध्ये वंचित घटकांचा समावेश** | | |
| उप-प्रकल्पांमध्ये वंचित शेतकरी कुटंब, (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला प्रधान कुटुंब, इ.) वंचित कामगार, भाडेतत्वावर शेती करणारे कुटुंब, परत आलेले | | |

[5] *14 वर्षाखालील बालकांना बालकामगार असे संबोधले जाते.*

[6] *वेठबिगार :निराधार, दुर्बल, परावलंबी व असंघटित व्यक्तींच्या अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा उठवून, त्यांना अंकित करुन, त्यांच्या इच्छेविरुध्द सक्तीने व योग्य मोबदला न देता किंवा विनामोबदला पडेल त्या कामाकरिता राबवून घेणे म्हणजे वेठबिगार.*

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमुद करा) |
|---|---|---|
| स्थलांतरीत कुटुंब इ. यांना समाविष्ट करुन घेण्याकरीता विशेष प्रयत्न प्रस्तावित आहेत का? | | |
| **४.२ आदिवासी क्षेत्रातील उपप्रकल्प** | | |
| आदिवासी समुदायाला उपप्रकल्पाची माहिती देण्याकरीता पूर्वसूचना देवून मोफत मार्गदर्शन केले आहेका? | | |
| उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी आदिवासी समुदायाची संमती प्राप्त झाली आहे का? | | |
| उपप्रकल्पाचे फायदे आदिवासी समुदायापर्यंत पोहोचतील याची खातरजमा केली जाणार का? | | |
| **४.३ जमिन** | | |
| ७/१२ चा उतारा किंवा खासगी जमीन २९ वर्षांकरीता भाड्याने लीज/वर घेतल्याचा नोंदणीकृत भाडेकरार सोबत जोडला आहे का? | | |
| जागेचे अतिक्रमण नसलेले संबंधित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे का? . (जिल्हा अंमलबजावणी यंत्रणा प्रमुख /ग्रामपंचायत / तलाठी इ. संबंधित) | | |
| **४.४ पायाभूत सुविधा** | | |
| कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षा सुविधां करीता काही उपाययोजना प्रस्तावित आहे का? (कामगार शिबिरादरम्यान ) {उदा. राहण्यासाठी पुरेशी जागा, स्वच्छता सुविधा, पिण्याचे पाणी, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वक्षतागृहे, मुलांसाठी पाळणाघर/स्वतंत्र शेड, महिलांच्या लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३) संदर्भात माहिती देणे/जागरुकता आणणे.} | | |
| बाहेरून येणाऱ्या कामगारांमुळे नि र्माण झालेल्या जोखीमा टाळण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहे का? (उदा. गुन्हे, संसर्गजन्य आजार, लिंग आधारीत हिंसाचार, बालकामगार, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| लिंग-आधारित हिंसा व लैंगिक छळ रोखण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा अंतर्गत समितीची स्थापना) | | |
| **४.५ कामगार व समुदाय आरोग्य आणि सुरक्षा** | | |
| समुदाय आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. शारीरिक इजा, अपघात, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कामगार आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? | | |

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमुद करा) |
|---|---|---|
| (उदा. कामाच्या ठिकाणी अपघात,शारीरिक इजा, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. सुरक्षित अंतर, मास्कचा वापर, इ.) | | |

| ५. उप-प्रकल्पातील सामाजिक उद्दीष्टे : | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र | तपशील | समुदाय आधारित संस्थेची सद्यस्थिती | उप-प्रकल्पाचे उद्दीष्टय |
| | उपप्रकल्पांमध्ये विविध घटकांचा समावेश [7] | | |
| I | एकूण शेतकरी/सदस्य संख्या | | |
| Ii | अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी संख्या (व टक्केवारी) | | |
| Iii | महिला भागधारक संख्या (व टक्केवारी) | | |
| Iv | महिला संचालक संख्या (व टक्केवारी) | | |
| V | अनुसूचित जाती सदस्य संख्या (व टक्केवारी) | | |
| Vi | अनुसूचित जमाती सदस्य संख्या (व टक्केवारी) | | |
| Vii | भाडेतत्वावर शेती करणारे सदस्य संख्या (व टक्केवारी) | | |
| Vii | भूमिहीन सदस्य संख्या (व टक्केवारी) | | |
| Ix | ७/१२ नावावर असणाऱ्या महिलांची संख्या (व टक्केवारी) | | |

*7 प्रकल्पाच्या सामाजिक विकास धोरणानुसार प्रकल्प अखेरीस प्रकल्पातील एकूण लाभार्थ्यांपैकी 80 % अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी, किमान 30 % महिला लाभार्थी, किमान 6 % अनुसूचित जमाती, किमान 7 % अनुसूचित जाती, तसेच समुदाय आधारित संस्थांमध्ये किमान 20% महिला संचालक लाभार्थी अनिवार्य आहे..*

# प्रकरण क्रमांक ५ शेतीच्या मुख्य प्रवाहात महिलांचा सहभाग

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना लिंगभाव व लिंगभाव विश्लेषण संकल्पना,महिलांना शेतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच्या धोरणांची माहिती होईल**.

राज्यात मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला आहे. लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नव उद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन प्रमुख पिकांच्या सर्वसमावेशक व स्पर्धात्मक कृषी मुल्यसाखळया विकसित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी शेतकऱ्यांचा समावेश असणाऱ्या समुदाय आधारित संस्थांनी (CBO) पिकाच्या मुल्यसाखळीतील अंतीम खरेदीदारांशी भागीदारी करून समुह पातळीवर शेती/ शेतीशी निगडीत क्षेत्रात व्यवसाय उभारून व तो चांगल्या पध्दतीने चालवून संस्थेच्या सभासदांचा निव्वळ नफा वाढविण्यासाठी काम करणे अभिप्रेत आहे. प्रकल्पांतर्गत यासाठी मुख्यत्वे उत्पादक भागीदारी उपप्रकल्प, बाजारपेठ संपर्क वाढीसाठीचा उपप्रकल्प, पुरक व नाविन्यपूर्ण गुंतवणूकीसाठीचा उपप्रकल्प, गोदाम आधारित उपप्रकल्प इत्यादीच्या माध्यमातून समुदाय आधारीत संस्थांना सहाय्य (तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी अनुदान) करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पात महिला शेतकऱ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात अपेक्षित असून त्यादृष्टीने महिला शेतकरी उत्पादक संघटना स्थापन करणे, त्यांचा सहभाग वाढवणे यावर विशेष भर देण्यात आला आहे. कृषी विभागाने प्रकल्पांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात महिलांच्या नेतृत्वाखालील ४०० उत्पादक कंपन्या तयार करून कृषी व्यवसाय / कृषी संलग्न उद्योग (जसे की शेळीपालन आणि परसातील कुक्कुटपालन) उभारणीसाठी आवश्यक सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर लिंगभाव (जेंडर) संकल्पना आणि स्मार्ट प्रकल्पाचे महिला शेतकऱ्यांच्या सक्रिय धोरण यांवर प्रमुख भागधारकांची क्षमता बांधणी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. या प्रकरणात लिंगभाव संकल्पना,महिलांना शेतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे धोरण याबाबत मूलभूत माहिती सादर केली आहे.

## ५.१ लिंगभाव (जेंडर)

सभोवताली आपण पाहतो की काही कामे स्त्रियांची म्हणून गणली जातात तर काही कामे पुरूषांची म्हणून गणली जातात. रोजचा स्वयंपाक करणे, घरातल्या सर्वांचे कपडे धुणे, घराची स्वच्छता ठेवणे, भांडी घासणे वगैरे कामे घरातल्या स्त्रियांची जबाबदारी असते. पुरूषाने बाहेर काम करून पैसे कमवून आणावेत आणि सर्व महत्त्वाचे निर्णय घ्यावेत असाही एक समज आहे. याला बरेच अपवाद आपण पाहतो. स्त्रिया सरकारी कार्यालयात आहेत, त्या बँकेत आहेत आणि त्या शेतातही काम करतात. म्हणजे अनेक स्त्रिया घराबाहेरचे काम करून पैसे कमावतात. स्वयंपाक करणे हे स्त्रियांचे काम मानले जाते, पण अनेक हॉटेलमध्ये स्वयंपाकाचे काम पुरूष करताना दिसतात. याचा साधासरळ अर्थ असा की स्त्री-पुरूषांच्या कामाची वाटणी, त्यांनी काय करावे आणि काय करू नये यासंबंधीचे समाजनियम हे निसर्गाने बनवलेले नसून समाजाने बनवलेले आहेत.

समाजाने स्त्री-पुरूषविषयक बनविलेल्या धारणांना लिंगभाव (जेंडर) असे म्हटले जाते. कमला भसीन त्यांच्या **'Understanding Gender'** या पुस्तकात लिहितात: पुरूष आणि स्त्री यांची सामाजिक-सांस्कृतिक व्याख्या म्हणजे जेंडर. समाज स्त्री आणि पुरूष यांच्यात जो भेदभाव करतो, त्यांना ज्या सामाजिक भूमिका देतो - तो आहे लिंगभाव.

मग स्त्रिया आणि पुरूषांमध्ये काहीच फरक नाही का?

तसा तर कोणत्याही दोन माणसांमध्ये फरक असतो. दोन स्त्रिया एकसारख्या नसतात आणि वडील-मुलगाही एकमेकांपेक्षा वेगळे असतात. स्त्री-पुरूषांमधला फरक मुख्यत्वे प्रजनन संस्थेतला आहे. पण त्या आधारे केले जाणारे बाकी सारे भेद मात्र समाजाने बनवलेले आहेत.

स्त्रिया आणि पुरूषांमधल्या जीवशास्त्रीय फरकाला लिगंभेद म्हणतात. तर स्त्रियांनी अमुक पद्धतीने वागावे (उदा. घरातले कामकाज करावे) आणि तमुक पद्धतीने वागू नये (उदा. मोठ्या आवाजात बोलू नये), पुरूषांनी असे वागावे (उदा. पत्नीपेक्षा जास्त कमवावे) आणि तसे वागू नये (उदा. रडू नये) अशा समाजाने लादलेल्या ज्या अपेक्षा असतात तो आहे लिगंभाव. चांगली स्त्री आणि चांगला पुरूष या समाजाने तयार केलेल्या चौकटीत आपण केवळ इतर स्त्री-पुरूषांना जोखतो असे नाही, तर आपण स्वत:चेही मूल्यमापन त्याच चौकटीतून करतो. कोणी ही पारंपरिक चौकट मोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्यास आप्तस्वकीयांकडून आणि समाजाकडून त्या व्यक्तीला नावे ठेवली जातात, काहीवेळी त्रासही दिला जातो. आपल्या इतरांकडूनच्या आणि स्वत:कडूनच्या अपेक्षा, स्वप्न, अपराधी भावना हे सारे समाजाच्या स्त्री-पुरूष विषयक धारणांनी प्रभावित असते.

प्रजनन संस्थेतल्या भेदाला लिंगभेद म्हटले जाते. तर लिंगाधारित सामाजिक भेदाला लिंगभाव म्हटले जाते. त्या दोन्हीतला फरक असा सांगता येतो.

**लिंगभेद**

- नर आणि मादी यांच्यातील शारिरीक आणि जीवशास्त्रीय फरक
- जन्मजात लाभलेल्या प्रजनन संस्थेवर आधारित
- स्त्री-पुरूष-अन्य असे वर्गीकरण केले जाते
- वैश्विक आहे – काळ आणि संस्कृती बदलली तरी फरक तोच राहतो

**लिंगभाव**

- स्त्रिया आणि पुरूष यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आणि व्यवहारातील फरक
- बाह्य घटकांमुळे हा फरक निर्माण होतो
- पुरूषी आणि बायकी असे वर्गीकरण केले जाते
- काळ, संस्कृती, स्थान, धर्म, वय ... यानुसार बदल दिसतो
- काळ आणि संस्कृती अशा घटकांमुळे बदल होतो

कोणत्याही समाजात, व्यवस्थेत स्त्रिया आणि पुरूष यांचे एकमेकांशी कसे नाते आहे याचा विचार करणे म्हणजे

जेंडरचा विचार करणे. स्त्रिया आणि पुरूष कोणकोणती कामे करतात, स्त्रिया आणि पुरूष कोणकोणते निर्णय घेतात, स्त्रिया आणि पुरूष यांचा कोणकोणती संसाधने वापरतात, कोणकोणत्या संसाधनांवर स्त्रिया आणि पुरूषांचे नियंत्रण असते, स्त्रिया आणि पुरूष यांनी कसे वागावे आणि कसे वागू नये यासंबंधी समाजाचे जे काही नियम आणि अपेक्षा असतात त्या सर्वांचा एकत्रिक विचार करणे म्हणजे लिंगभावाचा विचार करणे.

## ५.२ लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना

प्रशिक्षणार्थी जे अनुभव सांगतील त्या अनुभवांत काही समान सूत्रे समोर येतील. मुलगी आणि मुलगा यांच्यात लहानपणापासून भेदभाव केला जातो हे उदाहरणार्थ मुला-मुलींना दिली जाणारी खेळणी आणि त्यांना घालण्यात येणार कपडे यावरून स्पष्ट होते. मुलगी जसजशी मोठी होते तसतसे तिने घरातल्या कामात आईला मदत करावी आणि मुलाने वडिलांनी बाहेरची कामे करण्यात मदत करावी या अपेक्षा केल्या जातात. या भूमिकांमुळे आणि काही जीवशास्त्रीय स्थितीमुळे महिलांच्या आणि पुरूषांच्या गरजा वेगळ्या होत जातात. मुलग्यांना आणि पुरूषांना घरात एक प्रकारची सत्ता असते आणि मुलींचे-स्त्रियांचे स्थान दुय्यम राहते.काही महत्त्वाच्या संकल्पनांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

१. **लिंगभावाधारित भेदभाव** (Gender Discrimination) व्यक्तींना आणि विशिष्ट गुणधर्म असणाऱ्या समुहांना त्या गुणधर्मामुळे वेगळी वागणूक मिळणे म्हणजे भेदभाव. स्त्रियांबाबत केवळ त्या स्त्रिया आहेत म्हणून व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर अनेकदा भेदभाव केला जातो. हा लिंगभावाधारित भेदभाव होय. आपल्या सहकाऱ्यांनी सांगितलेल्या अनुभवांमधून आपल्याला लिंगभेदाची अनेक उदाहरणे मिळाली. आपल्याही आयुष्याकडे पाहतानाही आपल्याला ही उदाहरणे दिसतील. उदाहरणार्थ आपण गावात शेतकऱ्यांची बैठक घेतो तेव्हा पुरेशा खुर्च्या नसतील तर जमिनीवर कोण बसते आणि खुर्च्यांवर कोण बसते? एखाद्या कुटुंबात मुला-मुलींच्या शिक्षणासाठी पुरेसे पैसे नसतील तर कोणाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते? घरात सायकल कोणासाठी आधी घेतली जाते? सणासुदीच्या दिवशी घरात कोण आधी जेवते आणि कोण सर्वात शेवटी जेवते? नोकरीसाठी मुलाखत घेताना लग्नासंबंधीचे प्रश्न स्त्रियांना विचारले जातात की पुरूषांना विचारले जातात? देवळातले पुजारी कोण असतात – स्त्रिया की पुरूष? कुटुंबात आणि समाजात विविध स्तरांवर महिलांना अनेक ठिकाणी दुय्यम स्थान आहे हे अशा अनेक उदाहरणांवरून सिद्ध होते. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी आणि घरातही लैंगिक छळ सहन करावा लागतो. स्त्री भ्रूणहत्त्या आणि कायदेशीर हक्कांचा अभाव अशा समस्या स्त्रियांना सोसाव्या लागतात. शिक्षण आणि नोकऱ्या यात असलेली स्त्री-पुरष विषमता आपण सारेजण जाणतो. समान काम करून आणि समान जबाबदारी घेऊनही अनेक क्षेत्रांत स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी वेतन मिळते. आपल्या देशात स्त्री आमदार-खासदार यांची संख्या पुरूष आमदार-खासदारांपेक्षा लक्षणीय रीतीने कमी आहे. स्त्रियांबाबत असा भेदभाव त्यांच्या क्षमतांमुळे केला जात नसून केवळ स्त्रियांविषयीच्या असलेल्या लिंगभाव धारणांमुळे केला जातो. पुरूषांनाही याचे परिणाम भोगावे लागतात पण स्त्रिया आणि मुलींना याचे जास्त परिणाम भोगावे लागतात.

२. **लिंगभावाधारित भूमिका (Gender Roles):** येथे भूमिका या शब्दाचा अर्थ व्यक्तीचा सर्वसामान्य व्यवहार असा आहे. सामाजिक संस्कार आणि सामाजिक परंपरा यावर ही भूमिका आधारित असते. सर्वच समुदायांमध्ये महिलांकडून आणि पुरूषांकडून विशिष्ट प्रकारच्या अपेक्षा केल्या जातात आणि त्या वेगवेगळ्या असतात. उदाहरणार्थ पुरूषाने रडू नये, बाईने मोठ्याने हसू नये. या अपेक्षा फक्त इतर स्त्री-पुरूषांकडून नसतात तर स्वत:कडूनही असतात. आपण घरात, शाळेत, समाजात, कामाच्या ठिकाणी वावरताना, पुस्तकातून, चित्रपटातून, धार्मिक ग्रंथांतून या अपेक्षा शिकतो. सर्वांनी या अपेक्षांनुसार वागले पाहिजे असा अलिखित नियम असतो. या भूमिका लिंगभेदावर - व्यक्तीचे लिंग काय आहे - यावर आधारित आहेत असा सर्वसाधारण समज असतो. परंतु हा समज चुकीचा आहे हे आपण यापूर्वीच्या सत्रात सविस्तर पाहिले आहे.




स्त्रिया आणि पुरूष त्यांच्या आयुष्यभरात जी कामे करतात त्यांची विभागणी तीन गटांत केली जाते.

क. **उत्पादक काम:** जे काम केल्याने काम करणाऱ्या व्यक्तीला पैसे मिळतात (किंवा तितके मूल्य असणाऱ्या वस्तू मिळतात) त्याला “उत्पादक काम” म्हटले जाते. उत्पादक कामातून वस्तुंचे उत्पादन (उदा. शेतातले पीक) होते किंवा सेवा दिल्या जातात (उदा. पोस्टाची सेवा). समाजात साधारणपणे उत्पादक कामाला जास्त महत्त्व मिळते. स्त्रिया आणि पुरूष दोघेही उत्पादक काम करत असले तरी अनेकदा स्त्रियांचे काम एकतर मोजले जात नाही किंवा स्त्रियांनी केलेल्या कामाचे मूल्य कमी दिले जाते. काम “उत्पादक” आहे की नाही असे सरसकट ठरवता येत नाही. त्या कामाचा परिणाम ते विशिष्ट काम ”उत्पादक” आहे की नाही हे ठरवतो. उदाहरणार्थ स्त्री रोज घर झाडते, पण त्याचे काही तिला पैसे मिळत नाहीत. म्हणजे तिचे झाडण्याचे काम “उत्पादक” नाही. मात्र ग्रामपंचायत कार्यालयात झाडू मारणारा पुरूष अथवा स्त्री यांना त्या कामाचे पैसे मिळतात. येथे झाडण्याचे काम “उत्पादक” बनते. स्त्रिया आणि पुरूष दोघेही “उत्पादक” काम करतात हे आपण अनेकदा पाहतो.

ख. **पुनरूत्पादक काम:** “पुनरूत्पादक” काम म्हणजे केवळ पुनरूत्पादनाचे, प्रजननाचे काम नाही. जे काम वारंवार करावे लागते आणि ज्याचे पैशात मूल्य होत नाही अशी सगळी कामे “पुनरूत्पादक” म्हणून गणली जातात. स्वत:च्या घरातली सर्व कामे ही “पुनरुत्पादक” कामे आहेत. ही कामे

स्त्रियाच करतात, पुरूष क्वचित कधीतरी घरातले काम करताना दिसतात. पुनरूत्पादक कामाचे मूल्य पैशात केले जात तर नाहीच, पण ते काम अकुशल आणि दुय्यम दर्जाचे समजले जाते. पुनरूत्पादक कामाचा आणि व्यक्तीच्या लिंगाचा काहीही संबंध नाही हे आपल्या लक्षात आले असेलच. झाडून काढणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे, लहान मुलीला-मुलाला आंघोळ घालणे, मुलांना जेवण भरवणे, वृद्धांची सेवा करणे - ही कामे स्त्रियांप्रमाणे पुरूषही करू शकतात. किंबहुना अशा कामांचे पैसे मिळाले तर पुरूषही ही कामे करतात हे दिसून येते. घरातील कामाची जबाबदारी मात्र परंपरेने स्त्रियांचीच समजली जाते.

ग. **सामाजिक व्यवस्थापनाचे काम:** "सामाजिक व्यवस्थापनाचे काम" म्हणजे समाजातील परस्परसंबंध चांगले टिकून राहावेत, सामाजिक संसाधनांची सुरक्षितता राहावी यासाठी केलेली कामे. स्त्रिया आणि पुरूष दोघेही अशी कामे करताना दिसतात. गावच्या जत्रेत किंवा शेजाऱ्याच्या लग्नात किंवा मयतीच्या प्रसंगी स्त्रिया आणि पुरूष इतर कुटुंबाच्या मदतीस धावून जातात असे दिसते. हे काम करण्यातून पैसे मिळत नाहीत पण समाजातील इतर लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित होतात. आपल्याला गरज पडेल तेव्हा इतर कुटुंबेही मदतीला येण्याची शक्यता वाढते. त्या अर्थी हे पुनरुत्पादक कामाचेच विस्तारित रूप आहे. अनेकदा पुरूष दिवसभर घराबाहेर असतात तेव्हा इतरांना मदत करण्याची जबाबदारी स्त्रियांना उचलावी लागते. सामाजिक व्यवस्थापनाचे काम पुरूष आणि स्त्रिया दोन्हीही करत असले तरी सर्वसाधारणपणे स्त्रियांवर याची अधिक जबाबदारी असते.

वरील तीनही कामांचा विचार केल्यावर असे दिसते की पुरूष दोन प्रकारची कामे करतात - उत्पादक आणि सामाजिक व्यवस्थापन. तर स्त्रिया तीनही प्रकारची कामे करतात. यालाच महिलांवर असलेला **"तिहेरी कामाचा बोजा"** असे म्हणतात.

३. **लिंगभावाधारित गरजा (Gender Needs)**: स्त्रिया आणि पुरूष यांच्या भूमिका वेगवेगळया असल्याचा परिणाम त्यांच्या गरजांवरही होतो, अनेकदा त्यांच्या गरजा वेगवेगळया असतात. या गरजा दोन प्रकारच्या आहेत.

क. **व्यावहारिक गरजा (Practical Gender Needs):** ज्या गरजा भागवल्याने अपेक्षित असणाऱ्या भूमिका निभावून नेण्यास स्त्री-पुरूषांना नदत होते, त्याला "व्यावहारिक लिंगभाव गरज" असे म्हणतात. मुलींच्या आणि स्त्रियांच्या व्यावहारिक लिंगभाव गरजा त्यांच्याकडे आलेल्या पारंपरिक भूमिकेशी निगडित असतात. निवारा, पाणी, पैसे मिळवून देणारे काम यांच्याशी या गरजा जोडलेल्या असतात. उदारहणार्थ - स्वयंपाक करणे हे स्त्रीचे काम समजले जात असल्याने निर्धुर चूल ही स्त्रीची गरज असते, पुरूषाची गरज नसते. ग्रामपंचायत कार्यालयात महिला संध्याकाळी किंवा रात्री जात नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात विजेचा दिवा हवा ही स्त्रियांची व्यावहारिक गरज नसते, पण ती पुरूषांची असू शकते. स्त्रियांसाठी विशेष प्रशिक्षण,

सुधारित विळा, बाजारभावाची माहिती. या प्रकारच्या गरजा स्त्रियांच्या शेतीविषयक व्यावहारिक लिंगभाव गरजा आहेत. महिला-पुरूषांच्या व्यावहारिक गरजा समान नसतात आणि म्हणून कार्यक्रमाची आखणी करताना महिला आणि पुरूष या दोन्ही गटांशी आपण नेहमी विचारनिनिमय केला पाहिजे. व्यावहारिक गरजा ओळखणे तुलनेने सोपे असते आणि या गरजा बाहेरच्या मदतीतून पूर्णही करता येतात. या गरजांच्या पूर्तीतून रोजचे जगणे थोडेसे सुसह्य नक्कीच होते, पण या गरजांच्या पूर्ततेतून महिलांच्या घरातल्या आणि समाजातल्या स्थानात सुधारणा होत नाही. व्यावहारिक गरजांची पूर्तता हे आवश्यक पाऊल असले तरी ते पुरेसे नाही.

ख. **नीतिगत गरजा (Strategic Gender Needs/Interests):** पुरूषांच्या तुलनेत समाजात स्त्रियांचे स्थान दुय्यम असण्याच्या स्थितीतून ज्या गरजा उद्भवतात त्यांना “नीतिगत गरजा” म्हणतात. काही लोक याला “स्ट्रॅटेजिक इंटरेस्ट” म्हणतात. सत्तासंबंध बदलणे, लिंगभावावर आधारित श्रमविभाजन बदलणे, कायद्यानुसार साधनसंपत्तीवर समान अधिकार असणे, समान कामास समान वेतन, कुटुंबांतर्गत हिंसेला प्रतिबंध..... असे अनेक मुद्दे आहेत की ज्या नीतिगत गरजा आहेत. कृषि क्षेत्रातल्या नीतिगत लिंगभाव गरजांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत - शेतकरी उत्पादक कंपनीच्या निर्णयप्रक्रियेच सहभाग, शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळात स्त्रियांचा सहभाग, जमिनीवर मालकीहक्का, बँकेतून कर्ज मिळण्याची सोय, शासकीय योजनींचा लाभ, शेतीविषयक तंत्रज्ञानासंबंधीची माहिती.... इत्यादी. नीतिगत गरजा ओळखणे सोपे नसते आणि त्या पूर्ण करणेही सोपे नसते. फक्त स्त्रियांसोबत काम करून, त्यांना जागरूक करून, आणि नवे शिक्षण देऊन नीतिगत गरजा पूर्ण होणार नाहीत. स्त्रियांइतकेच किंबहुना थोडेसे जास्तच काम पुरूषांबरोबर करण्याची गरज आहे. नीतिगत गरजांच्या पूर्ततेतून जोवर स्त्रियांचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचे होत नाही तोवर स्त्री-पुरूषसोबत सातत्याने काम करणे गरजेचे आहे.

४. **लिंगभाव समानता (Gender Equality):** स्त्रियांना आणि पुरूषांना समान हक्क, समान जबाबदाऱ्या आणि समान संधी असणे म्हणजे लिंगभाव समानता - जेंडर इक्वालिटी. या समानतेचा अर्थ असा नाही की स्त्रिया पुरूषांसारख्या बनतील आणि/किंवा पुरूष स्त्रियांसारखे बनतील. लिंगभाव समानतेचा अर्थ असा आहे की हक्क, जबाबदाऱ्या आणि मिळणाऱ्या संधी या बाबी ती व्यक्ती स्त्री आहे की पुरूष आहे यावर अवलंबून असणार नाहीत. निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग असणे हे लिंगभाव समानतेसाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

५. **लिंगभाव समता (Gender Equity):** लिंगभाव समता ही महिला आणि पुरूषांना न्याय देणारी प्रक्रिया आहे. स्त्रिया आणि पुरूषांना केवळ समान संधी आणि समान साधने देणे पुरेसे नाही. पिढ्यानपिढ्या वंचित राहिल्यामुळे स्त्रियांना काही क्षमता, काही कौशल्ये शिकायला कदाचित अधिक थोडा वेळ लागेल. याचा अर्थ स्त्रियांमध्ये क्षमता कमी आहेत असा नाही. पुरूषांनी घरकाम करायचे असा उद्या नियम झाला तर पुरूषांनाही स्त्रियांसारखे झटपट आणि परिणामकारक घरकाम करायला सहज जमेलच असे नाही. स्त्रिया आणि पुरूष यांचे जीवनानुभव ते स्त्री आणि पुरूष असल्यामुळे वेगळे असतात. याच कारणास्तव त्यांच्या गरजाही वेगळया असतात. समान संधी ही खरोखर समान नसते हे

आपण आत्तापर्यंतच्या चर्चेत पाहिले आहे. स्त्रिया कोणत्याही गोष्टी करतात त्या घरकामाची जबाबदारी सांभाळून आणि समाजात-घरात दुय्यम भूमिका निभावून हे आपण विसरता कामा नये. स्त्रियांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी काही वेगळ्या सोयी करणे ही समता होय. (समाजातील सर्व वंचित घटकांसाठी हा विचार लागू आहे.) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) कायदा, ही आणखी दोन उदाहरणे समतेच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. कृषि क्षेत्राचा विचार केला तर १९९२ ची महाराष्ट्र सरकारची “लक्ष्मी मुक्ती योजना” - ज्याद्वारे महिलांचे नाव सातबाऱ्यावर जोडले जाऊ शकते, १९७६ चा समान काम समान वेतन कायदा, स्त्रियांना सरकारी योजनांमध्ये प्राधान्य, स्त्रियांच्या शेतकरी उत्पादक संस्थांची स्थापना, महिला शेतीशाळा, ॠच्र्ग्ॠ चे तीस टक्के बजेट स्त्रियांसाठी वापरणे .... अशी काही उदाहरणे सहज आठवतात. एका अर्थी असे म्हणता येईल की लिंगभाव समता ही लिंगभाव समानतेच्या दिशेने टाकण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे. ऐतिहासिक अनुशेष (बॅकलॉग) भरून निघाला की खरी समानता येईल.

**समता आणि समानता - कोल्हा आणि करकोचा यांची गोष्ट( चित्रे - इंटरनेटवरून साभार) Equality Equality and Equity - The Tale of the Fox and the Stork (Images Source: Internet)**



**चित्र १**




**चित्र २**



**चित्र ३**




**चित्र ४**

या चार चित्रांपैकी दुसरे आणि तिसरे चित्र समानता दर्शवते तर चौथे चित्र समता दर्शवते.

## ५.३ लिंगभाव विश्लेषण

लिंगभाव विश्लेषण ही एक प्रक्रिया आहे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत अथवा संदर्भात स्त्री-पुरूषांच्या भूमिका, जबाबदाऱ्या, निर्णयप्रक्रियेतला त्यांचा सहभाग, संसाधनांवर असणारे त्यांचे नियंत्रण, त्यांना मिळणारे फायदे आणि स्त्री-पुरूषांमधील सत्तासंबंध समजून घेण्याची प्रक्रिया म्हणजे लिंगभाव विश्लेषण.

## ५.४ लिंगभाव विश्लेषण का करायचे?

आपण सगळे कृषि खात्यात कार्यरत आहोत आणि आपण काही जेंडर विषयातले तज्ज्ञ नाही. मग आपण लिंगभाव विश्लेषण का करायचे असा प्रश्न तुमच्या मनात कदाचित आला असेल. कार्यक्रम आणि प्रकल्प तयार करताना, त्यांची अंमलबजाणी करताना लिंगभाव विश्लेषण केले तर कृषि खात्यामधली आपली जबाबदारी अधिक परिणाकारकपणे पार पाडण्यास आपल्याला मदत होईल.

- शेतकरी स्त्रिया आणि शेतकरी पुरूष यांना शेती करताना कोणत्या अडचणी येतात आणि त्यांना कोणत्या संधी आहेत हे समजून घेणे.
- स्त्रिया आणि पुरूष शेतकरी या दोघांनाही फायद्चे ठरतील असे कृषि कार्यक्रम आखण्यासाठी माहिती मिळते.
- कृषि कार्यक्रमांत स्त्रियांचा सहभाग वाढविण्यात काय अडचणी आहेत आणि त्यावर काय उपाययोजना करता येईल यासंबंधी माहिती मिळते.
- शेतकरी स्त्रियांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी खास प्रयत्नांचे नियोजन करता येणे शक्य होते.
- कृषि कार्यक्रमातून मिळणाऱ्या फायद्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी योजना आखता येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की लिंगभाव विश्लेषणातून जी माहिती समोर येते त्याच्या आधारे प्रकल्पांमध्ये आणि धोरणांमध्ये योग्य ते बदल करून स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योग्य पावले उचलता येतात.

## ५.५ लिंगभाव विश्लेषणाची साधने

लिंगभाव विश्लेषण कसे करायचे याबाबत जगभरात अनेक लोकांनी अभ्यास करून वेगवेगळी साधने तयार केली आहेत आणि वापरली आहेत. लिंगभाव विश्लेषण आरोग्य, पर्यावरण, अन्नसुरक्षा... अशा वेगवेगळया क्षेत्रात केले जाते.

या प्रशिक्षणात आपण कृषि क्षेत्राच्या संदर्भात लिंगभाव विश्लेषणाची निवडक साधने समजावून घेणार आहोत. प्रथम आपण साधने काय आहेत ते समजावून घेऊ. त्यानंतर छोट्या गटांमध्ये आपण या साधनांचा सराव करणार आहोत.




## ५.६ महिलांना शेती व्यवसायाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे विशेष धोरण

प्रकल्पामध्ये, स्पर्धात्मक कृषिमूल्यसाखळीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याकरिता आखलेले विशेष धोरण म्हणजे प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी.

महिलांचा कृषिमूल्यसाखळीतील सहभाग जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रकल्पाद्वारे राज्यामध्ये ‘सामाजिक मूल्यांकन’ अभ्यास करण्यात आला हे आपण सत्र १.६ मध्ये पाहिले आहे. इथे त्याचा आणखी विस्ताराने विचार करू.

सदर अभ्यासामध्ये खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. विविध पिकांच्या उत्पादनांमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. परंतु त्याची औपचारिक नोंद घेतली जात नाही.
२. कृषिमूल्यसाखळीच्या काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग नगण्य आहे.
३. विविध कृषिविषयक संसाधनांपर्यंत उदा. बी-बियाणे, खते, औषधे, शेती अवजारे, विस्तार सेवा, बँकेचे कर्ज, बाजारपेठ इ. बाबतीत महिलांची पोच अत्यल्प आहे.
४. सामाजिक मूल्यांकन अभ्यासामध्ये केवळ ९ टक्के महिलांच्या नावावर शेती असल्याचे आढळून आले. महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे बँकेचे कर्ज, शासकीय योजना, गोदाम तारण पावती इत्यादी लाभापासून त्या वंचित राहात असल्याचे निदर्शनास आले. ह्याचा परिणाम म्हणून त्यांचा कृषि मूल्यसाखळीअंतर्गत उत्पादनाच्या पुढील टप्प्यांमध्ये सहभाग नगण्य दिसून आला.
५. कृषिविषयक मूल्यसाखळीच्या विविध टप्प्यांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग नगण्य आहे. कृषि विषयक काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने पुरूषांचे वर्चस्व असून

समूहक, घाऊक विक्रेते, अधिकृत विक्रेते, किरकोळ विक्रेते, निर्यातदार इत्यादी भूमिकांमध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प आहे.

६. शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये भागधारक व संचालकपदी महिलांचा सहभाग २० टक्केपर्यंत मर्यादित आहे.

७. बाजार माहिती सेवांपर्यंत महिलांची पोच मर्यादित आहे.

८. कृषि उत्पादनांमध्ये महिलांचे प्रमुख योगदान असूनसुद्धा समान कामाकरता पुरूषांच्या तुलनेत कमी रोजगार दिला जातो.

९. प्रभाग संघ व लोकसंचिलत साधन केंद्र यांचा कृषि आधारित उत्पादन, एकत्रीकरण, काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन याबाबत महिलांचा अनुभव मर्यादित आहे.

पशुधन मुल्यसाखळीमध्ये, कृषि उत्पादन व प्राथमिक प्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांचा बहुतांश सहभाग आहे. सदर महिलांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक कृषि मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याकरिता त्यांना सक्षम बनविणे याकरता प्रकल्पाने विशेष धोरण तयार केले आहे. सदर धोरणामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**अ. प्रकल्प लाभार्थी**

१. प्रकल्पाच्या एकूण लाभार्थी समुदाय आधारित संस्थांपैकी किमान ३० टक्के या महिलांच्या संस्था असतील.

२. प्रकल्पामध्ये समाविष्ट होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये उपप्रकल्प अखेरपर्यंत किमान ३० टक्के महिला भागधारक आणि २० टक्के महिला संचालकांचा सहभाग अपेक्षित आहे.

**ब. महिला उत्पादकांची शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करणे व स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याच्या अनुषंगाने क्षमता बांधणी करणे.**

प्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या एकूण समुदाय आधारित संस्थांपैकी किमान ३०० संस्था ह्या महिलाभिमुख असणार आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी स्थापन केलेले प्रभाग संघ व लोकसंचालित साधन केंद्र यांचा समावेश असेल. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी स्थापन केलेले प्रभाग संघ व लोकसंचालित साधन केंद्र यांमध्ये शेती असणारे व बिगर शेती असणाऱ्या सदस्यांचा समावेश आहे. हे सभासद विविध शेती व बिगर शेती आधारित उपजीविका उपक्रमांमधून अर्थार्जन करत आहेत. त्याकरिता महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेमार्फत त्यांची क्षमता बांधणी करणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून



देणे तसेच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. प्रकल्पाच्या स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याकरता सदर सदस्यांतून शेती करणाऱ्या कुटुंबातील महिला सदस्यांना एकत्रित करून प्रकल्पामार्फत ४०० शेतकरी महिला उत्पादक संस्था स्थापन करण्यात येतील. सदर स्थापन झालेल्या संस्थांचे प्रभावीपणे कामकाज करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या प्रशिक्षण गरजा ओळखून त्याआधारे त्यांची विविध विषयांवर क्षमता बांधणी केली जाईल. तसेच बाजारपेठेभिमुख उत्पादन करणे, काढणीपश्चात व्यवस्थापन, विपणन, माहिती सेवा याबाबतही ह्या संस्थांची क्षमता बांधणी केली जाईल.



**क. महिला उत्पादकांची/शेतकऱ्यांची क्षमता बांधणी**

उपप्रकल्पांमध्ये समाविष्ट होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थेमधील महिला भागधारक यांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेतील अनुभव मर्यादित आहे. तसेच त्यांचा निर्णय प्रक्रियेतही सहभाग नगण्य आहे. त्यामुळे कृषि आधारित मुल्यसाखळीच्या विविध घटकांच्या अनुषंगाने क्षमता बांधणी उदा. बाजारपेठभिमुख उत्पादन, काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन, बाजार माहिती सेवा, नेतृत्वगुण इत्यादी करण्यावर प्रकल्पातून विशेष भर दिला जाणार आहे. सदर क्षमता बांधणी घटकांमध्ये विविध अभ्यास दौरे, शेती शाळा, कृषिविषयक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण इत्यादींचा समावेश असेल.

**ढ. कृषि विभाग अधिकारी/ कर्मचारी वृंदाची क्षमता बांधणी**

कृषि विभाग हा या प्रकल्पाकरीता शिखर संस्था असून कृषि विभाग हा प्रामुख्याने “कृषि विस्तार सेवा” च्या माध्यमातून शेती उत्पादन वाढवण्याकरिता कार्यरत आहे.




सदर विभागामध्ये गावपातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत अधिकारी व कर्मचारी वृंदाचे जाळे कार्यरत आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत बाजारपेठेभिमुख उत्पादन वाढविणे व शेतकऱ्यांना बाजारपेठशी जोडणे या अनुषंगाने सर्व अधिकारी/ कर्मचारी वृंदाची क्षमता बांधणी करण्यात येणार आहे. सदर क्षमता बांधणीमध्ये महिलाभिमुख खालील बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे.

महिलांचा कृषि उत्पादनातील सहभाग लक्षात घेवून त्या आधारे शेती शाळा व प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

- महिला उत्पादकांना कृषि व्यवसाय करण्याकरीता प्रोत्साहित करणे.

- महिला संस्थांची कृषि विपणन अन्वेषण सेवापर्यंत पोच वाढविणे.
- महिला उत्पादक, पशुसखी व कृषिसखी यांची बाजारपेठेभिमुख उत्पादन, कृषि तंत्रज्ञान, काढणीपश्चात व्यवस्थापन, विपणन, बाजार माहिती सेवा यावर क्षमता बांधणी करणे.

**इ. महिलांचा शेतजमिनीमध्ये अधिकार वाढवण्याकरिता पथदर्शी उपक्रम**

महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे कृषिविषयक विविध संसाधने उदा. वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, विस्तार सेवा, विविध शासकीय योजना, तारण कर्जपावती इत्यादी लाभांपासून महिला वंचित राहतात. कृषिविषयक उत्पादनामध्ये उल्लेखनीय योगदान देवूनही त्यांना शेतकरी असण्याचे फायदे मिळत नाहीत. कृषि मूल्यसाखळीच्या काढणीपश्चात उपक्रमामध्ये त्यांना गुणवत्तापूर्वक सहभाग घेता येत नाही आणि पर्यायाने याचा एकूणच कृषि घटकांवर परिणाम दिसून येतो. त्यामुळे प्रकल्पाअंतर्गत महिलांचा शेतजमिनीमध्ये अधिकार वाढविण्याकरीता प्रायोगिक तत्वावर उपक्रम राबविण्यात येणार आहे.

**इ. स्मार्ट कॉटन**

स्मार्ट कॉटन उपप्रकल्पात महिला व पुरुष कापूस उत्पादक षसहभागी होणार असून त्यांचे समूह तयार करुन त्यामार्फत एकसमान धाग्याचा, काडीकचरा विरहित कापूस निर्मिती करुन कापसाच्या धाग्याच्या गुणवत्तेवर आधारित कापूस गाठींचे ईमार्केट प्लाटफॉर्मद्वारे विक्री करण्यात येणार आहे सदर उपप्रकल्पामध्ये समाविष्ट होण्याकरीता महिलांच्या नावावर शेती नसली तरी उत्पादक महिलशेतकरी कुटुंबातील महिलांचा समावेश करण्यात येणार आहे, जेणेकरुन नावावर शेती नसल्यामुळे महिला या प्रकल्पापासून वंचित राहणार नाहीत. या उपप्रकल्पामध्ये लीड फार्मर, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यास दौरा, निविष्ठा वाटप, तंत्रज्ञान या सर्वे उपक्रमात किमान ३० % महिला लाभार्थी असतील. या उपक्रमामुळे शेतकरी (महिला व पुरूष) यांना होणारे फायदे समोरील तक्त्यात दिले आहेत.

**उ. देखरेख, मूल्यमापन आणि अहवाल सादरीकरण (Monitoring, Evaluation and Reporting)**

प्रकल्पातील सर्व उपक्रमांची माहिती स्त्रिया आणि पुरूष लाभार्थी या पद्धतीने नोंदवली जाईल. म्हणजे उदाहरणार्थ शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्यासाठी गावात पहिली बैठक झाली, तर त्यात किती स्त्रिया आणि किती पुरूष हजर होते याची नोंद ठेवली जाईल. सभा, प्रशिक्षणे, अभ्यास सहली .... अशा प्रत्येक कार्यक्रमाची स्त्री-पुरूष वर्गीकरण असलेली माहिती ठेवली जाईल. ठराविक कालावधीत किंवा ठराविक उपक्रमात किती स्त्रियांपर्यंत पोचायचे आहे याचे उद्दिष्ट ठरवले जाईल. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी योग्य प्रयत्न होत आहेत ना, सहभागी स्त्रियांची संख्या आणि त्यांच्या सहभागाची गुणवत्ता अपेक्षित पद्धतीने वाढत आहे ना याची देखरेख (सनियंत्रण) केले जाईल. अहवाल सादर करताना त्यामध्ये वरील दोन्ही मुद्द्ये अंतर्भूत असतील.

**ऊ. इतर**

उपप्रकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांची कृषि मूल्यसाखळीमधील भूमिका व अडचणी समजून घेण्याकरिता त्यांच्याबरोबर चर्चा करुन व त्यांच्या वेगळया गरजा लक्षात घेवून त्याप्रमाणे उपप्रकल्प तयार केले जातील.

# स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत पर्यावरण रक्षण

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १ | पर्यावरण रक्षण |
| २ | चांगल्या कृषी पध्दती |
| ३ | सेंद्रीय शेती पध्दती |
| ४ | चांगल्या पशुवर्धन पध्दती |

# प्रकरण क्रमांक ६ पर्यावरण संरक्षण

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना पर्यावरण रक्षणाची संकल्पना कळेल व चांगल्या औद्योगिक पद्धतींची माहिती होईल.**

## ६.१ प्रकल्पा अंतर्गत पर्यावरण रक्षण - संकल्पना आणि गरज

स्मार्ट प्रकल्पांतर्गत कृषी उत्पादकता पश्चात प्रक्रियेकरिता लागणाऱ्या वाढीचे उपाय, वाणांची निवड, शेतातील कचरा आणि सांडपाणी निर्मिती आणि व्यवस्थापन पद्धती, कापणीनंतरच्या पायाभूत सुविधांचे बांधकाम, कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता, कृषी यांत्रिकीकरण आणि कृषी उत्पादन प्रक्रिया यंत्रांना प्रोत्साहन देणे, पशुधन संगोपन आणि त्या आधारित व्यवसाय अशा विविध उपप्रकल्पांची अंमलबजावणी करावयाची आहे. या उपप्रकल्पांची अंमलबजावणी करताना प्रस्तावित विविध उपक्रमांमुळे सामाजिक आणि पर्यावरणावर दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे.

पर्यावरण संरक्षणाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने जागतिक बँकेने सुरक्षितता नियम तयार केलेले आहेत. या नियमांना धरून प्रकल्पाची रचना, नियोजन आणि अंमलबजावणी करायची आहे. स्मार्ट प्रकल्पामध्ये पर्यावरण संरक्षणाशी संबंधित जागतिक बँकेच्या सुरक्षितता नियमांच्या अंतर्गत २ परिचालन धोरणं (Operational Policy -OP) लागू आहेत. ही धोरणे खालील प्रमाणे आहेत.

| परिचालन धोरण | शेरा (लागू आहे / लागू नाही) |
|---|---|
| पर्यावरण मुल्यमापन (बीपी / ओपी ४.०१) | लागू आहे |
| किड व्यवस्थापन (ओपी ४.०९) | लागू आहे |

प्रकल्पा अंतर्गत उपप्रकल्पांची अंमलबजावणी करतेवेळी पर्यावरणावरील प्रतिकूल परिणाम /हानी कमी करणे आणि प्रकल्पाचे संभाव्य फायदे वाढविण्याच्या दृष्टीने या धोरणांना अनुसरून काम करणे फायदेशीर होणार आहे.

## ६.२ एकात्मिक पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन अभ्यास (Environment & Social Management framework-ESMF

जागतिक बँकेच्या उपरोक्त मार्गदर्शक तत्वं आणि धोरणांनुसार प्रकल्पाचा महत्वपूर्ण भाग म्हणून महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाकडून एकात्मिक पर्यावरण व सामाजिक मुल्यांकन अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान उद्धवणाऱ्या प्रमुख पर्यावरण विषयक आणि सामाजिक समस्या समजनू घेण्यात आल्या. प्रकल्पाचे संभाव्य पर्यावरण विषयक धोके आणि प्रकल्पाच्या परिणामांचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

प्रकल्पाच्या विविध टप्प्यांवर पर्यावरण विषयक आणि सामाजिक समस्यांसाठीच्या उपाययोजना सुनिश्चित करण्यात आल्या, पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा अहवालामध्ये या संपूर्ण कामाचे निष्कर्ष आणि सादरीकरण करण्यात आले आहे.

स्मार्ट प्रकल्पाची कार्यवाही या पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखड्याच्या आधारे करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या सुरूवातीच्या टप्प्यातच प्रकल्पाशी संबंधित पर्यावरण विषयक आणि सामाजिक समस्यांची छाननी, मुल्यांकन आणि योग्य उपाययोजनांच्या माध्यमातून, संबंधित परिणाम /हानी यांचे व्यवस्थापन करणे शक्य  होणार आहे.

एकात्मिक पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन अभ्यासाची कार्यपद्धती पुढील भागामध्ये मांडण्यात आली आहे.

### ६.२.१ एकात्मिक पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन अभ्यासाची कार्यपद्धती

**१) माहिती संकलनाचे नियोजन**

- स्मार्ट प्रकल्पाच्या विविध टप्प्यातील मुख्य उपक्रमांची माहिती आणि या उपक्रमांच्या अंमलबजावणीशी संबंधित पर्यावरण आणि सामाजिक समस्या माहिती करून घेण्यात आली.
- विविध स्तरावरील माहितीचे संकलन करण्याच्या दृष्टीने विविध मुल्यांकन साधनांची निर्मिती करण्यात आली.
- शासनाचे विविध विभाग, शेतकरी समूह, महिला शेतकरी समूह आणि शेतकरी उत्पादक संघ यांच्या बरोबरील चर्चांमधून सर्व माहिती संकलित करण्यात आली.

**२) धोरणे आणि नियमांचे पुनरावलोकन**

- पर्यावरण संरक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावर लागू असणारे विद्यमान कायदे आणि नियम, कृषीविषयक विविध धोरणे आणि कार्यक्रम, आर्थिक आणि कृषी सर्वेक्षण अहवाल यांचे पुनरावलोकन करण्यात आले.
- जागतिक बँकेच्या पर्यावरणीय संरक्षणासाठी लागू होणाऱ्या परिचालन धोरणांचे विश्लेषण करण्यात आले.
- प्रकल्पाच्या विविध टप्प्यात मुख्य उपक्रमांना लागू असणारे राष्ट्रीय स्तरावरील कायदे, नियम व तरतूदी आणि जागतिक बँकेच्या परिचालन धोरणांची सुसंगती निश्चित करण्यात आली.

### ३) प्रकल्पपूर्व (baseline) सर्व्हेक्षण

- सामाजिक मूल्यांकनासाठी जनगणना २०११ आणि जिल्हा आर्थिक आणि सामाजिक नियोजन अहवालांचा उपयोग करण्यात आला.
- पर्यावरण मूल्यांकन विषयी माहिती संकलित करण्यात आली - भूभाग रचना, माती, हवामान आणि पर्जन्य, जैव विविधता आणि जंगल, सिंचन व्यवस्था, पाणी गुणवत्ता, पाणथळ जमीन, कीड आणि पिकांचे रोग, ऊर्जेचा उपयोग, अन्न सुरक्षा मानके, अधिकतम कीटकनाशक अवशेष पातळी (MRL) चाचणी अहवाल, रासायनिक आणि जैविक कीटकनाशके आणि खतांचा वापर, चांगल्या कृषी पद्धती (G.A.P.) मानके, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (INM) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) पद्धतींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

### ४) परिणामांचे विश्लेषण आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखडा

- प्रस्तावित उपप्रकल्पांमुळे होणारे परिणाम/प्रभावांचे वर्गीकरण करण्यात आले - सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तसेच सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम
- पुढील टप्प्यात प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम वाढवणे आणि नकारात्मक परिणाम टाळण्यासाठी विविध उपायोयजनांचे नियोजन करण्यात आले.

### ६.२.२ अभ्यासांतर्गत लक्षात आलेले पर्यावरणावर होणारे महत्वपूर्ण परिणाम

- ५५ ते ६०% शेतकऱ्यांकडे मृदा आरोग्य कार्ड (Soil Health Card) नव्हते. यामुळे खताचा अयोग्य वापर होण्याची शक्यता वाढते.
- २०१६-१७ ते २०१८-१९ दरम्यान कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या द्वारे केल्या गेलेल्या MRL चाचणी दरम्यान एकूण १६ कृषी पीकमालांमध्ये अवशिष्ट कीटकनाशक आणि रसायनांचे प्रमाण भारतीय अन्न सुरक्षा आणि मानकं विभागातर्फे जारी करण्यात आलेल्या प्रमाण अवशिष्ट मात्रेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहेत.
- कचरा संकलन आणि कचऱ्याचे शास्त्रीयदृष्ट्या योग्य व्यवस्थापन प्रक्रियेसाठी कोणतीही योग्य सुविधा अस्तित्वात नाही.
- वापरण्यात आलेल्या किटकनाशके आणि रसायनांच्या बरण्या / डब्बा / पिशव्या यांच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे मातीचे प्रदूषण आणि मानवी आरोग्यावर दुष्परिणाम.
- कीटकनाशके, रसायने आणि खतांच्या अयोग्य हाताळणीमुळे शेतकऱ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम आणि चुकीच्या वापरामुळे माती आणि पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम.
- वनक्षेत्रात शेळी -मेंढ्या यांच्या चराईमुळे जंगलामधील जमिनींवर परिणाम होतो.

- हवामान बदलाच्या जोखमींमुळे शेतीवर होणारा विपरीत परिणाम व त्यामुळे एकंदर उत्पादनात घट.

### ६.२.३ प्रकल्पांतर्गत लक्ष्य

अभ्यासा दरम्यान पर्यावरण आणि कृषी परिसंस्थेवर नकारात्मक परिणाम करत असणाऱ्या बाबींसाठी प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेली कामे खालील प्रमाणे आहेत.

- कीड व्यवस्थापन योजना - स्मार्ट प्रकल्पातील १००% उत्पादकांना एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देणे.
- प्रकल्पाच्या अखेरीस एकूण लाभक्षेत्रापैकी ५०% लाभक्षेत्रावर एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) उपाययोजना कृतीत आणणे.
- एमआरएल अनुपालनामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने १३,५०० उत्पादकांसाठी जीएपी (९५००) आणि ऑरगॅनिक (४०००) प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सहाय्य करणे.
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या १५० आधिकाऱ्यांना कचरा व्यवस्थापन आणि वनस्पती आरोग्य माहिती विषयक प्रशिक्षण करणे.
- प्रकल्प सुरू झाल्यानंतर सुरूवातीच्या १ ते २ वर्षांच्या टप्प्यात, समुदाय आधारित संस्था आणि शेतकरी यांचे क्षेत्रीय शाळांच्या माध्यमातून एकात्मिक कीड व्यवस्थापन विषयक क्षमता बांधणी करणे.

## ६.३ उपप्रकल्प निहाय्य नकारात्मक उपक्रमांची यादी (Negative list of Activities)

प्रकल्पा अंतर्गत पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रत्येक उपप्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पना टिपणी (Project Concept Note) आणि पूर्ण प्रकल्प प्रस्ताव (Full Project Proposal) तयार करावयाचे आहेत. या दोनही टप्प्यांवर नकारात्मक उपक्रमांची यादी आणि पर्यावरण संरक्षण उपाययोजनांची छाननी करण्यात येणार आहे.

त्यासाठी प्रत्येक उपप्रकल्पासाठी पर्यावरण कृती आराखडा विषयक तपासणी सूची विकसित केलेली आहे. सदर सूचीच्या आधारे प्रकल्पपूर्व परिस्थिती आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याच्या आधारे प्रकल्पपश्चात सुधारणा करण्याच्या बाबींची यादी निश्चित करावयाची आहे. त्यानुसार प्रकल्पांचे मूल्यावलोकन केले जाईल. पूर्ण प्रकल्प प्रस्तावां सोबत (Full Project Proposal) सादर करावयाचा पर्यावरण कृती आराखडा खाली देण्यात आला आहे.

### ६.३.१ उपप्रकल्प निहाय्य सादर करावयाचा पर्यावरण कृती आराखडा

## १ .पर्यावरण व्यवस्थापन आराखडा अहवालामाधील[1] कामांच्या नकारात्मक यादीच्या अनुपालनाशी संबंधित संकलित करावयाची माहितीः

| अ . क्र. | उपप्रकल्पाची तपशील | होय/ नाही | होय असल्यास, माहिती नमूद |
|---|---|---|---|
| **अ. कृषि मूल्य साखळी विकासासाठी उप-प्रकल्प** | | | |
| १. | उपप्रकल्पाचे ठिकाण हे पर्यावरणीय संवेदनशील जसे संरक्षितराखीव / जंगले[2], दलदलीची जमीन, जैव विविधता संरक्षित विशेष भाग, संस्कृतिक वारसा ठिकाण अशा भागात किंवा जवळपास आहे का? | | |
| २. | अकृषक जमिनीचे कृषक जमिनीत रूपांतर केल्याने पर्यावरणीयदृष्ट्या अधोगतीचे कारण होईल का? | | |
| ३. | जंगल तोडीचा धोका संभावतो का? | | |
| ४. | स्थानिक वनस्पती व प्राण्यांच्या जैव विविधतेला धोका पोहोचतो का? | | |
| ५. | मोठ्या नैसर्गिक आपत्ति किंवा भुस्खलन,पुर,वादळ,भूकंप इ सारख्या धोकादायक/असुरक्षित ठिकाणी आहे का? | | |
| ६. | भारत सरकारने बंदी घातलेल्या[2],जागतिक आरोग्य संघटनेने वर्ग Ia,Ib, आणि वर्ग किडनाशकांचा मध्ये नमूद केलेल्या II[3] वापर होतो का? | | |
| ७. | अप्रमाणित बियाणे किंवा बंदी घातलेले वाण यांचा वापर होतो का? | | |
| ८. | शेत जमिनीवर पिकांचे अवशेष जाळले जातात काय? | | |
| ९. | कृषि उत्पादनप्रक्रिया मधील कचरा आणि सांडपाणी याची प्रक्रिया न करता विल्हेवाट केली जाते का? | | |
| १० | कृषि उत्पादने / वस्तु त्यांच्या अधिकतम कीटकनाशक अवशेष पातळी (मिलीग्राम / किलो) चाचणीसाठी पाठवले जातात का? | | |
| ११. | प्रदूषण निर्माण करणारे आणि पीयूसी प्रमाणपत्र नसलेली वाहने जसे ट्रक, व्हॅन, टेम्पो, रेफर व्हॅन यांचा वापर होतो का? | | |
| १२. | वाहतुकीच्या नियोजनासाठी पक्क्या रस्त्यालागत आहे का? | | |
| **ब. शेळी व परस बागेतील कुक्कुट पालनासाठी उपप्रकल्प** | | | |

[1] स्मार्ट प्रकल्पाच्या पर्यावरण आणी सामाजिक व्यवस्थापन आराखडयाचे संकेतस्थळ: https://www.smart-mh.org/cdm//2019/08/190818171526 405e4be8b9d3ce2374fe29ce1561a62b.pdf

[2] भारत सरकारने बंदी घातलेल्या प्रतिबंधित कीटकनाशकांची यादी: http://ppqs.gov.in/sites/default/files/list_of_pesticides_which_are_banned_refused_registration_and_restricted_in_use_01.07.2021.pdf

[3] जागतिक आरोग्य संघटनेने बंदी घातलेल्या प्रतिबंधित कीटकनाशकांची यादी: https://www.iloencyclopaedia.org/part-ix-21851/minerals-and-agricultural-chemicals/item/318-the-who-guidelines-to-classification-of-pesticides-by-hazard-part-1

| अ . क्र. | उपप्रकल्पाची तपशील | होय/ नाही | होय असल्यास, माहिती नमूद |
|---|---|---|---|
| १. | वनक्षेत्रामध्ये शेळी, मेंढी, कुक्कुट पालन यांचे संगोपन / चरणे केले जाते का? | | |
| २. | उपप्रकल्पामध्ये विदेशी जातींच्या प्राण्यांचा समावेश केला जाणार आहे का? | | |
| ३. | प्राण्यांपासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट केली जाते का? | | |
| ४. | पशुधन संगोपनात प्रतिबंधित पशु वैद्यकीय औषधांचा वापर केला जातो का[4]? | | |
| ५. | कत्तलखाना पशुधन पासून निघणाऱ्या कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी सुविधेशिवाय चालवला जातो का[5]? | | |
| ६. | पशुधनातून मानवांमध्ये रोग पसरण्यामुळे समुदायाच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे का? | | |

## २. उपप्रकल्पासाठी पर्यावरणीय आधारभूत माहिती आणि लक्ष्य

| अ.क्र. | उपप्रकल्पात राबविललेल्या कृषि पध्दती | तपशील | उपप्रकल्पापूर्वी (आधारभूत) | उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित लक्ष्य |
|---|---|---|---|---|
| | **अ .कृषी मूल्य साखळी विकासासाठी उपप्रकल्प-** | | | |
| १. | रासायनिक खताचा सरासरी वापर -NPK | कि/हे. | | |
| २. | रासायनिक खताची शिफारसीत मात्रा वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ३. | शिफारसीपेक्षा कमी रासायनिक खत वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ४. | शिफारसीपेक्षा जास्त रासायनिक खत वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ५. | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आयएनएम) पध्दतीत वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ६. | कृषिरसायनांचा सरासरी वापर - किडनाशक, बुरशींनाशक व तृणनाशक | लि/हे. | | |
| ७. | किडनाशकाची शिफारसीत मात्रा वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ८. | शिफारसीपेक्षा कमी किडनाशक वापरलेले क्षेत्र | हे. | | |
| ९. | शिफारसीपेक्षा जास्त किडनाशक वापरलेले क्षेत्र | हे. | | |

[4] प्रतिबंधित पशुवैध्यकीय औषधांची यादी: https://www.nhp.gov.in/Complete-list-of-344-drugs-banned-by-the-Ministry-of-Health-Family-welfare_pg

[5] कत्तलखाना कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन मार्गदर्शकाची यादी: https://cpcb.nic.in/openpdffile.php?id=TGF0ZXN0RmlsZS8xNzVfMTUxMTI2NDE0MV9tZWRpYXBob3RvODkzOS5wZGY=

| अ.क्र. | उपप्रकल्पात राबविललेल्या कृषि पध्दती | तपशील | उपप्रकल्पापूर्वी (आधारभूत) | उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित लक्ष्य |
|---|---|---|---|---|
| ब. | शेळी व परस बागेतील कुक्कुट पालनासाठी उपप्रकल्प | | | |
| १५. | पशु आहार पद्धतींचा प्रकार -मोकाट चरण / अर्धबंदीस्थ चरण | | | |
| १६ | जनावरांचे शेण खत म्हणून वापरले जाणारे क्षेत्र | | | |
| १७ | प्राण्याचे लसीकरण झाले आहे/ प्राण्याचे लसीकरण झालेले नाही (होय/नाही) | | | |
| क. | वैध प्रदूषण नियंत्रण (पीयूसी) प्रमाणपत्र (आहे/नाही) | | | |

**३. उपप्रकल्पासाठी पर्यावरणीय संरक्षणाचे लक्ष्य**

| अ.क्र. | लक्ष्याचे तपशील | उपप्रकल्पापूर्वी (आधारभूत) | उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित लक्ष्य |
|---|---|---|---|
| १. | समुदाय आधारित संस्थेच्या शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनेचे प्रशिक्षण दिले गेलेले आहे का त्यांची संख्या व ?टक्केवारी नमूद करा[6] | | |
| २. | समुदाय आधारित संस्थेच्या शेतकऱ्यांसाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनेचे एकूण किती मैदान पातळीवर प्रात्यक्षिके राबविण्यात आले आहेत ? त्यांची संख्या व टक्केवारी नमूद करा[7] | | |
| ३. | उपप्रकल्पामधील समुदाय आधारित संस्थेचे एकात्मिक कीड व्यवस्थापन अंतर्गत असलेले क्षेत्र % (टक्केवारी) मध्ये नमूद करा[8] | | |
| ४. | उपप्रकल्पामधील समुदाय आधारित संस्थेचे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन अंतर्गत असलेले क्षेत्र % (टक्केवारी) मध्ये नमूद करा[9] | | |
| ५. | उपप्रकल्पामधील समुदाय आधारित संस्थेच्या शेतकऱ्यांना हवामान अनुकुलानुसार राबविण्यात येणाऱ्या पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे का? त्यांची संख्या व टक्केवारी नमूद करा[9] | | |

[6] उपप्रकल्पाव्दारे सर्व (१०० %) समुदाय आधारीत संस्थेस एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आयएनएम) पध्दती आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) वापराचे प्रशिक्षण प्रकल्पातील व्हॅल्यू चेन डेव्हलपमेंट स्कूल (व्हीसीडीएस) मध्ये दिले जाईल.

[7] उपप्रकल्पामध्ये आयएनएमचे आणि आयपीएमचे १०० % मैदान पातळीवर प्रात्यक्षिके राबविण्यात येईल.

[8] उप प्रकल्पाच्या शेवटपर्यन्त उप प्रकल्प क्षेत्रातील ५०% क्षेत्र आयपीएम आणि आयएनएम अंतर्गत आणले जाईल.

[9] हवामान अनुकुल पद्धती मध्ये अक्षय उर्जेच्या वापर, सेंद्रिय आणि जागतिक उत्तम कृषि पध्दतीत (जी.ए.पी.) द्वारे केली जाणारी शेती, चांगल्या पशुपालन पद्धती, गांडूळ खताचे वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, अन्न गोदामात उर्जा कार्यक्षमता वाढवण्यासाठी केलेले उपाय, हवामान अनुकुल बियाण्याच्या जातींचा वापर करणे, हवामान बदल जोखीम व्यवस्थापनासाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा (ICT) इत्यादीचा समावेश आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उपप्रकल्पामधील समुदाय आधारित संस्थेच्या शेतकऱ्यांसाठी किती हवामान अनुकुलानुसार पद्धती उपयोगात आणलेली आहेत? त्यांची संख्या नमूद करा[10] | | |
| ७. | उपप्रकल्पामधील समुदाय आधारित संस्थेने किती क्षेत्रात हवामान अनुकुल पद्धती उपयोगात आणलेली आहे? त्याचे क्षेत्र नमूद करा (हे. मध्ये)[11] | | |

**४. पर्यावरणीय सुरक्षितता लक्ष्य गाठण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

१. स्मार्ट प्रकल्पाच्या पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा च्या शिफारशीनुसार कोणताही (ईएसएमएफ) उपप्रकल्प बिंदू क्र ३.९, पृष्ठ क्रमांक ४८ मध्ये दिलेल्या नकारात्मक यादीमध्ये येऊ नये. पर्यावरणीय कृती अहवालानुसार दिलेल्या तरतुदी आणि शमन उपायांच्या अनुषंगाने सर्व उपप्रकल्पाची अंमलबजावणी केली पाहिजे.

२. उत्तम कृषी पध्दती (GAP) व सेंद्रीय प्रमाणिकरणासाठी (NPOP) प्रकल्पांत ६०% एकूण नोंदणी खर्चाच्या मिळू शकते. उर्वरित ४०% खर्चाची रक्कम समुदाय आधारीत संस्थेस स्वतः उभारावी लागेल.

३. प्रकल्पाच्या संसाधनांचा वापर करुन खरेदी केली जाणारी सर्व नवीन यंत्रसामुग्री ही ऊर्जा कार्यक्षम, वाहने- भारत स्टेज- VI आणि इंधन कार्यक्षम वापर, ट्रॅक्टर-भारत स्टेज (सीईव्ही / ट्रेम) IV – V आणि वरील असावी. वाहनांचे वैध पीयूसी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## ६.४ उपप्रकल्प प्रस्तावांच्या पर्यावरण संरक्षण विषयक छाननी प्रक्रियेचे टप्पे

स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत उपप्रकल्प प्रस्तावांची प्रकल्प संकल्पना टिपणी (Project Concept Note) आणि पूर्ण प्रकल्प प्रस्ताव (Full Project Proposal) या टप्प्यांवर तांत्रिक व आर्थिक तपासणी केली जाणार आहे. त्याबरोबरच पर्यावरण संरक्षण विषयक उपाययोजनांची ही छाननी केली जाणार आहे आणि त्याआधारे प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाणार आहे. अहवालांच्या छाननी प्रक्रियेचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

[10] वर नमूद केलेल्या १० हवामान अनुकुल पद्धतीमधुन उपयुक्त असलेल्या किमान ०३ पद्धतीचे उपप्रकल्पामध्ये उपयोगात घ्यावेत.

[11] उपप्रकल्पामध्ये सीबीओच्या अंतर्गत किमान १०० हे क्षेत्र हवामान अनुकुल उपयुक्त असलेल्या पद्धती अंतर्गत आणले पाहिजे.


स्मार्ट प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षाकडे उपप्रकल्प संकल्पना टिपणी प्राप्त (विभागीय अंमलबजावणी कक्षाने आणि विभागीय तांत्रिक सहाय्य कक्षाच्या सहाय्याने सादर करणे)
स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी कक्ष आणि प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षाद्वारे स्वतंत्र मूल्यांकन पॅनेल आणि राज्य तांत्रिक सहाय्य गटाच्या सह समर्थनाने तांत्रिक आणि आर्थिक पुनरावलोकन
स्मार्ट प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षाद्वारे तांत्रिक आणि आर्थिक आधारावर नाकारलेले प्रकल्प
स्मार्ट प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षाकडून सविस्तर प्रकल्प आराखडा विकसित करणेसाठी मंजूरी
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षामधील पर्यावरण आणि सामाजिक विषय तज्ञांद्वारे
पर्यावरण आणि सामाजिक जोखीम श्रेणी नियुक्त करण्यासाठी तपासणी
सविस्तर प्रकल्प आराखडा विकसित करणे आणि क्षेत्रीय पुष्टीकरण करणे
स्मार्ट कक्ष तसेच विभागीय अंमलबजावणी कक्ष आणि प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील पर्यावरण आणि सामाजिक विषय तज्ञांद्वारे
सविस्तर प्रकल्प आराखड्याच्या पुनरावृत्तीत पर्यावरणीय व सामाजिक जोखीमा दूर करण्यासाठी मार्गदर्शन करणे
स्मार्ट प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षाकडे सविस्तर प्रकल्प आराखडे प्राप्त
सविस्तर प्रकल्प आराखड्याचे तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक पुनरावलोकन
प्रकल्पाअंतर्गत नाकारलेले प्रकल्प
सविस्तर प्रकल्प आराखड्यामध्ये सुधारणा करणेसाठी पर्यावरण आणि सामाजिक जोखीम व त्यांचे निराकरण याविषयी अतिरिक्त मार्गदर्शन करणे
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षामधील पर्यावरण आणि सामाजिक विषय तज्ञांद्वारे
प्रकल्पाअंतर्गत सविस्तर प्रकल्प आराखड्यांना मंजूरी
मंजूर सविस्तर प्रकल्प आराखड्याची अंमलबजावणी
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष आणि विभागीय अंमलबजावणी कक्ष यांचे कडून पर्यावरण आणि सामाजिक अनुपालनावर देखरेख आणि अहवाल

## ६.५ चांगल्या औद्योगीक पध्दती - बांधकाम – नूतनीकरण आणि नवीन प्रकल्प (गोदामांचे बांधकाम, प्रतवारी आणि वर्गीकरण युनिट, शीतगृह, बाजारपेठ इत्यादी)

एकात्मिक पर्यावरण व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA) आणि पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्यामध्ये (ESMF) बांधकामाशी संबंधित पर्यावरण विषयक परिणामांचा अभ्यास करून त्यावर आधारित बांधकाम व्यवस्थापन मार्गदर्शक तत्त्वे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

सुगीनंतरच्या कामांसाठी गोदामांचे बांधकाम, प्रतवारी युनिट, शीतगृह बांधकाम, बाजारपेठ इत्यादी सुविधा उभारण्याच्या दृष्टीने प्रकल्पांतर्गत नेमणूक केलेल्या सेवा पुरवठादार संस्था / सल्लागार / कंत्राटदार यांनी उपप्रकल्पांशी संबंधित डिझाईन, बांधकाम, यंत्रणाचे परिचालन, संचालन आणि देखभाल या सर्व टप्प्यांमधील प्रमुख पर्यावरण विषयक समस्या लक्षात घेऊन या समस्यांच्या निराकरणासाठी पर्यावरण विकास आराखडा तयार करायाचा आहे. पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा अहवालातील बांधकाम व्यवस्थापन मार्गदर्शक तत्वांना अनुसरून हा विकास आराखडा तयार करायचा आहे.

### १. प्रकल्पा संबंधीची महत्वाची कागदपत्रे / अहवाल :

नेमणूक केलेल्या सेवा पुरवठादार संस्था / सल्लागार / कंत्राटदार यांनी प्रकल्प मंजूरी आणि बांधकाम उपक्रमांदरम्यान लागू असणाऱ्या आवश्यक त्या कायदे आणि तरतूदींप्रमाणे सर्व परवाने, मंजूरी आणि प्रमाणपत्र उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

### २. स्थापत्य / बांधकाम विषयक कामे :

स्मार्ट प्रकल्पांतर्गत, अस्तित्वात असलेल्या गोदामांचे नूतनीकरण तसेच नवीन गोदामांचे बांधकाम करावयाचे आहेत. या सर्व कामांसाठी कंत्राटदार व सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक करावयाची आहे. प्रकल्पामध्ये करावयाची एकूण कामे खालीलप्रमाणे आहेत.

- अस्तित्वातील गोदामांचे नूतनीकरण (पथदर्शी १०)
- अस्तित्वातील गोदामांचे नूतनीकरण (पुढील १५८)
- नवीन गोदामांचे बांधकाम (नवीन ३३)

### ३. प्रकल्पातील पर्यावरण विषयक बाबी :

बांधकाम उपक्रमांदरम्यान नियोजन करताना पर्यावरण विषयक लक्षात घ्यावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

- बांधकाम उपक्रमांदरम्यान आवश्यकतेनुसार अस्तित्वातील बांधकाम पाडणे, जागेची साफसफाई, झाडांची तोडणी, नवीन बांधकाम असे विविध उपक्रम राबवायचे आहेत. या सर्व कामांदरम्यान हवा, माती, कचरा, सांडपाणी आणि ध्वनी प्रदूषण होण्याची शक्यता लक्षात घेऊन या समस्यांचे निराकरण करण्यासाठीच्या उपाययोजना पर्यावरण विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेल्या आहेत.

- गोदाम, बाजार सुविधा किंवा समुदाय आधारित संस्थांसाठी बांधकाम करताना पर्यावरण पूरक बांधकाम आणि उर्जा व्यवस्था यांचा प्रामुख्याने विचार केला जाणे गरजेचे आहे.
- कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक आणि आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळातर्फे एप्रिल २००७ मध्ये जारी करण्यात आलेल्या पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा मार्गदर्शिकेला अनुसरून उपाययोजनांचे नियोजन करणे आवश्यक आहे.
- बांधकामाच्या ठिकाणी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पाणी, स्वच्छता व आरोग्यविषय सुविधांनी युक्त कामगार वसाहती तयार करण्यात याव्यात.
- कंत्राटदाराने परवानाधारक/ अधिकृत एजंट/ डीलर कडून बांधकाम साहित्य खरेदी केले पाहिजे.
- कंत्राटदाराद्वारे हे सुनिश्चित केले जाणे अपेक्षित आहे की सोपवलेली साइट/जागा ही दोन्ही पक्षांनी स्वाक्षरी केलेल्या तात्पुरत्या अधिग्रहणाच्या अटीं व शर्तीनुसार हस्तांतरित केली आहे.
- बांधकाम पश्चात मंजूरीसाठी पर्यावरण आराखड्यामध्ये तरतूद केल्या प्रमाणे बांधकामाच्या जागा, कर्मचारी वसाहती यांची साफसफाई करण्यात येईल. तसेच अतिरिक्त साहित्य, कचरा आणि मचान अशा तात्पुरत्या जागंची साफसफाई करून बांधकाम हस्तांतरित करण्यात येईल.

**४. पर्यावरण व सामाजिक घटकांच्या बाबतीत लागू असलेले कायदे व बांधकाम विषयक अटी**

वरील कार्यपध्दती शिवाय पर्यावरण व्यवस्थापन / संवर्धन व सामाजिक समायोजनाचे दृष्टीने खालील कायदे लागू असून त्यांचे पालन होणे देखील आवश्यक आहे.

- The Water (Prevention & Control of Pollution) Act 1974. पाणी (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९७४
- The Air (Prevention & Control of Pollution) Act 1981. हवा (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१
- Environment (Protection) Act 1986. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६
- Forest (Conservation) Act 1980, वन संवर्धन अधिनियम १९८०
- Coastal Regulation Zone (CRZ) clearance under the CRZ notification 2011 and its amendments. किनारी विनीमय विभागाची २०११ अधिनियम व त्यानंतरी वैध सुधारणांना अनुसरून मजूरी
- The Public Liability Insurance Act 1991. सार्वजनिक दायित्व विमा कायदा १९९१
- Maharashtra State Women Policy 2002. महाराष्ट्र राज्य महिला धोरण २००२.
- Child Labour (Prohibition & Regulation) Act 1986. बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा १९८६

- Minimum Wages Act 1948 & Notification of the Government of Maharashtra (June 2000). किमान वेतन कायदा, १९४८ आणि महाराष्ट्र राज्य शासनाचा जून २००० मधील अधिसूचना
- Building plan approval / construction commencement certificate from Concerned Local Authority.स्थानिक प्रशासकीय यंत्रणेकडून बांधकामाचा आराखडा व बांधकाम सुरू करण्यासाठीचे प्रमाणपत्र
- Registration under Building and Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Act 1996 इमारत आणि बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवेची अट) अधिनियम १९९६ अंतर्गत नोंदणी
- बोअरवेलच्या वापराच्या बाबतीत जलसंपदा विभाग किंवा केंद्रीय भूजल प्राधिकरणाकडून पाण्याच्या वापरास मान्यता
- पेट्रोलियम आणि एक्सप्लोझिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (पीईएसओ) कडून डीजी संचालनासाठी डिझेल साठवण्याची परवानगी.
- प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून बांधकामादरम्यान D.G सेट चालवण्याकरिता ना हरकत पत्र
- बांधकामासाठी वापरण्याच्या सर्व वाहनांसाठी वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC)

अधिक माहितीसाठी प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिका (PIP) व त्याची परिशिष्टे, एकात्मिक, पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF), लोकांसाठी प्रकल्प कार्यवाही मार्गदर्शिका इत्यादी उपलब्ध मार्गदर्शक पुस्तिकांचा वापर करावा.

# प्रकरण क्रमांक ७ चांगल्या कृषी पद्धती

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना अवलंबावयांच्या चांगल्या कृषि पद्धतींची माहिती होईल.**

## ७.१ संकल्पना आणि गरज

शेतमालाला आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगल्या संधी प्राप्त होण्यासाठी, कृषी पध्दतींमध्ये दीर्घकालीन सुधारणा करणे आवश्यक आहे. यासाठी जागतिक स्तरावर व्यावसायिक कृषी उत्पादनांच्या चौकटीत स्वीकारलेल्या चांगल्या कृषी पद्धती (जीएपी - GAP) संकल्पनेचा समावेश करून नाविन्यपूर्ण शेती पद्धतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. चांगल्या कृषी पद्धती (Good Agricultural Practices) मानके ही अन्न प्रक्रिया उद्योग, उत्पादक संस्था, सरकार आणि स्वयंसेवी संस्था यांच्या एकत्रित प्रयत्नातून पारित करण्यात आली आहेत.

कृषी मालाची गुणवत्ता राखणे आणि अन्न सुरक्षा नियमांची पूर्तता करण्याच्या विशिष्ट आवश्यकता विचारात घेऊन या मानकांची निर्मिती करण्यात आलेली आहे. चांगल्या कृषी पद्धतींमध्ये सुरक्षित आणि दर्जेदार अन्न आणि बिगर अन्न कृषी उत्पादनांच्या निर्मितीसाठी लागवडी पासूनच पर्यावरण पूरक, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यात येतो.



## ७.२ चांगल्या कृषी पद्धती (Good Agricultural Practices) मानकांची तत्वे

| | ग्लोबल गुड अग्रिकल्चरल प्रॅक्टिसेस (Global G.A.P) | इंडिया गुड अग्रिकल्चरल प्रॅक्टिसेस (India G.A.P) |
|---|---|---|
| ध्येय | • ग्राहकांमध्ये अन्नाची गुणवत्ता आणि अन्न सुरक्षेविषयी विश्वास निर्माण करणे<br>• कृषी व्यवसायामुळे होणारी पर्यावरणाची हानी कमी करणे<br>• कृषी निविष्ठांचा उपयोग प्रमाणित करून कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे | • कृषी उत्पादन पद्धतींच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे<br>• गुणवत्तेच्या दृष्टीने कृषी उत्पादन, हाताळणी आणि वितरणाच्या विविध पैलूंवर लक्ष देणे<br>• पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करून अन्न सुरक्षा आणि कर्मचाऱ्यांची व्यावसायिक आणि आरोग्याची सुरक्षितता सुनिश्चित करणे |
| संस्थात्मक रचना | Global G.A.P ही खाजगी क्षेत्रातील संस्था आहे | क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया, (QCI) भारत सरकार आणि तीन प्रमुख उद्योग संघटनांचे प्रतिनिधित्व असणारी संस्था |
| पिकमालांची व्याप्ती | १. फळे आणि भाजीपाला<br>२. फुलझाडे आणि मुलद्रव्ये<br>३. एकत्रित पिके<br>४. वनस्पती प्रसार साहित्य<br>५. चहा<br>६. मासे, क्रस्टेशियन्स आणि माल्युस्क्स<br>७. पशुधन आधारित उत्पादने | १. ताजी फळे आणि भाज्या<br>२. अन्नधान्य<br>३. लागवड पिके<br>४. मसाले<br>५. सुकामेवा वर्गीय बिया (काजू, बदाम, अक्रोड इ.)<br>६. तेलबिया |
| सदस्य | किरकोळ विक्रेते, उत्पादकशेतकरी आणि / कृषी निविष्ठा सेवा सहयोगी संस्था सदस्य | उत्पादक गट, शेतकरी सहकारी संस्था, करार शेती उत्पादक गट आणि लघु प्रक्रिया युनिट्स |
| लाभार्थी | वैयक्तिक शेतकरी आणि गट या दोघांचे प्रमाणीकरण करण्यात येते | वैयक्तिक शेतकरी आणि गट या दोघांचे प्रमाणीकरण करण्यात येते |
| मानके | भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण कायदा २००६ आणि अधिनियम २०११<br><br>जागतिक आरोग्य संघटनेची मार्गदर्शक नियमावली | भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण कायदा २००६ आणि अधिनियम २०११<br><br>जागतिक आरोग्य संघटनेची मार्गदर्शक नियमावली |

## ७.३ शेतकरी उत्पादक गटांसाठी ग्लोबल G.A.P प्रमाणपत्र मिळवण्यासाठीची कार्यप्रणाली

स्मार्ट प्रकल्पामध्ये उपप्रकल्पातील ९५०० उत्पादकांना ग्लोबल जी ए पी या कार्यक्रमा अंतर्गत प्रमाणित करण्याचे निश्चित केले आहे.

शेतकरी उत्पादक गटांना जीएपी (GAP) प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी करणे हा एक अनिवार्य भाग आहे. शेतकरी उत्पादक गटांसाठी जीएपी (GAP) प्रमाणपत्र मिळवण्यासाठीची प्रणाली खालीलप्रमाणे आहे.

### उत्पादक गटाची आधिकृत स्थापना

- गटाला कायदेशीर दर्जा असणे बंधनकारक आहे
- अंतर्गत गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीशी सहमत असणे बंधनकारक आहे
- गटाच्या पुढील कामकाजासाठी पिके निश्चित करणे

### ग्लोबल G.A.P च्या आधिकृत संकेतस्थळावर नोंदणीकरण

- अंतर्गत गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली विषयक माहिती घेणे
- यासाठी आवश्यक असणारी माहिती व तपासणी सूची प्राप्त करणे

### दस्तऐवज तयार करणे आणि नियंत्रण

- प्रमाणीकरण प्रक्रियेची मार्गदर्शिका तयार करणे व त्याविषयी सर्व सदस्यांना माहिती देणे
- जोखीमांची पडताळणी आणि उपाययोजनांचे निश्चितीकरण करणे
- नियम आणि प्रक्रिया पध्दतींचे अवलंबन व त्याविषयीचे दस्तऐवज तयार करणे

### प्रअंतर्गत लेखापरीक्षण

- स्थानिक अधिकृत लेखा परिक्षकाकडून अंतर्गत लेखा परिक्षण करणे
- १००% सदस्यांची GAP प्रमाणपत्रासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करणे विषयक तपासणी केली जाते

### अनुपालन न झालेल्या बाबींची पूर्तता करणे

- लेखा परिक्षणामध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करणे आणि आवश्यक त्या सुधारणा करणे

### अंतिम लेखा परिक्षण

- दस्तऐवज तपासणी आणि क्षेत्रीय तपासणी (Global G.A.P. किंवा अधिकृत एजन्सी द्वारे)
- गटातील प्रत्येक सदस्याला GGN क्रमांक प्राप्त आणि गटासाठी GAP प्रमाणपत्र प्राप्त

## ७.४ अन्न सुरक्षा, ट्रेसेबिलिटी आणि गॅप (जीएपी) प्रमाणीकरण

- कृषीमाल टिकाऊ, सुरक्षित आणि व्यवहार्य बनवण्याच्या दृष्टीने कृषी क्षेत्रामध्ये सध्या बरीच प्रगती झाली आहे. ग्राहकांना सुरक्षित अन्न पुरवठा करण्याच्या दृष्टीने सुरक्षित अन्न उत्पादन आणि सुरक्षित अन्न हाताळणी फार महत्वाची आहे.
- बहुतेक विकसित देशांमध्ये, चांगल्या कृषी पद्धती (GAP) मानकं आणि अधिकतम कीटकनाशक अवशेष पातळी (MRL) या नियमांना अनुसरून अन्नसुरक्षा सुनिश्चित केली जाते.

## ७.५ अन्न सुरक्षा आणि ट्रेसेबिलिटी

- अन्नाची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ट्रेसेबिलिटी ही एक महत्वाची बाब आहे. उत्पादनाच्या शेवटच्या टप्प्यात अन्न सुरक्षा तपासणी ऐवजी संपूर्ण अन्न पुरवठा साखळीत वेगवेगळया टप्प्यावर अन्न सुरक्षा तपासणी करून शेवटी सुरक्षित उत्पादन निर्मिती करणे महत्वाचे आहे. याला अन्न पुरवठा साखळी दृष्टीकोन म्हणतात आणि ही पद्धत सर्व कृषी भागधारकांमध्ये स्वीकार्य आणि लोकप्रिय आहे.
- अन्न पुरवठा साखळी दृष्टीकोनामध्ये सुरक्षित, निरोगी आणि पौष्टिक अन्नाच्या पुरवठ्याची जबाबदारी ही उत्पादनाशी संबंधित सर्वांनी म्हणजेच शेतकरी, प्रक्रिया उद्योग, व्यापारी, वाहतूकदार आणि वापरकर्ते या अन्न पुरवठा साखळीतील सर्व भागधारकांची आहे आणि सुरक्षित अन्न पुरवठा करणे या सामाईक उद्देशाने या सर्वानी अन्नसाखळीच्या विविध टप्प्यांवर काम करणे अपेक्षित आहे.
- अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन ही पहिली पायरी म्हणजे कृषी उत्पादनाच्या स्तरावर महत्वाची बाब आहे. परंतु त्यानंतरही उत्पादनाची गुणवत्ता आणि अन्न सुरक्षा या दृष्टीने चांगल्या कृषी पद्धतींचा (Good Agricultural Practices) अवलंब करणे व संबंधित प्रमाणपत्राकरिता पात्र होणे ही विशेष महत्वाची बाब आहे.

## ७.६ अन्न सुरक्षा आणि अधिकतम कीटकनाशक अवशेष पातळी (MRL) अनुपालन

- अन्न सुरक्षेच्या दृष्टीने कीटकनाशकांचा / रसायनांचा बेकायदेशीर आणि / किंवा अवाजवी वापर रोखण्यासाठी एमआरएल मर्यादा सुरक्षित मर्यादा म्हणून निश्चित केल्या जातात. परिणामी अधिकृत कीटकनाशकांचा/रसायनांच्या सुरक्षित वापर सुनिश्चित करणे शक्य होते.
- प्रत्येक पीक निहाय्य कीटकनाशके, बुरशीजन्य विषारी द्रव्यं तसेच इतर सूक्ष्मजीवजन्य प्रदूषकांसाठी एमआरएल मर्यादा वेगळी आहे. तसेच एमआरएल मर्यादा या कायमस्वरूपी निश्चित केलेल्या नसतात. सद्यस्थितीतील तसेच नवीन उपलब्ध कीटकनाशकांच्या/रसायनाचा वापर व त्यांचे अन्न पदार्थांमधील अवशेष याविषयीच्या सातत्यपूर्ण माहिती संकलनाच्या आधारे एमआरएल मर्यादांचे पुनर्मूल्यांकन / पुनर्स्थापना केली जाते.

- शेतमालातील एमआरएल मर्यादा प्रत्येक वेळी शोधणे किंवा सुनिश्चित करणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. कीटकनाशकांचा वापर बंद झाल्यानंतर त्यांचे अंश कमी येण्यासाठी दोन वर्षांपर्यंत वेळ लागू शकतो. त्यामुळे अनुपालनाचे नियम माहीत असूनही त्यांची पूर्तता तात्काळ करणे हे सोपे काम नाही. यासाठी एमआरएल मर्यादांचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने आणि रसायनांचा उपयोग कमी करण्याच्या दृष्टीने शक्य तेथे एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रणाली आणि सेंद्रीय पदार्थांचा वापर करणे अत्यावश्यक आहे.
- <u>अधिकृत कीटक नाशकांचा वापर, प्रतिबंधीत कीटक नाशके/रसायनांचा वापर थांबवणे, कीटक नाशकांचा/रसायनांचा अतिरिक्त वापर थांबवण्याच्या दृष्टीने त्यांचे निर्धारित प्रमाण आणि निर्धारित वारंवारता आणि पिकाशी संबंधित एमआरएल मर्यादा याविषयी शेतकरी व शेत कामगार यांना प्रशिक्षित केले जाणे आवश्यक आहे.</u>
- प्रत्येकवेळी कीटक नाशकं/रसायनांचा वापर करतेवेळी पिक, वापरलेले रसायन, वापरण्याची तारीख, उपचार स्थान व क्षेत्र, वारंवारता, वापरकर्त्याचे नाव इत्यादी माहितीची नोंद करणे अत्यावश्यक आहे.
- कीटकनाशकं फवारणीसाठी वापरण्यात येणारे स्प्रे पंप्स यांची वापरापश्चात साफसफाई राखणे, तसेच कीटक नाशकं/रसायनांची योग्य पध्दतीने हाताळणी, साठवणूक व वापरापश्चात शिल्लक राहिलेलं कीटक नाशकं/रसायनं यांचे योग्य व्यवस्थापन करणे विषयी शेतकरी व शेत कामगार यांना प्रशिक्षित केले जाणे अत्यावश्यक आहे.
- सुगी पश्चात  अन्नपदार्थ, फळे इत्यादीचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने स्वच्छ पाण्याचा वापर, योग्य हाताळणी व साठवणूक इत्यादी बाबींवर लक्ष देण्याची गरज आहे.

# प्रकरण  क्रमांक  ८  सेंद्रिय शेती पध्दती

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थींना सेंद्रिय शेती पद्धतीची संकल्पना, गरज, तत्वे आणि गटासाठी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी व्यवस्था आणि घनकचरा व्यवस्थापन याविषयीची माहिती मिळेल.**

## ८.१ संकल्पना आणि गरज

सेंद्रिय शेती ही पीक आणि पशुधन उत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी एक प्रणाली आहे ज्यामध्ये नैसर्गिक परिसंस्थाच्या आणि संसाधनांचा पर्यावरण पूरक विकास आणि व्यवस्थापन केले जाते. नैसर्गिक तत्वांवर आधारित असल्यामुळे सेंद्रिय शेती प्रणाली ही शेतीच्या दृष्टीने शाश्वत व्यवस्था आहे. सेंद्रिय शेतीमध्ये वैज्ञानिक पध्दती आणि तंत्रज्ञान यांची जोड घातली जाते.

## ८.२ सेंद्रिय शेती पद्धती तत्वे

- मातीची प्रजनन क्षमता कायमस्वरूपी वाढवणे
- पर्यावरणाला हानी न पोहोचवता रोग आणि कीटकांचे व्यवस्थापन करणे
- नैसर्गित स्रोतांची सुरक्षितता आणि बाह्य निविष्ठांवर शेतकऱ्यांचे अवलंबित्व कमी करणे
- सुरक्षित, पौष्टिक आणि उच्च दर्जाच्या अन्नाची निर्मिती

## ८.३ सेंद्रिय शेती व्यवस्थापन

### १. पिकांच्या योग्य वाणांची निवड

महाराष्ट्राच्या -हवामान परिस्थिती आणि पिकांच्या हंगामास अनुकूल आणि आयसीएआर संस्थेद्वारे शिफारस केलेल्या पिकांच्या योग्य वाणांची निवड करणे आवश्यक आहे. तसेच बियाणे कायदा १९६८, १९६६ आणि  आणि बियाणे नियम,  नुसार  मान्यताप्राप्त बियाणांचाच वापर करणे योग्य आहे. जनुकीय सुधारणा केलेल्या पिकांची लागवड करताना जनुकीय अभियांत्रिकी मूल्यांकन समितीकडून (GEAC) मान्यता प्राप्त  वाणांच्या बियाणांचा उपयोग करण्यात यावा.

### २. माती गुणवत्ता

- शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्याचे ज्ञान असणे आणि मातीचा प्रकार आणि पिकाच्या गरजेनुसार खतांचा योग्य वापर करणे याविषयी शेतकऱ्यांना जागृत करणे.
- प्रकल्पा अंतर्गत भारत सरकारच्या मृदा आरोग्य कार्डासंबंधित योजनेचा लाभ घेतला जाईल आणि समुदाय आधारित संस्थाच्या सर्व शेतकऱ्यांकडे मृदा आरोग्य कार्ड असेल हे सुनिश्चित केले जाईल.

### ३. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन

- खते हा असा रासायनिक पदार्थ आहे जो नैसर्गिक पध्दतीने तयार करता येतो तसेच खते कृत्रिम रसायनांच्या एकत्रीकरणातूनही तयार करता येतात. खतांच्या माध्यमातून मुख्यत्वे जमिनीची नैसर्गिक सुपीकता वाढवणारी आणि पिकांद्वारे जमिनीतून घेतली गेलेली पोषण मुल्ये पुनर्संचयित केली जातात.
- शेतकऱ्यांना जैविक कीटकनाशके आणि जैविक खतांचा वापर आणि त्याचे फायदे याविषयी प्रशिक्षण दिले जाईल. जैविक कीटकनाशकामध्ये पिकांचे नुकसान नियंत्रित करण्याची आणि कीटकनाशकांचे पर्यावरणावरील नकारात्मक परिणाम कमी करण्याची क्षमता असते.
- जैविक कीटकनाशके आणि जैविक खतांचा उत्पादन करणाऱ्या युनिट्सच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात्मक पातळीवर सुधारणा आवश्यक आहे जेणेकरून ते शेतकऱ्यांना अनुदानित किमतीत सहज उपलब्ध होतील.

### ४. एकात्मिक कीड व्यवस्थापन

- कीटकनाशके, बुरशीनाशके आणि तणनाशके ही शेतीमध्ये सामान्यतः वापरली जाणारी कीटकनाशके आहेत. प्रकल्पा अंतर्गत समुदाय आधारित संस्थाच्या सर्व शेतकऱ्यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दतींचा अवलंब करावयाचा आहे.
